सभापतीस्थानी माननीय उप सभापती

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

श्री. रामदास कदम : सभापती महोदय प्रश्नोत्तराच्या यादीतील पहिल्या क्रमांकावरील ता.प्र.क्र.31149 आणि 5व्या क्रमांकावरील ता.प्र.क्र.30667 हे दोन्ही प्रश्न एकाच विषयाशी संबंधित असल्यामुळे ते एकत्रितपणे चर्चेला घ्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

उप सभापती : ठीक आहे. ता.प्र.क्र. 31149 आणि ता.प्र.क्र.30667 हे एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येत आहेत.

राज्यात गेल्या १० वर्षात केवळ ०.१ टक्का सिंचन क्षमता वाढल्याबाबत

(१) * ३११४९ श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.केशवराव मानकर , श्री.चंद्रकांत पाटील : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या १० वर्षात ७० हजार कोटी रुपये खर्च करुन केवळ ०.१ टक्का सिंचन क्षमता वाढली असल्याची बाब मा. मुख्यमंत्र्यांनी दिनांक ४ मे, २०१२ रोजी निदर्शनास आणून दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या १० वर्षात सिंचनासाठी कोणत्या विभागात किती पैसे खर्च करण्यात आले आहेत,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, सदरहू चौकशीत दोषी असणाऱ्यांविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय,

श्री.सुनील तटकरे : (१) नाही. तथापि, सिंचन क्षेत्रातील प्रगतीबाबत श्वेतपत्रिका काढण्याची घोषणा करण्यात आली आहे.

(२) राज्यात सन २००१-०२ ते २०१०-११ या १० वर्षात विदर्भात रूपये १५,७०० कोटी, मराठवाड्यात रूपये ८,३०० कोटी व उर्वरित महाराष्ट्रात रूपये १८,१७० कोटी असा एकूण रूपये ४२,१७० कोटी खर्च करण्यात आला आहे.

(३) जलसंपदा विभागाकडील राज्यस्तर प्रकल्पातून सन २००१-०२ मध्ये १७.०८ लक्ष हेक्टर सिंचित क्षेत्र होते. सन २०१०-११ मध्ये ते २९.५५ लक्ष हेक्टर इतके झाले. सन २००१-०२ ते २०१०-११ या कालावधीत सिंचित क्षेत्रात १२.४७ लक्ष हेक्टर इतकी वाढ झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील सिंचन क्षमतेबाबतची सद्य:स्थिती दर्शवणारी श्वेतपत्रिका जाहीर करण्यात येणार असल्याबाबत

(५) * ३०६६७ श्री.रामदास कदम , श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.सुभाष चव्हाण , श्री.एम.एम.शेख , श्रीमती अलका देसाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.अमरनाथ राजूरकर , श्री. विनोद तावडे, श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.राजन तेली , श्री.नितीन गडकरी , श्री.दिपकराव साळुंखे , श्री.रमेश शेंडगे , श्री.अनिल भोसले , डॉ.सुधीर तांबे , श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील सिंचनक्षमता गेल्या दहा वर्षात जेमतेम ०.१० टक्क्यांनी वाढल्याने सिंचनाबाबतची नेमकी काय स्थिती आहे, किती पैसा खर्च झाला याबाबतची श्वेतपत्रिका जारी करण्याची घोषणा राज्यशासनाने केली असल्याचे माहे मे, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंचनक्षेत्राच्या कामगिरीची श्वेतपत्रिका काढण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, श्वेतपत्रिका काढताना कोणते मुद्दे विचारात घ्यावेत याबाबतचे पत्र मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद यांनी मा.मुख्यमंत्र्यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतचा तपशिल काय आहे,

(५) अद्याप, सिंचनक्षेत्राच्या बाबतीत श्वेतपत्रिका काढली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुनील तटकरे : (१) होय, सिंचनक्षेत्रातील प्रगतीबाबत श्वेतपत्रिका काढण्याची घोषणा करण्यात आली आहे,

(२) नाही, तथापि, मागील दहा वर्षात सिंचनक्षेत्रातील प्रगतीबाबत मंत्रीमंडळापुढे सादरीकरण करण्यात आले आहे.

(३) व (४) होय, मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात विविध मुद्यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

(५) आवश्यक ती कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

श्री. सय्यद पाशा पटेल : प्रश्नभाग (१)ला "नाही." असे उत्तर देण्यात आलेले आहे. मंत्रालयाला लागलेली आग मी पाहण्यासाठी गेलो होतो. "पानी को आग लग गई " अशा भावना लोकांनी व्यक्त केल्या. गावातील सर्व शेतक-यांना याची चिंता आहे की एवढे पैसे खर्च करुन देखील सिंचन क्षमतेत केवळ ०.१ टक्का इतकी वाढ का झाली ? माझ्याकडे २०११-१२ या वर्षाचे आर्थिक पाहणी पुस्तक आहे. नियोजन विभागामार्फत हे पुस्तक छापले जाते.

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. सय्यद पाशा पटेल : माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की १० वर्षात केवळ ०.१ टक्का सिंचन क्षमता वाढली. २००१-०२मध्ये सिंचनाची टक्केवारी १७.०८ टक्के होती. आता ही टक्केवारी १७.०९ टक्के इतकी म्हणजे ०.०१ टक्क्याने ती वाढली. ही आकडेवारी आर्थिक पाहणी पुस्तिकेतील आहे. माननीय मुख्यमंत्री एक विधान करतात आणि माननीय मंत्री महोदय दुसरे विधान करतात. दोघांच्या विधानामध्ये विसंगती आहे. राज्यातील जनता चिंतीत आहे. पाऊस पडला नाही तर माणूस पाण्या शिवाय जगू शकणार नाही. अशा पाण्यावर खर्च केलेले कराडो रुपये कुठे गेले ? तेव्हा या सिंचनाच्या संदर्भात नेमकी वस्तुस्थिती काय आहे ?

श्री. सुनील तटकरे : पहिल्या प्रश्नामध्ये "०.०१ टक्का सिंचन क्षमता वाढली असल्याची बाब मा. मुख्यमंत्र्यांनी दिनांक ४ मे २०१२ रोजी निदर्शनास आणून दिली काय" या प्रश्नाला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. सिचंन क्षेत्रामध्ये किती वाढ झालेली आहे या बद्दलची चिंता राज्यातील जनतेला लागलेली आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. २००१ ते २०११ या १० वर्षाच्या काळात १७.०८ ते १७.०९ म्हणजे ०.१ टक्का वाढ झाली...(अडथळा)...मी शासन म्हणून माहिती देत आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31149 व 30667.....

श्री.सुनील तटकरे ....

सभापती महोदय, जून, 2001मध्ये जलसंपदा विभागाच्या प्रकल्पातून एकंदर निर्मित सिंचन क्षमता ही 37 लक्ष 69 हजार हेक्टर एवढी होती. जून, 2011 मध्ये 48 लक्ष 25 हजार हेक्टर इतकी झालेली आहे. निर्मित सिंचन क्षमतेमध्ये 10 लाख 56 हजार हेक्टर इतकी वाढ झालेली आहे. सन 2001-02 मध्ये राज्यस्तर प्रकल्पातून प्रत्यक्ष सिंचित झालेल्या क्षेत्राची माहिती देत आहे.

मघाशी मी सिंचन निर्मितीची माहिती दिली. सन 2001-02 मध्ये सिंचित क्षेत्र 17 लक्ष 8 हजार हेक्टर एवढे होते. सन 2010-11 पर्यंत म्हणजे गेल्या दहा वर्षाच्या कालावधीमध्ये प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र 29 लाख 55 हजार हेक्टर होते. म्हणजे प्रत्यक्ष सिंचित क्षेत्रामध्ये 12 लाख 47 हजार हेक्टर एवढी वाढ झालेली आहे. यामध्ये 1976 चा जो पाटबंधारे अधिनियम, त्यातील कलम 2 नुसार कालव्या खाली येणारे सिंचित क्षेत्र, जलाशयावरील उपसा, कालव्या वरील उपसा, नदी नाल्यावरील उपसा, प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील विहिरीवर भिजणारे क्षेत्र या गोष्टीचा अंतर्भाव यामध्ये होत असतो.

सभापती महोदय, या ठिकाणी मी ढोबळ मानाने माहिती देणार आहे ती अशी आहे की, गेल्या दहा वर्षामध्ये सिंचन क्षेत्राची टक्केवारी केलेली आहे. कृषी विभागाने ज्याप्रमाणे पिकाखालील स्थूल क्षेत्राची परिगणती केलेली आहे त्याचप्रमाणे जलसंपदा विभागाकडून दरवर्षी जे पुस्तक प्रसिध्द केले जाते त्या पुस्तकामध्ये दरवर्षीची सिंचन क्षमतेची माहिती प्रसिध्द होत असते. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' या पुस्तकाचा मुद्दा उपस्थित केला. त्या आर्थिक पाहणी पुस्तकातील पृष्ठ 83 वर जलसंपदा विभागाची माहिती देण्यात आलेली आहे. 105 पृष्ठावर कृषी विभागाची माहिती देण्यात आली आहे. त्यामध्ये 0.1 टक्क्याची माहिती दिलेली आहे. त्यामध्ये जून अखेर 2001-02 मध्ये राज्यस्तर प्रकल्पातून 37 लाख 269 हजार हेक्टर सिंचनक्षमता निर्माण झालेली होती. 2010-11 मध्ये 48.25 टक्के म्हणजे 10 लाख 56 हजार हेक्टर एवढी वाढ झालेली आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे... ता.प्र.क्र.31149 व 30667.....

सभापती महोदय, पिकाखालील स्थूल क्षेत्र 2001-02 मध्ये 2 लाख 16 हजार हेक्टर एवढे होते. 2010-11 मध्ये हे क्षेत्र 2.26 लाख हेक्टर होते. यामध्ये सुध्दा 9.93 टक्के वाढ झालेली आहे. पुढील आकडेवारी अतिशय महत्वाची आहे. राज्यस्तर प्रकल्पातून प्रत्यक्ष पिकाखालील स्थूल क्षेत्राचे प्रमाण 7.9 टक्के आहे. 2010-11 मध्ये हे प्रमाण 13.7 टक्के आहे. सभापती महोदय, जलसंपदा विभागाची या कालावधीमध्ये झालेली वाढ 5.17 टक्के आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्या अनुषंगाने मी माहिती दिली आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, गोदावरी खोऱ्यामध्ये 38 अब्ज घनमीटर पाणी उपलब्ध आहे. त्यापैकी किती पाणी अडविले आणि किती हेक्टर शेती ओलिताखाली आणली आहे?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, गोदावरी खोरे महामंडळाची निर्मिती गेल्या दहा वर्षापासून झाली आहे. त्यात काही मोठे व लहान प्रकल्प पूर्ण केलेले आहेत. निम्नतेरणा प्रकल्पामध्ये उपसा सिंचन योजनेचा समावेश आहे. घळ भरणी, गेट बसविण्यात आलेले काही प्रकल्प पूर्ण केलेले आहेत. उर्ध्वगंगा प्रकल्प, प्रवरामधील निळवंडे प्रकल्प हा अंशत: पूर्ण झालेला आहे.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाही नाही

श्री. सुनील तटकरे..... ता.प्र.क्र.31149 व ता.प्र.क्र.30667.....

नांदूर-मधमेश्वर प्रकल्प ज्याचे नाव मुकणेश्वर आहे तो पूर्ण झालेला आहे. मध्यम प्रकल्प पूर्ण झाले आहेत त्यामध्ये अंजना-पळशी, बोर-दहेगांव,नारंगी,टेंभापुरी,रेणापूर,मसलबारा, देवगव्हाण,रुई, वाघोली,कश्यपी,गौतमी-गोदावरी असे प्रकल्प आहेत. मध्यमप्रकल्पाची घळभरणी आणि द्वारउभारणी झालेली आहे त्यामध्ये शिवना-टाकळी, वाकोडे, उर्ध्वमनार आणि बावरीबॅरेज या प्रकल्पांचा समावेश आहे. गोदावरी नदीवरील 10 बॅरेजीसची कामे आपण पूर्ण केलेली आहेत त्यामध्ये आपेगाव,हिरकपुरी,मंगरुळ, राजाटाकळी आणि सावंगी आहे. त्याचप्रमाणे ढालेगांव, दिग्रस आणि अंदुरा आहे. मांजरा नदीवरील बॅरेजेस् आहेत त्यामध्ये बोरगांव आहे, अंजनखेडा आहे आणि कारसाबोरगाव आहे. डोंगरगाव,धनेगाव सुध्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, गोदावरील महामंडळाअंतर्गत किती सिंचन क्षमता निर्माण केली त्याबाबतची माहिती मी सदनाच्या पटलावर ठेवतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना अनेक प्रकल्पांची नांवे याठिकाणी सांगितली. एवढया प्रकल्पांची नांवे आमच्या लक्षात राहणार नाहीत. या सर्व प्रकल्पांना म्हणजे आपण जेवढया प्रकल्पांची नांवे घेतली त्या प्रकल्पांना मंजुरी कधी मिळाली, प्रकल्पाची मूळ किंमती किती होती आणि प्रकल्प पूर्ण होईपर्यंत प्रकल्पाची किंमत किती वाढली याची माहिती शासनाने द्यावी.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी माहिती दिलेली आहे. यासंदर्भातील सविस्तर माहिती मी सदनाच्या पटलावर ठेवतो.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, विभागवार माहिती दिलेली आहे. कोकण पाटबंधारे महामंडळाच्या अधिपत्त्याखाली जे जिल्हे येतात त्या जिल्हयांची सिंचन क्षमता किती आहे आणि आतापर्यंत या प्रकल्पांसाठी किती खर्च करण्यात आला आहे ? काही प्रकल्प 75-80 टक्के पूर्ण झालेले आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयातील कोरेले प्रकल्प 100 टक्के पूर्ण झालेला आहे. पूर्णझालेल्या प्रकल्पांचे शासनाने काही नियोजन केले आहे काय ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज्या प्रकल्पांचे काम 80-90 टक्के पूर्ण झालेले आहे त्यांना अधिकचा निधी देऊन ते पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे सिंचन क्षमता वाढणार आहे. यासाठी शासनाने काही नियोजन केले आहे काय ? राज्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 76 हजार कोटी रुपये खर्च येणार आहे ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या अंतर्गत मोठे प्रकल्प आहेत त्यामध्ये भातसा, सूर्या आणि तिलारी, याप्रकल्पांमध्ये घळभरणी आणि गेट बसविण्याचे काम झालेले आहे.मध्यम प्रकल्पांमध्ये अर्जुना,देवगड,हेटवणे आणि सतांडी या प्रकल्पांचा समावेश आहे. माननीय सदस्यांनी सांगितले ते खरे आहे की, प्रकल्प पूर्ण झाल्यावर जलाशयाचा साठा वाढला आणि त्यातून कालव्याची आणि तत्सम जी काही कामे आहेत त्याचे नियोजन केले आहे काय ? त्यासंदर्भात काम चालू आहे. काही ठिकाणी वन खात्याच्या जमिनीमुळे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अडचण येते. काही ठिकाणी वन संज्ञाची जमीन मिळण्यास वेळ लागतो. त्यामुळे कोकणात प्रकल्प पूर्ण करण्यास अडचणी निर्माण झालेल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. आज राज्यामध्ये असलेले पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 75-76 हजार कोटी रुपये लागणार आहेत ही वस्तुस्थिती आहे. याचा विचार करुन ज्या प्रकल्पांचे काम सुरु आहे त्यांची वर्गवारी करण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. 75 ते 100 टक्के काम पूर्ण झालेले प्रकल्प, 50 ते 75 टक्के काम पूर्ण झालेले प्रकल्प, 25 ते 50 टक्के काम पूर्ण झालेले प्रकल्प आणि शून्य ते 25टक्के काम पूर्ण झालेले प्रकल्प अशा रीतीने सुरु असलेल्या प्रकल्पांची वर्गवारी केलेली आहे.

माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार महामंडळ निहाय निधी द्यावा लागणार आहे.तसे न जाता माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे एकेका प्रकल्पाला थोडी थोडी रक्कम देऊन दीर्घकालीन प्रकल्प थांबविणार की विशिष्ट कालावधीत प्रकल्प पूर्ण करणार याचा निर्णय घ्यावा लागणार आहे. प्राधान्यक्रम ठरवावा लागेल. यासंदर्भात जी काही माहिती तयार होईल त्या माहितीच्या आधारे पुन्हा मंत्रिमंडळात याबाबतीत चर्चा करुन प्राधान्यक्रम निश्चितपणे ठरविता येईल. हे प्रकल्प विशिष्ट कालावधीत पूर्ण करुन,जे प्रकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत त्यांना अधिकाधिक निधी देऊन 1/2 वर्षात प्रकल्प पूर्ण झाले तर सिंचन क्षमता मोठया प्रमाणावर निर्माण होईल या गोष्टीचा गांभीर्याने विचार सरकार करीत आहे आणि त्याबाबतीत लवकरच धोरण स्पष्ट केले जाईल.

(नंतर श्री.भोगले .....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31149 व 30667.....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, 2009 मध्ये विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात आघाडी शासनाने 5000 कोटी रुपयांचे कोकण पॅकेज जाहीर केले होते. त्या पॅकेजमधील 500 कोटी रुपये सिंचनासाठी उपलब्ध करुन देण्यात येणार होते. गेल्या अडीच वर्षात त्या 500 कोटी रुपयांपैकी किती निधी सिंचनासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे? गेल्या 10 वर्षात 71 हजार कोटी रुपये सिंचनासाठी खर्च झाले. त्यातील किती निधी कोकणातील सिंचन प्रकल्पांवर खर्च करण्यात आला? शिवशाही शासनाच्या काळात कोकणात 35 सिंचन प्रकल्पांची कामे सुरु करण्यात आली होती. गेल्या 13 वर्षाच्या काळात या 35 सिंचन प्रकल्पांच्या कामावर किती निधी खर्च करण्यात आला आणि ती कामे केव्हा पूर्ण होणार आहेत? रायगड जिल्हयामध्ये सिंचन प्रकल्पासाठी ज्या जमिनी संपादित करण्यात आल्या, त्या जमीन संपादनासाठी किती निधी खर्च झाला?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.रामदास कदम यांनी तीन-चार मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. गेल्या 10 वर्षात सिंचनासाठी 71 हजार कोटी रुपये खर्च झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. मी नम्रपणे निदर्शनास आणू इच्छितो की, 71 हजार कोटी रुपये सिंचनावर जो खर्च झाला तो 1951 पासून झालेला आहे. गेल्या 10 वर्षाच्या काळात सिंचन प्रकल्पांसाठी खर्च झालेली रक्कम 42400 कोटी रुपये आहे. त्यातील भूसंपादन व पुनर्वसनासाठी 6300 कोटी रुपये व आस्थापनेवर 5600 कोटी रुपये खर्च झाले असून प्रकल्पांच्या बांधकामावर 34500 कोटी रुपये खर्च झालेले आहेत.

श्री.रामदास कदम : गेल्या 10 वर्षात 42400 कोटी रुपये सिंचनासाठी खर्च करण्यात आले, त्यापैकी कोकणातील प्रकल्पासाठी किती रक्कम खर्च करण्यात आली?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, 71 हजार कोटी रुपये जो खर्च झाला तो 1951 सालापासूनचा आहे. गेल्या 10 वर्षात 42400 कोटी रुपये महामंडळनिहाय खर्च होत असताना ती रक्कम भूसंपादन, पुनर्वसन व आस्थापना यावर खर्च झालेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : भूसंपादन आणि बांधकाम यावर खर्च होणे गृहीतच आहे.

श्री.सुनील तटकरे : विदर्भातील प्रकल्पांवर 15700 कोटी रुपये, मराठवाड्यातील प्रकल्पांवर 830 कोटी रुपये आणि उर्वरित महाराष्ट्रातील प्रकल्पांवर 18170 कोटी रुपये खर्च झालेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31149 व 30667.....

श्री.रामदास कदम : कोकणातील सिंचन प्रकल्पांवर किती खर्च झाला?

श्री.सुनील तटकरे : कोकणातील सिंचन प्रकल्पावर 3644 कोटी रुपये खर्च झालेला आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी चार प्रश्न विचारले होते. शिवशाही शासनाच्या काळात कोकणात 35 सिंचन प्रकल्पांची कामे सुरु झालेली होती. त्या सिंचन प्रकल्पांवर किती रक्कम खर्च करण्यात आली? कोकण पॅकेजमध्ये 500 कोटी रुपये सिंचन प्रकल्पांसाठी उपलब्ध करुन दिले जाणार होते. त्यापैकी किती रक्कम सिंचन प्रकल्पांसाठी उपलब्ध झाली?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, विस्तृत स्वरुपाचा प्रश्न विचारलेला असल्यामुळे या प्रश्नाची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : गेल्या 10 वर्षात 42400 कोटी रुपये सिंचन प्रकल्पांवर खर्च झाला असे मंत्री महोदयांनी सांगितले. ही बाब पूर्णत: असत्य स्वरुपाची आहे. 42533 कोटी रुपये हा योजनांतर्गत झालेला खर्च आहे. योजनेतर खर्च 23000 कोटी रुपये झालेला आहे. एकूण खर्च 66000 कोटी रुपये झाला ही वास्तवता आहे. गेल्या 10 वर्षात केवळ 0.1 टक्का सिंचन क्षमता वाढणे आणि त्या संदर्भात श्वेतपत्रिका काढण्यावरुन वादळ उठले होते. तो शोध आम्ही लावलेला नाही. नियोजन विभागाने प्रकाशित केलेल्या महाराष्ट्राची आर्थिक पाहणी या पुस्तिकेतील पृष्ठ क्रमांक 105 वर जी माहिती दिलेली आहे ती सत्य आहे की असत्य आहे याची माहिती मंत्री महोदयांनी सभागृहाला द्यावी.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31149 व 30667..... श्री. विनोद तावडे .....

केवळ 0.1 टक्के सिंचन आहे म्हणून श्वेत पत्रिका काढावा असे आमचे म्हणणे नाही पण श्वेत पत्रिका मागत असताना त्यात जो भ्रष्टाचार झाला अथवा बाकी जे काही झाले त्याची जशी आम्हाला चिंता आहे तसे त्यात भ्रष्टाचार असेल तर ती माहिती श्वेत पत्रिकेतून बाहेर येणारच आहे. पण एवढ्या प्रमाणात पैसा खर्च होऊन देखील राज्यातील सिंचनाची अशी अवस्था असेल तर या बाबतीत धोरणात्मक विचार करण्याची गरज आहे.

श्वेत पत्रिका म्हणजे सीबीआय किंवा सीआयडी चौकशी होत नाही, त्यामुळे त्याला एवढे धाबरण्याचे कारण नाही. तसेच यात जर काही भ्रष्टाचार झाला असेल तर तो बाहेर येणारच आहे पण त्याच्या पलीकडे जाऊन याबाबत शासनाला धोरणात्मक निर्णय घेता येईल, असा माझा मुद्दा आहे. त्याचबरोबर शासनाने सिंचनावर खर्च करताना एखादे नवीन धोरण ठरविले पाहिजे. याचे कारण सन 2008-09 मध्ये प्रति दशलक्ष घन मीटर पाण्याचा साठा करण्यासाठी 156.62 लाख खर्च होतो, सन 2009-10 मध्ये 356.11 लाख इतका खर्च झाला आहे. एकाच वर्षात डीएसआर मध्ये एवढी वाढ पहिल्यांदाच झाल्याचे दिसते. त्यानंतर सन 2010-11 मध्ये तर 711 लाखावर ही रक्कम गेली. हे पाहून तर असे वाटते की, बांधकाम खात्याच्या डीएसआरमध्ये झालेली वाढ नॉमिनल होती पण पाटबंधारे विभागातील डीएसआरची वाढ तर अत्यंत भयंकर दिसून येते. त्यामुळे या पैशांचे सिंचन कुठेतरी होते असा संशय आम्हाला या आकडेंवारीतील आकडे पाहून येतो, म्हणून श्वेत पत्रिकेची मागणी करण्यात आली. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात माननीय मुख्यमंत्र्यांनी सिंचनासाठी पॅकेज घोषित केले होते. असे पॅकेज घोषित करताना सिंचनावर इतका निधी खर्च होऊनही सिंचन क्षमता वाढल्याचे दिसत नाही म्हणून यशवंतराव चव्हाण यांच्या जन्म शताब्दी वर्षानिमित्त त्यांनी घोषणा केली होती. त्या घोषणेला नंतरच्या काळात विरोध झाला. पण नियोजन विभागाने आर्थिक पाहणी अहवालात जी आकडेवारी दाखविली ती तरी खरी आहे काय ? तसेच श्वेत पत्रिकेला माननीय मंत्री महोदयांचा विरोध आहे की पाठिंबा आहे ? मंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले की, सिंचनावर 42 हजार कोटी रुपये खर्च झाले. या 42 हजार कोटीचा विचार केला तर प्रति हेक्टरी हा खर्च 3,36,808 रुपये एवढा येतो. या वाढीमध्ये सिंचन विहिरी व जल संधारणावर झालेला खर्च देखील समाविष्ट आहे, केवळ एकट्या पाटबंधारे विभागाचा हा

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31149 व 30667..... श्री. विनोद तावडे .....

खर्च नाही. मंत्रिमंडळासमोर केलेल्या प्रेझेंटेशनमध्ये हाच घोळ झाला तो जोपर्यंत मिटत नाही तोपर्यंत खरे बाहेर येत नाही. हे सर्व गृहित धरले तर सिंचनाचे मानांकन जे प्रति हेक्टरी ठरलेले आहे ते सरासरी फक्त 2 लाख रुपये आहे. असे असताना हेक्टरी 3.36 लाख रुपये इतका अवास्तव खर्च होण्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुनील तटकरे : महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रामुख्याने तीन चार मुद्दे उपस्थित केलेले आहेत. तसेच एका गोष्टीचा मी शासनाच्या वतीने उल्लेख करु इच्छितो आणि ठामपणे सांगतो की श्वेत पत्रिका काढण्यासाठी कोणाचाही विरोध नाही किंवा त्याबद्दल दुमत असण्याचे कारणही नाही. शासन श्वेत पत्रिका काढणारच आहे. त्याचबरोबर महत्वाचा मुद्दा सांगितला की आर्थिक पाहणी अहवालातील पृ.क्र. 105 वर कृषी विभागाची माहिती दिली आहे आणि त्यातीलच पृ.क्र. 83 वर जलसंपदा खात्याची माहिती सुध्दा दिलेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रश्न विचारतांना सांगितले की, या आकडेवारीमध्ये जलसंधारणाचा समावेश आहे का, तर तसा समावेश यात नाही असे मी सांगू इच्छितो. पण लाभ क्षेत्रातील ज्या विहिरी आहेत त्यासंदर्भात सन 1976 च्या पाटबंधारे अधिनियमाच्या अंतर्गत स्पष्टपणे तरतूद आहे. तसेच आणखी एक बाब अशी आहे की, सांख्यिकी विभागांकडून जी आकडेवारी प्राप्त होते ती या आर्थिक पाहणी अहवालात शासनाचे ऑथेन्टिक डाक्युमेंट म्हणून दिली जाते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 31149 व 30667 .....

श्री. सुनील तटकरे .....

यासंदर्भात आपण धोरणात्मक निर्णय कोणता घेणार आहात ? असा प्रश्न आपण विचारावयास विसरला असाल असे मला वाटते. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, यासंदर्भात चितळे समितीच्या अहवालात असे म्हटले आहे की, भूजलाद्वारे निर्मित सिंचन क्षमतेच्या तुलनेत प्रत्यक्षात वार्षिक वापराच्या पाण्याची आकडेवारी .....(अडथळा) चितळे समितीने काढलेली आकडेवारी व आमच्या विभागाने काढलेली आकडेवारी यामध्ये नियंत्रण असणे आवश्यक होते म्हणून तशा पध्दतीची यंत्रणा उभी करुन आकडेवारी काढण्यास चितळे समितीने सांगितलेले आहे. त्यामुळे या धोरणाचा विचार आमच्या कडून नक्की केला जाणार आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

उप सभापती : आता मी पुढील प्रश्न क्रमांक 31130 पुकारतो.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीमधील तारांकित प्रश्न क्रमांक 1 व तारांकित प्रश्न क्रमांक 5 एकत्र करुन चर्चा करण्यास सुरुवात करण्यात आली होती. या दोन्ही प्रश्नास सन्माननीय जलसंपदा मंत्री श्री. सुनील तटकरे यांनी उत्तर दिलेले आहे. परंतु त्यांच्या उत्तराने विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे समाधान झालेले नसल्यामुळे आपण पुढचा प्रश्न पुकारला. त्यामुळे माझी आपणास विनंती आहे की, या दोन्ही प्रश्नाचा संबंध माझ्याही विभागाशी काही प्रमाणात येत असल्यामुळे आपण मला बोलण्याची परवानगी द्यावी अशी विनंती आहे. मला अशीही विनंती करावयाची आहे की, आपण तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील जो दुसरा प्रश्न पुकारलेला आहे तो कृपया आपण नंतर घ्यावा.

उप सभापती : ठीक आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, राज्यात सिंचनाच्या प्रश्नासंदर्भात चर्चा होत आहे. विरोधी पक्ष नेत्यांनी तसेच विरोधी पक्षाच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या सुवर्ण जयंती वर्षाच्या निमित्ताने शासनाने वेगवेगळया विषयांवर चर्चा घडवून आणलेली आहे. स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जयंती वर्षाच्या निमित्ताने एका चर्चासत्रात विधानसभा विरोधी पक्ष नेते श्री. एकनाथराव खडसे तसेच सन्माननीय ज्येष्ठ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 31149 व 30667 .....

श्री. अजित पवार...

सदस्य श्री. गणपतराव देशमुख यांनी या विषयाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केले होते. प्रसिध्द झालेल्या महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीच्या अहवालात कृषी विभाग व जलसंपदा विभागांनी यासंदर्भात माहिती दिलेली आहे. गेल्या 10-12 वर्षापासून महाराष्ट्रात आघाडी सरकार सत्तेवर असून आमच्या सरकारने अनेक विभागांना निधी दिलेला आहे. शासन एवढया मोठया प्रमाणात जलसिंचनासाठी निधी देत असतांनाही सिंचनाचे क्षेत्र 0.1 टक्क्यानेच का वाढले असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. राज्याच्या जनतेला सिंचनाच्या संदर्भातील माहिती मिळाली पाहिजे यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात सांगितले होते की, "सिंचनाच्या संदर्भातील श्वेतपत्रिका निश्चितपणे काढली जाईल." त्यामुळे मंत्रिमंडळात श्वेतपत्रिकेच्या संदर्भात प्रेझेन्टेशन तसेच चर्चाही झाली. आमचे सरकार श्वेतपत्रिका काढण्याच्या विरोधात नाही हे महाराष्ट्रातील जनतेने व विरोधी पक्षाच्या सदस्यांनी लक्षात घ्यावे अशी विनंती आहे. आघाडी सरकारमध्ये सामील असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचा श्वेतपत्रिका काढण्यास विरोध आहे अशा बातम्या वर्तमानपत्रात तसेच मीडियामध्येही दिल्या जात आहेत.

सभापती महोदय, मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने विधान परिषदेचा नेता म्हणून काम करीत आहे. माझ्या पक्षापुरते बोलावयाचे झाले तर श्वेतपत्रिका काढण्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अजिबात विरोध नाही, शेवटी आघाडी सरकार आम्ही दोन्ही पक्ष मिळून चालवित आहोत. श्वेतपत्रिकेच्या संदर्भात संध्याकाळच्या वेळेस एक स्पेशल कॅबिनेटची बैठक घेण्यात आली होती. त्यामध्ये सिंचनाच्या संदर्भात प्रत्येक मंत्र्यांनी आपल्या सूचना व्यक्त केल्या होत्या, माननीय मुख्यमंत्र्यांनीही यासंदर्भात सूचना केल्या होत्या व त्या सर्व सूचनांबाबत जलसिंचन विभागाला अभ्यास करण्यासाठी सांगण्यात आले होते. जलसंपदा विभागाचे कॅबिनेट मंत्री माननीय सुनील तटकरे व सन्माननीय राज्यमंत्री श्री. रामराजे नाईक-निंबाळकर साहेबांना तसेच त्यांच्या विभागाच्या दोन्ही सचिवांना श्वेतपत्रिकेच्या संदर्भातील माहिती तयार करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. सदर श्वेतपत्रिका या अधिवेशनात जाहीर होईल की, नाही याची खात्री मी देऊ शकत नाही. परंतु राज्यातील जनतेला या प्रश्नाच्या निमित्ताने मी ठामपणे विश्वास देऊ इच्छितो की, नागपूर अधिवेशनाच्या आधी सिंचनाच्या संदर्भातील श्वेपत्रिका निश्चितपणे आलेली दिसेल.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, सिंचनाचे क्षेत्र फक्त 0.1टक्क्यानेच कसे वाढले असा प्रश्न निर्माण झाला आहे. याचा संबंध जल संपदा आणि कृषी विभागाशी आहे. मला देखील प्रश्न पडला की, गेले अनेक वर्षे काम करीत असताना जल सिंचना खालील क्षेत्र फक्त 0.1 टक्क्याने वाढले कसे ? येथे सन्माननीय सदस्य श्री.विजयसिंह मोहिते पाटील, श्री.दीपक साळुंके आहेत. ते सोलापूर जिल्ह्याशी संबंधित आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनाही माहिती आहे की, पूर्वी सोलापूर जिल्ह्यामध्ये खरीप आणि रब्बी हंगामामध्ये किती पीक उत्पादन होत होते. या बाबतीत सन्माननीच सदस्य श्री.पाशा पटेल यांचा अनुभव जास्त आहे

माझे म्हणणे सर्व सन्माननीय सदस्यांनी नीट ऐकावे. मला यामध्ये राजकारण आणायचे नाही. चूक झाली असेल तर जरूर शासन झाले पाहिजे. सोलापूर जिल्हा हा रब्बीचा होता म्हणून तेथे ज्वारी वगैरे पिके घेतली जात होती. आज त्याच जिल्ह्यात तेवढ्याच क्षेत्रात ऊस व केळीचे पीक घेतले जाते. हे क्षेत्र पूर्वी एवढेच दिसते आहे. सदर पिके घेत असल्यामुळे आज तेथे पाण्याचा वापर किती तरी पटीने वाढलेला आहे.

मला सभागृहाला एक सांगावयाचे आहे की, माझा जिल्हा पुणे आहे. मी 1991 मध्ये राजकीय जीवनात आलो व त्यावेळीच खासदार झालो. त्यावेळी जलसंपदा विभाग पुण्याला पिण्यासाठी 4.5 टीएमसी पाणी देत होता. येथे सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले बसले आहेत. आज पुणे शहर वरसगाव, पानशेत, खडकवासला, टेमघर धरणातील 14.5 टीएमसी पाणी पित आहे. म्हणजे पिण्याच्या पाण्याचे प्रमाण 10 टीएमसीने वाढले आहे. आज पुण्यातील लोकसंख्या वाढत आहे. मोरवे धरण नवी मुंबईसाठी झाले. सभापती महोदय, आपण स्वत: ठाणे जिल्ह्यातील आहात. मोरवे धरण आम्ही सुरूवातीला शेतीकरिता केले होते. नंतर सन्माननीय मंत्री श्री.गणेश नाईक यांनी प्रस्ताव आणला की, या धरणातील पाणी निव्वळ पिण्यासाठी देण्यात यावे. आज त्या धरणातील पाणी फक्त पिण्यासाठी देण्यात येत आहे. मुंबई शहराची देखील वाढ होत आहे. मुंबईसाठी देखील आपण अनेक धरणे करीत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

बिगर सिंचनासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी जात आहे. (अडथळा) मी येथे खर्चाचे बोलत नाही. आपण पाणी वाढवत आहोत. पण ते पाणी बिगर सिंचनाकरिता, पिण्याकरिता देत आहोत. पूर्वीच्या काळात आपल्याकडे शौचकूपाचे प्रमाण नव्हते. आज ग्रामीण भागत शौचकूप वापरायचे म्हटले व फ्लश करायचे म्हटले तर किती पाणी जाते याचा विचार जनतेने आणि सभागृहाने केला पाहिजे.

आज नाथसागरा पासून बाभळी बॅरेज पर्यंत पाणी अडविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी मला सांगितले की, अजित तू जलसंपदा खात्याचा मंत्री आहेस, मी मराठवाड्यातून आलेलो आहे. मी राज्याचा मुख्यमंत्री असलो तरी तापीमध्ये जसे बॅरेजेस झाले तसे आपण मांजरा व गोदावरी नदीवर घेऊ या. संपूर्ण बॅरेज झाले. आज बीड, जालना, परभणी, नांदेड, औरंगाबाद जिल्हा येथे नदीच्या दोन्ही बाजूकडील तीरावर ऊसाचे क्षेत्र वाढले आहे. या राज्यामध्ये दहा वर्षा पूर्वी किती लाख मेट्रीक टन ऊस पिकत होता ? आज राज्यात 850 लाख मेट्रीक टन ऊस पिकत आहे. आज राज्यातील केळीचे उत्पादन वाढले आहे. बिगर सिंचन पाणी वापराचे प्रमाण देखील वाढले आहे.

माझ्यावर हक्कभंग आणू असे आपण गंमतीने म्हणालात. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम, जयंत पाटील यांना जो प्रश्न पडला होता तो आम्हाला देखील मंत्रिमंडळ बैठकीच्या वेळी पडला होता. यासंबंधी आम्ही 2-3 तास चर्चा केलेली आहे. याबाबत कृषी विभागाने आमच्या लक्षात आणून दिले की, पूर्वीच्या काळात आपल्याकडे खरिपाची आणि रब्बीची पिके घेताना 2 किंवा 3 वेळा पाणी लागायचे. जमीन चांगली असेल तर हरभरा पिकाला 2 वेळा पाणी लागायचे. खराब जमीन असेल तर 3-4 वेळा पाणी लागते. आता मात्र राज्यामध्ये ऊस, केळी,द्राक्ष ही जास्त पाणी घेणारी पिके काढली जातात. तसेच बिगर सिंचनाचे क्षेत्र देखील वाढले आहे. म्हणूनच ही तफावत आपल्याला दिसते.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीमध्ये जल संपदा विभागाचे आकडे दिले आहेत. माझ्याकडे कृषी विभागाचे आणि जल संपदा विभागाचे मागील दहा वर्षांचे आकडे आहेत. त्यांची तुलना केल्यानंतर कोणत्याही विभागाने चुकीची आकडेवारी दिली असे अजिबात घडलेले नाही. म्हणून आपणा सर्वांना ही तफावत दिसत आहे. त्याचप्रमाणे आपले क्रॉपिंग पॅटर्न पूर्णपणे बदलले आहे. त्याचप्रमाणे पीक कर्ज उचलण्याचे प्रमाण सुध्दा मोठया प्रमाणावर वाढले आहे. या ठिकाणी माननीय सदस्य श्री. अपूर्व हिरे बसले आहेत व ते नाशिक जिल्हा सहकारी बॅन्केचे चेअरमन आहेत. संपूर्ण राज्यामध्ये नाशिक जिल्ह्यातील शेतकरी सर्वात जास्त पीक कर्ज घेतो की नाही हे त्यांनी सांगावे? गेल्या दहा वर्षापूर्वी किती शेतकरी पीक कर्ज घेत होते व आज किती शेतकरी घेत आहेत हे आपण पहावे. त्या ठिकाणी माझ्या शेतकऱ्याला दोन टक्के व्याजाने पैसे मिळत असतील तर त्याला दिले पाहिजेत तशा प्रकारचा प्रयत्न राज्य सरकारचा आहे.

या ठिकाणी बोलत असतांना माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सांगितले की, कोकणामध्ये मोठया प्रमाणात उद्योग आले आहेत. या संदर्भात माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी देखील प्रश्न उपस्थित केला. त्या ठिकाणी कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे लोक प्रतिनिधी प्रतिनिधित्व करीत आहेत त्यांना वाटते की, आमचा काळम्मा प्रकल्प असेल, किंवा इतर प्रकल्प सुध्दा मार्गी लागले पाहिजेत. परंतु अनुशेष भरुन काढण्यासाठी माननीय राज्यपालांनी आम्हाला ज्या डायरेक्टिव्हज दिलेल्या आहेत त्याच्या बाहेर यत्किंचितही जाता येत नाही. जल संपदा विभागाला एक रुपया जरी द्यावयाचा झाला तरी त्यामधील किती टक्के रक्कम उर्वरित महाराष्ट्राला दिली गेली पाहिजे, किती टक्के रक्कम मराठवाडा आणि विदर्भाला दिली गेली पाहिजे याबाबत माननीय सदस्यांचा अभ्यास चांगला असल्यामुळे मी त्या बाबत सभागृहाचा जास्त वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु हा हजारो कोटी रुपयांचा निधी देत असतांना ज्या ठिकाणी 80 टक्क्यापेक्षा, 85 टक्क्यापेक्षा जास्त खर्च होऊन प्रकल्प तयार झाले आहेत त्यांना जास्तीचा निधी देत असतांना इतर भागाला सुध्दा त्या प्रमाणामध्ये निधी वाढवून द्यावा लागतो. हा संपूर्ण निधी अर्थसंकल्पामध्ये बसवावयाचा झाला तर आम्हाला 7 ते 8 हजार कोटी रुपयांच्या पुढे रक्कम देणे शक्य होत नाही. या करिता केंद्रामध्ये आपल्या राज्याचे प्रतिनिधित्व करणारे आदरणीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेब, आदरणीय श्री. विलासराव देशमुख साहेब व आदरणीय श्री. सुशीलकुमार शिंदे साहेब या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार.... ता.प्र.क्र. 31149 व 30667....

सर्वांना आम्ही सांगितले आहे की, ऐआयबीपी मधून आम्हाला जास्तीचा निधी मिळवून देण्याचा आपण प्रयत्न करावा. काही प्रकल्पांसाठी राज्य शासनाचा 10 टक्के निधी व केंद्र शासनाचा 90 टक्के निधी मिळाला तर आपल्या राज्यातील डी.पी.ए.पी तालुके किंवा गोसीखूर्दसारखा राष्ट्रीय प्रकल्प मार्गी लागण्यासाठी मदत होईल.

सभापती महोदय, माननीय श्री. प्रणव मुखर्जी हे या देशाचे अर्थ मंत्री असतांना त्यांनी जो अर्थसंकल्प सादर केला त्यामध्ये त्यांनी काही पॅकेज दिले. त्यामध्ये पहिल्या टप्प्यामध्ये विदर्भाला 300 कोटी रुपये दिले आहेत तरी सुध्दा त्यांना अधिकची रक्कम देण्याची त्यांची तयारी आहे. मधल्या काळात ही बाब या राज्याचे चार वेळा मुख्यमंत्रीपदी राहिलेले माननीय श्री. शरद पवार साहेबांच्या लक्षात आणून दिली. त्यांनी सांगितले की, मी माझे वजन वापरुन मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र किंवा पश्चिम महाराष्ट्रामध्ये भेदभाव न करता अर्धवट राहिलेले प्रकल्प मार्गी लागले पाहिजेत या करिता या राज्याला अधिकचा निधी मिळवून देण्याचा प्रयत्न करतो आणि तसे त्यांनी जाहीर केले. त्या करिता माननीय मुख्यमंत्री आणि आम्ही सर्व मंत्री केंद्रामध्ये जाऊन अधिकचा निधी आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. मला सभागृहाला निश्चितपणे सांगितले पाहिजे की, "महाराष्ट्राची आर्थिक पाहणी" आम्ही जशीच्या तशी दिली आहे, त्यामध्ये कोणतीही त्रुटी राहिलेली नाही. कृषी विभागाला जे वाटले त्याप्रमाणे त्यांनी विहीर किंवा अन्य ठिकाणी असलेल्या पाणी साठया बाबत माहिती दिली आहे. जल संपदा विभागाने प्रत्यक्षात जे काम केले आहे त्याची माहिती या ठिकाणी दिली आहे. त्यामुळे तशाप्रकारची तफावत आपल्याला पहावयास मिळते. पाण्याचे साठे वाढले आहेत, पाण्याचा वापर वाढला आहे. बिगर सिंचनासाठी देखील मोठया प्रमाणात पाणी वापरले जात आहे, त्याच प्रमाणे पाण्यापासून नगदी पिके घेण्याचे प्रमाण देखील वाढले आहे ही गोष्ट सभागृहाने निश्चितपणे लक्षात घेतली पाहिजे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 31149 व 30667 . . . .

उप सभापती : मला असे वाटते की, आता या प्रश्नावरील चर्चा पूर्ण झालेली आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा कोकणातील लोकांच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे. त्यामुळे आम्हाला प्रश्न विचारण्यास परवानगी द्यावी.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा प्रश्न सुरु होऊन 40 मिनिटे झालेली आहेत. तसेच बाकीच्या प्रश्नांबाबत देखील चर्चा व्हावयाची आहे. बाकीचे कोणतेही प्रश्न आपल्याला चर्चेला घ्यावयाचे नाहीत काय ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, याठिकाणी प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये देण्यात आलेली आकडेवारी पाहिली तर 17 हजार लक्ष हेक्टरवरुन आपण 29 लाख हेक्टरवर आलो आहोत म्हणजे 12.47 लाख हेक्टरने सिंचन क्षमता वाढलेली आहे.माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरानुसार जवळपास 75 टक्के क्षमता वाढली आहे. असे असताना 0.1 हा आकडा कुठून आला हा प्रश्न आहे. तेव्हा आपण जर याचे निराकरण केले तर याबाबतीत सर्व सन्माननीय सदस्यांचे समाधान होऊ शकेल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.विनायक मेटे : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मला बोलू द्यावयाचे की नाही हे माननीय सभापतींना ठरवू द्या.

उप सभापती : ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, सकाळी 11.00 वाजता प्रश्नोत्तराचा तास सुरु झाला आणि आता 11 वाजून 41 मिनिटे झाली आहेत. जर सन्माननीय सदस्यांना यावर सविस्तर चर्चा करावयाची असेल तर या विषयाच्या बाबतीत वेगळया मार्गाने चर्चा उपस्थित करावी. त्याला आपण अनुमती द्यावी.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

उप सभापती : मी सभागृहाची बैठक पाच मिनिटांसाठी तहकूब करतो.

(सभागृहाची बैठक 11 वाजून 41 मिनिटांनी पाच मिनिटांसाठी स्थगित झाली.)

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

ता. प्र. क्र. 31149 व 30667 .....

(दोन्ही बाजूचे सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तराची आम्ही वाट बघत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे कोणत्या मुद्यावर उभे आहेत हे आम्हाला कळले पाहिजे.

उप सभापती : यानंतर तारांकित प्रश्न क्रमांक 31130 चर्चेला घेण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करतात)

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्य शासनाने गोसीखूर्द प्रकल्पग्रस्तांसाठी मंजूर केलेल्या पॅकेजबाबत.

(२) * ३११३० श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.राजन तेली : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांसाठी माहे फेब्रुवारी २०१० मध्ये १५२ कोटी रुपयांचे पॅकेज मंजूर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पॅकेजनुसार शेतीप्रमाणे घराच्या मोबदल्यावरही व्याज देण्याची तरतूद असतांनाही आजपर्यंत नागपूर जिल्हयातील ५१ गांवामधील एकाही प्रकल्पग्रस्ताला उपरोक्त व्याजाची रक्कम देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकल्पग्रस्तांना व्याजाची रक्कम त्वरित मिळण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, या प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुनील तटकरे : (१) होय,

(२) होय, सदर पॅकेज अंतर्गत गोसीखुर्द प्रकल्पाचे बाधितांना बाधित शेतीचा निवाडा घोषित झाल्यानंतर प्रत्यक्षात वाटपाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीकरिता व्याजासाठी नागपूर व भंडारा जिल्ह्याकरिता एकूण रू.७१.२९ कोटी मंजूर केले आहेत. या रकमेत नागपूर जिल्ह्यातील गावठाणातील घराचे निवाडे घोषित झाल्यानंतर प्रत्यक्षात वाटपा पर्यंतच्या कालावधीसाठी व्याजाची रक्कम अंतर्भूत नाही.

(३) सदर प्रकल्पग्रस्तांना व्याजाची रक्कम मिळणेसाठी रू.१३.६७ कोटीचा प्रस्ताव महसूल विभागास जिल्हाधिकारी, नागपूर यांचे मार्फत सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. एस. क्यू. ज़मा : सभापति महोदय, माननीय सदस्य हमें यहां पर प्रश्न नहीं पूछने दे रहे हैं. यह हमारे ऊपर अन्याय है. माननीय सदस्य अपने प्रश्न तो पूछ लेते हैं और हमारा प्रश्न यहां पर चर्चा के लिए आता है तो इस प्रकार व्यवधान करके हमें प्रश्न नहीं पूछने देते. ऐसा करना कहां तक उचित है ? माननीय सदस्यों से मेरी विनती है कि वे बैठे जाएं और मुझे मेरा प्रश्न पूछने दें. हमारे द्वारा सदन में चर्चा के लिए लाया गया यह प्रश्न बहुत महत्वपूर्ण है. यह प्रश्न गोसीखुर्द प्रकल्प के बारे में है. यह प्रश्न सिंचन विभाग से संबंधित है. माननीय सदस्यों से

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31130 ... श्री. एस. क्यू. ज़मा....

अनुरोध है कि कृपया मुझे मेरा प्रश्न पूछने दें. माननीय सदस्यों ने कोंकण के बारे में अपना प्रश्न तो पूछ लिया और हमें विदर्भ से संबंधित प्रश्न पूछने नहीं दे रहे हैं.

श्री. विनोद तावडे : गोसीखुर्द प्रकल्पाच्या संदर्भात नंतर लक्षवेधी सूचना आहे, आपण खाली बसावे.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सदस्य मार्गिकेत येऊन बोलण्याचा प्रयत्न करतात)

उप सभापती : मी सभागृहाचे कामकाज दुपारी 12.00 वाजेपर्यंत तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.49 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

<u>नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना</u>

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कोल्हापूर जिल्ह्यात...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आमचे म्हणणे काय आहे ते तरी निदान आपण ऐकून घ्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती महोदय, मघाशी प्रश्नोत्तराचा तास सुरु असताना पहिल्या व पाचव्या प्रश्नासंबंधी सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर आपण 5 मिनिटांपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित केली होती. त्यानंतर सभागृहाची बैठक पुन्हा सुरु झाल्यावर आपण अपूर्ण राहिलेल्या प्रश्नांवरील चर्चा सुरु न करता पुढील प्रश्न पुकारला होता. मघाशी सभागृहाच्या नेत्यांनी हे प्रश्न अतिशय महत्वाचे आहेत, शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे आहेत राजकारणाच्या पलीकडील हे प्रश्न आहेत असे म्हटले होते. सिंचनाच्या संदर्भात शासनाने श्वेतपत्रिका प्रसिध्द करावी अशी मी पत्राद्वारे शासनाकडे मागणी केली होती. त्या पत्रात एकही वाक्य राजकीय नाही. ह्या प्रश्नामधील विषय महत्वाचा आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी या प्रश्नाला उत्तर देताना शौचालयासाठी लागणाऱ्या फ्लशिंगचा उल्लेख केला होता. तो विषय सुध्दा आम्ही ऐकून घेतला होता. या प्रश्नाच्या उत्तरातून अधिक माहिती घेण्यासाठी आम्ही ते सर्व ऐकून घेतले. या प्रश्नांच्या अनुषंगाने आम्हाला 2-3 जेन्युईन प्रश्न विचारावयाचे होते. ते प्रश्न विचारण्यासाठी आम्ही उभे राहत असताना सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभे राहिले. वास्तविक प्रश्नोत्तराच्या तासामध्ये कोणत्याही सन्माननीय सदस्यांना हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी परवानगी दिली जात नाही. तरी देखील आपण त्यांना खाली बसविले नाही.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी खाली बसावे असे मी त्यांना 3 वेळा सांगितले होते.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये कोणत्याही सन्माननीय सदस्यांना हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येत नाही. तरी देखील ते बोलत राहिल्यामुळे सभागृहात गोंधळाची स्थिती निर्माण झाली त्यामुळे आपल्याला सभागृहाची बैठक स्थगित करावी लागली. सभागृहाची बैठक पुन्हा सुरु झाल्यानंतर आपण पुढचा प्रश्न पुकारला. त्यानंतर सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य आपली जागा सोडून मार्गिकेत आले होते.

काही सन्माननीय सदस्य : आम्ही वेलमध्ये आलो नव्हतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून उभे राहिले होते.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

उप सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे.

श्री.विनायक मेटे : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सत्तारुढ पक्षातील सन्माननीय सदस्यांवर हेत्वारोप केलेला आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांची सभागृहाचे कामकाज शांतपणे चालविण्याची इच्छा असेल तर मी कामकाज सुरु ठेवतो. अन्यथा मला सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित करावी लागेल.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांचा सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित दादा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास नाही काय, त्यांनी मघाशी जे उत्तर दिले आहे ते अपूर्ण आहे असे त्यांचे म्हणणे आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सत्तारुढ पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये आले होते असे मी म्हटलेले नाही. प्रश्नोत्तराचा तास संपण्यासाठी 15 मिनिटांचा अवधी शिल्लक होता. सभागृहात महत्वाच्या प्रश्नावर चर्चा सुरु होती. पण सत्तारुढ पक्षाचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून बाजूला उभे राहिल्यामुळे सभागृहात गोंधळाची स्थिती निर्माण झाली. त्यामुळे आपल्याला सभागृहाची बैठक पुन्हा स्थगित करावी लागली.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, प्रश्नोत्तराची वेळ 15 मिनिटापर्यंत वाढवून द्यावी अशी आमची मागणी आहे. कारण सिंचनाचा महत्वाचा प्रश्न अपूर्ण राहिलेला आहे. सिंचनाच्या कामांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार झालेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून माननीय सभापतींच्या आसनाजवळील मार्गिकेमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन आपल्या जागेवर बसावे. सन्माननीय सदस्यांची सभागृहामध्ये कामकाज करण्याची इच्छा आहे काय ?

श्री. विनोद तावडे : प्रश्नोत्तराचा तासातील वाया गेलेला वेळ आम्हाला वाढवून द्यावा.

उप सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला होता. त्यानंतर मी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना वाचत होतो. त्यावेळी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी बोलण्याची परवानगी मागण्यासाठी हात वर केला. मी त्यांना बोलण्याची परवानगी दिली. माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या बोलण्यामध्ये व्यत्यय आणू नका असे मी सांगत होतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी कोणावर हेत्वारोप केलेला नाही. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकत घेता येत नाही. सत्तारुढ पक्षातील काही सन्माननीय सदस्य आपल्या जागा सोडून खाली येऊ लागले होते त्यावेळी आम्ही आमच्या जागेवरच होतो. राज्याच्या आणि शेतक-यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या अशा प्रश्नावरील चर्चा चालू असताना 15-20 मिनिटांचा जो वेळ वाया गेला तो वेळ वाढवून द्यावा. माननीय मंत्री महोदयांना सभागृहामध्ये बोलवावे. आम्हाला प्रश्न विचारावयाचे आहेत. ते प्रश्न विचारल्यानंतर आपण पुढचे कामकाज घ्यावे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे हे आता जे काही बोलले त्यावर माझा हरकतीचा मुद्दा आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी आपल्या जागेवर बसावे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रश्नोत्तराचा तास वाढवून द्यावा असे सांगितले. मला प्रश्नोत्तराचा तास तहकूब करावा लागला याचे कारण प्रश्नोत्तराच्या तासामध्ये स्तब्धता पाळणे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना बंधनकारक आहे. मी कुणावर हेत्वारोप करीत नाही. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मला कामकाज करणे अश्यक्यप्राय झाले. वेळेचे बंधन असल्यामुळे 12.00 वाजता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती...

आता मी पुढील कामकाजाकडे वळतो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "कोल्हापूर जिल्ह्यात सर्वत्र महिन्याभरापासून काविळीची साथ मोठ्या प्रमाणात पसरलेली असून त्याची लागण सुमारे 5 हजार लोकांना झाली आहे. दूषित पाण्यामुळे साथ पसरुन त्यात 10 ते 15 लोकांचा मृत्यू झाला असून काही रुग्ण गंभीर स्थितीत आहेत, कोल्हापूर महानगरपालिका, जिल्हा परिषद व इचलकरंजी नगरपालिकेतर्फे पाणी दूषित होऊ नये याकरिता कोणती तातडीची उपाययोजना करण्यात आली आहे, काविळीची साथ आटोक्यात आणण्यासाठी शासनाच्या अधिका-यांकडून त्वरित कार्यवाही न झाल्याने काविळीची साथ पसरुन त्याचा त्रास लोकांना झालेला आहे, त्यामुळे संबंधित अधिका-यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे." या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्तावाचीसूचना दिलेली आहे.

हा विषय आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवरील कामकाजामध्ये समाविष्ट नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र हा विषय महत्वाचा असल्यामुळे मी या विषयावर सोमवार दिनांक 16 जुलै 2012 रोजी एक तासाची चर्चा देत आहे.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य मार्गिकेमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

पृ.शी./मु.शी.: आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवणे

श्री. भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्यमंत्री) सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सन 2012 च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक 15 मार्च ते 20 एप्रिल 2012 या कालावधीत माननीय मंत्री/माननीय राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण 790 आश्वासनांची यादी मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली आश्वासनांची यादी छापावी.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीचे विवरण सभागृहासमोर ठेवणे

श्री. भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सन 1986च्या चौथ्या अधिवेशनापासून ते सन 2012च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनापर्यंतच्या कालावधीत विधानपरिषदेत देण्यात आलेल्या एकूण 331 आश्वासनांवरील कार्यवाहीच्या पूर्ततेसंबंधीच्या माहितीच्या विवरणपत्रांची यादी सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : विवरणपत्रांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबति जोडलेली आश्वासनांची यादी छापावी.)

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वयेच्या सूचना

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

उप सभापती : आता नियम 93 अन्वयेच्या सूचना घेण्यात येतील.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील, यांनी " खालापूर जवळ मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर एका लग्नाच्या वऱ्हाडाच्या तीन वाहनांना टेम्पो चालकाने उल्हासनगरकडून येऊन जोरदार धडकल्यामुळे झालेला अपघात " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार यांनी "आश्रमशाळांमधील कंत्राटी तत्वावर गेली 10 वर्षे काम करणाऱ्या शिक्षक शिक्षकेतरांना रिक्त पदांवर सामावून घेण्याकरिता शिक्षक-शिक्षकेतरांनी केलेला अन्नत्याग सत्याग्रह " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी " मौजे चुळणे, जि.ठाणे येथील श्रीमती जयश्री सुरेश घरत व इतर 27 कुटुबीयांच्या नावे सामाईक मालकीची असलेली जमीन 7/12 उताऱ्यावर असलेल्या व्यक्तींना अंधारात ठेवून बिनशेती परवानगी देणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी " रत्नागिरी जिल्हयातील खेडशी ग्रामपंचायतीने तेथील रस्त्यांची नोंद आपल्या ग्रामपंचायत क्षेत्राच्या हद्दीबाहेर जावून केल्यामुळे मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाने दिलेल्या अधिकाराचे झालेले अधिक्रमण " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, श्रीमती शोभा फडणवीस, श्री. रामनाथ मोते यांनी "एस.टी.महामंडळात वाहकांतर्फे तिकीट विक्रीकरिता इलेक्ट्रॉनिक तिकीट मशीनचा प्रकल्प राबविण्यासाठी महामंडळाचे अध्यक्ष व संबंधित अधिकारी यांनी ठराव तयार करण्यात येवूनही सदर ठराव मान्य न करता करण्यात येत असलेला मनमानी कारभार " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील, डॉ.रणजीत पाटील यांनी " जागतीक व्यापार केंद्राच्या प्रर्वतकांना सन 1980 मध्ये 71 हजार स्के.फु.जमीन नाममात्र दराने देण्यात येऊनही करारनाम्यातील अटीप्रमाणे अनर्जित उत्पन्नाच्या 50 टक्के एवढी रक्कम शासनाकडे जमा न केल्यामुळे शासनाचे झालेले महसुली नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, परशुराम उपरकर, किसनचंद तनवाणी यांनी " अकोला जिल्हयात गुन्हेगारीचे वाढते प्रमाण तसेच अमरावती पोलीस आयुक्तालयाकडून स्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पुरेशा यंत्रणेचा अभाव व अकोला येथील पोलीस आयुक्तालयांच्या 4 वर्षापासूनच्या प्रलंबित असलेल्या मागण्या " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नियम 93 च्या अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : दूषित पाण्यामुळे नागरिकांमध्ये साथीच्या रोगाची झालेली लागण.

मु. शी. : दूषित पाण्यामुळे नागरिकांमध्ये साथीच्या रोगाची झालेली लागण यासंबंधी श्री.राजेंद्र जैन ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही.)

पृ. शी. : विदर्भात वाढलेला सिंचनाचा अनुशेष

मु. शी. : विदर्भात वाढलेला सिंचनाचा अनुशेष यासंबंधी श्री. पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली नाही.)

पृ. शी. : पटपडताळीत दोषी आढळून आलेल्या रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील अतिरिक्त शिक्षकांना समायोजनाच्या आदेशातून वगळण्याची आवश्यकता.

मु. शी. : पटपडताळीत दोषी आढळून आलेल्या रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील अतिरिक्त शिक्षकांना समायोजनाच्या आदेशातून वगळण्याची आवश्यकता. यासंबंधी श्री रामदास कदम ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली नाही.)

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : कामकाज पत्रिकेत दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक 4 पुढे ढकलण्यात आली आहे.

पृ. शी. : राज्यातील मत्स्य व्यावसायिकांचे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले कर्जाचे प्रस्ताव.

मु. शी. : राज्यातील मत्स्य व्यावसायिकांचे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले कर्जाचे प्रस्ताव यासंबंधी श्री. राजन तेली,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली नाही.)

उप सभापती : सभागृहातील एकंदरीत परिस्थिती पाहता मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.12 ते 02.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. कानडे...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KTG/ D/ D/ MMP/ प्रथम श्री.गिते 14.00

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

विशेष उल्लेख

पृ. शी./मु. शी. : कोकणात पर्यटनाला चालना देण्यासाठी तरंगती हॉटेल उभारण्याबाबत श्री. सुभाष चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

" कोकणातील किनारपट्टीवर गोव्यासह भारतातल्या किनारपट्टीवरील पमुख पर्यटन स्थळी समुद्रात तरंगणारी हॉटेल्स् आहेत त्याच पार्श्वभूमीवर कोकणात पर्यटनाला चालना मिळण्यासाठी सिंधुदुर्ग, रत्नागिरी व अलिबाग या तीन प्रमुख ठिकाणी तरंगती हॉटेल्स उभारण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर तातडीने निर्णय घेऊन राबविण्यात आल्यास कोकणात पर्यटनाला चालना मिळून पर्यटकांची संख्या वाढण्यास व कोकण विकास होण्यास मोठी मदत होईल. सदर प्रस्तावाला सीआरझेडचा अडथळा येत असल्यास जहाज धोरण आखावे किंवा केरळ व गोवा या उद्योगांनी सीआरझेडमध्ये शिथिलता आणण्यात आली त्याप्रमाणे महाराष्ट्रातही सीआरझेडमध्ये शिथिलता आणावी. समुद्रात तरंगत्या हॉटेल्सचा प्रस्ताव राबविल्यास कोकणाचा विकास होण्याबरोबरच तरुणांना रोजगारही उपलब्ध होईल. यामुळे महाराष्ट्रातील रत्नागिरी, अलिबाग , नवी मुंबई आणि मुंबई अशा चार प्रमुख ठिकाणी ही संकल्पना राबविण्याचा निर्णय घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखद्वारे सूचना देत आहे. कृपया स्वीकृत करण्यात यावी, ही विनंती."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, " कोकण हा संपूर्ण डोंगराळ भाग असल्यामुळे दरवर्षी पावसाळयात डोंगराच्या दरडी कोसळून अनेकदा कोकण रेल्वेची सेवा विस्कळीत होऊन प्रवासी 12-12 तास प्रवासात अडकले जात असल्याचे नेहमीच आढळून आले आहे. चिपळूण, गुहागर व रत्नागिरी या रेल्वे मार्गावर दरडी कोसळण्याचे प्रकार मोठया प्रमाणात घडत असतात. यामुळे कराड-चिपळूण 65 कि.मी.अंतर असलेल्या मार्गावर पर्यायी रेल्वेमार्ग सुरु केल्यास कोकण मार्गावर दरडी कोसळून विस्कळीत होणाऱ्या रेल्वे प्रवाशांचा प्रवास सुखकर होण्यास मदत होईल. लवकरात लवकर मुंबई शहर गाठता येईल. त्यात वेळ वाचेल, यासाठी राज्य शासनाने केंद्रीय रेल्वे विभागाला शिफारस करावी, यासाठी मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. कृपया स्वीकृत करण्यात यावा ही विनंती."

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : बीड जिल्हयात शेततळयांचा कार्यक्रम विशेषबाब म्हणून राबविण्याबाबत ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

" बीड जिल्हा नेहमी दुष्काळाच्या छायेत असणे, जलसंधारणाची अनेक कामे होणे, या कामी शेततळयांचा कार्यक्रम शासनाने मोठया प्रमाणात राबविण्याचा निर्णय घेणे, जिल्हयात अनेक वर्षापासून शेततळयाची योजना राबविणे, या योजनेचा अनेक शेतकऱ्यांनी लाभ घेणे, यावर्षीच्या योजनेत शासनाने अनेक जिल्हयात शेततळयाची योजना मंजूर करणे, परंतु 2012-13 या वर्षात बीड जिल्हयास शेततळयाचा कोटा शासनाने न देणे, अनेक शेतकऱ्यांचे प्रस्ताव शेततळयासाठी कृषी कार्यालयात प्रलंबित असणे, त्यामुळे जिल्हयातील शेतकऱ्यात पसरलेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत जिल्हयात शेतकऱ्यांच्या शेततळयांना विशेष बाब म्हणून मान्यता द्यावी अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे ".

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचा मुद्दा

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, बीड जिल्हयामध्ये सुरुवातीला जो पाऊस झाला तो उशिरा झाला आणि कमी प्रमाणात झाला. म्हणून कापसाच्या उत्पादनात घट झालेली आहे. सोयाबीनची लागवड करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढू लागला आहे. सोयाबीनच्या बियाण्यांची मागणी मोठया प्रमाणात होत आहे. 1300 ते 1350 रुपये प्रती बॅग या दराने उपलब्ध होणारे बियाणे आता 1700 रुपयांवर गेले आहे. बाजारातून बियाणे गायब करुन कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा व्यापाऱ्यांकडून प्रयत्न होत आहे. शासनाने सोयाबीनचे बियाणे निश्चित केलेल्या किंमतीत शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी उपाययोजना करावी. शेततळ्यांचा प्रश्न असो की सोयाबीनच्या बियाण्यांचा प्रश्न असो, दोन्ही विषय हंगामाशी संबंधित असल्यामुळे मंत्री महोदयांना या संदर्भात आपण निर्देश द्यावेत अशी मी विनंती करते.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : मंत्री महोदय, आपण या मुद्याची नोंद घ्यावी.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : स्वस्त धान्य योजनेमध्ये बायोमेट्रिक पध्दतीने संगणकीकरणाचा अवलंब करणे याबाबत श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : मा□□□य सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते.

जीवनावश्यक वस्तूंचा मोठया प्रमाणात होणारा काळाबाजार, पात्र लाभार्थ्यांना धान्य न मिळणे, अन्न पुरवठा विषयक योजनांमध्ये भ्रष्टाचार होणे, या बाबींवर आळा घालण्यासाठी अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्रालयाने बायोमेट्रिक पध्दतीने संगणकीकरण करण्याची केलेली घोषणा, मात्र आजतागायत प्रशासन स्तरावर अंमलबजावणी न केल्यामुळे ही योजना पूर्णत्वास न येणे, ही योजना केल्यास स्वस्त धान्य दुकान हे तहसील कार्यालय आणि मंत्रालयास जोडले जाणार होते. मात्र अद्याप योजना पूर्ण न होणे, सदर योजना पूर्णत्वास आणण्यासाठी राज्यातील गोरगरीब जनतेला स्वस्त धान्य पुरवठा होण्यासाठी या आधुनिक योजनेचा पाठपुरावा करुन योजना कार्यान्वित करण्यात यावी, अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचा मुद्दा

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाची आवड निर्माण व्हावी यासाठी केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाने कोट्यवधी रुपयांचे अनुदान देऊन ॲवार्ड स्कीम जाहीर करुन विद्यार्थ्यांकडून संशोधक, वैज्ञानिक घडविण्याचा उपक्रम गतवर्षापासून सुरु करण्यात येणे, राज्यात या अंतर्गत विज्ञान प्रदर्शने प्रति वर्षात जुलैपूर्वी घाईगडबडीत भरविण्याचा घाट शासनाने घातल्यामुळे गतवर्षी 12 हजार विद्यार्थी या प्रदर्शनात सहभागी न होणे, त्यामुळे कोट्यवधी रुपये मंजूर असताना केंद्राची महत्वाकांक्षी योजनेचे नियोजन योग्य पध्दतीने अंमलबजावणी न होणे, त्यामुळे विद्यार्थ्यांना सदर कार्यक्रमात समाविष्ट होण्यास येत असलेल्या अडचणी, याबाबत शासनाने सदर ॲवार्ड कार्यक्रम प्रतिवर्षीच्या माहे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : मुंबईतील वाहतूक शाखेतील पोलिसांना
पावसाळी रेनकोट मिळण्यास होत असलेला
विलंब यासंबंधी श्री.जयवंतराव जाधव,
वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : मा□□य सदस्य श्री.जयवंतराव जाधव यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

जुलैचा पहिला आठवडा लोटला तरी मुंबईतील वाहतूक शाखेतील 3500 पोलिसांना यंदा पावसात भिजत डयुटी करण्याची आलेली वेळ, पोलिसांना रेनकोट पुरविण्यासाठी अनेक कंपन्या तयार आहेत. मात्र प्रायोजकांकडून रेनकोट घेण्याबाबत वाद असणे, त्यामुळे यंदा प्रायोजक कंपन्यांकडून रेनकोट मिळणे दुरापास्त झालेले असणे, वाढती लोकसंख्या व वाहनांच्या प्रचंड गर्दीमुळे वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस गंभीर होत असून मुंबई महानगरात वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब असणे, वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी मुंबई पोलीस दलामध्ये स्वतंत्र वाहतूक शाखा कार्यरत असणे, मुंबईतील वाहतूक पोलिसांचे काम निश्चितच प्रशंसनीय असे आहे, उन्हाळा, पावसाळा व हिवाळा या तिन्ही ऋतूमध्ये वाहतूक पोलीस ऊन, पाऊस आणि वाऱ्याची तमा न बाळगता आपले काम अत्यंत प्रामाणिकपणे करीत असणे, मुंबईतील पोलिसांमार्फत वाहतूक व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यात येत असून या वाहतूक पोलिसांना दरवर्षी पावसाळ्यात एखादी व्यावसायिक कंपनी रेनकोट पुरवित असणे, त्यावर मुंबई पोलिसांबरोबरच स्वत:च्या कंपनीचा लोगो छापलेला असतो, मात्र यंदा प्रायोजकांकडून रेनकोट घेण्याबाबत वाद आहे तर सरकारी रेनकोटही लाल फितीत अडकलेले असल्यामुळे या वाहतूक पोलिसांना पावसात भिजून डयुटी करावी लागत आहे. या बाबीची शासनाने दखल घेऊन वाहतूक पोलिसांना तातडीने रेनकोट पुरविण्याची कार्यवाही करावी, अशी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मागणी करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचा मुद्दा

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, नाशिक जिल्हयातील सप्तश्रृंगी गडावरील सप्तश्रृंगी निवासिनी देवी येथे रोज हजारे भाविक दर्शनासाठी येत असणे, या ठिकाणी दर मंगळवार, पौर्णिमा व नवरात्रौत्सवात लाखो भाविकांची होणारी गर्दी, भाविकांची संख्या व येथे येणा-या पर्यटकांच्या मानाने मुलभूत सोयी सुविधांचा असलेला अभाव, या ट्रस्टमध्ये स्थानिक भक्त किंवा सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना स्थान न दिल्याने येथील प्रश्न सोडविण्याबाबत ट्रस्ट गंभीर नसल्याची स्थानिक नागरिकांची असलेली भावना, सप्तश्रृंगी गडावर व मंदिराच्या परिसरात अनेक मुलभूत सोयी सुविधांचा अभाव असणे, ट्रस्टकडून प्रसादालयासाठी खरेदी केल्या जाणाऱ्या वस्तू व अन्य बहुतांश वस्तूंची खरेदी विना निविदा केली जात असल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये याबाबत व्यक्त होणारा संशय, ट्रस्टमध्ये अनेक वर्षापासून अल्प मानधनावर व कंत्राटी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम करणेबाबत तसेच रिक्त पदे भरण्याबाबत होत असलेली मागणी, शासनाने स्थानिक भाविक व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या येथील कार्यकर्त्यांना ट्रस्टवर स्थान देण्याबाबत तसेच आगामी नवरात्र उत्सवामध्ये किमान मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करावी, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. :औचित्याचा मुद्दा

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

" पुणे शहरातील सद्य:स्थितीत वाहनांची संख्या लक्षात घेऊन पुणे महानगर पालिकेने शहरांसह उपनगरातील प्रमुख रस्त्यांवर फुटपाथ व सायकल मार्ग बांधण्यात येणे, परंतु पुणे महानगर पालिकेच्या प्रशासनाने योग्य त्यावेळी दखल न घेणे, परिणामी सर्वच रस्त्यातील फुटपाथवर कमी अधिक प्रमाणात व्यावसायिकांनी अतिक्रमण करणे, अनेक फुटपाथ मार्गाचा वापर वाहने पार्किंगसाठी करण्यात येणे, शहरातील सर्वच फुटपाथ हे विक्रेत्यांच्या मालकीचे झाले असल्याचे दिसणे, शहरात झालेल्या अतिक्रमणासाठी पुणे महानगर पालिकेचे प्रशासन विभाग व अतिक्रमण विभाग विक्रेत्यांना पाठीशी घालत असल्याचे दिसून येणे, पुणे महानगर पालिकेच्या प्रशासनाबाबत तसेच अतिक्रमण विभागाकडून अतिक्रमण धारकांवर कार्यवाही होणेबाबत शासनाने केलेली वा करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

पृ.शी./मु.शी.: विदर्भात महसूल अधिकाऱ्यांची मोठ्या प्रमाणात रिक्त असलेली पदे भरणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यात विशेषत: विदर्भात मोठ्या प्रमाणात महसूल अधिकाऱ्याचे रिक्त पदे असणे, चंद्रपूर जिल्ह्यात माहे मे, 2012 पर्यंत रिक्त पदांची स्थिती मोठ्या प्रमाणात असणे, त्यातच अप्पर जिल्हाधिकारी 1 पद रिक्त, उप जिल्हाधिकारी 14 मंजूर पदांपैकी 8 पदे भरली असून अद्याप 6 पदे रिक्त असणे, त्यातच जिल्ह्यात 57 नायब तहसीलदारची आवश्यकता असताना फक्त 16 नायब तहसीलदार कार्यरत असून 41 पदे रिक्त असणे व तहसीलदार 19 पदांपैकी फक्त 9 पदे कार्यरत असून 9 पदे रिक्त असणे, त्यातच अमरावती महसूल विभागातील उप जिल्हाधिकारी दर्जाचे 12 पदे रिक्त असणे, त्यातच विदर्भात व विशेषत: नागपूर विभागात बऱ्याच तालुक्यांना तहसीलदार व नायब तहसीलदार नसणे, त्यामुळे प्रभारी तहसीलदार म्हणून बऱ्याच ठिकाणी तहसील कार्यालयातील नायब तहसीलदारांकडे पदभार असणे, त्यामुळे शैक्षणिक कामे वेळेवर होत नसल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहण्याची येणारी वेळ, त्यातच महसुलीची कामे वेळेवर होत नसल्यामुळे नागरिकांना वारंवार चकरा मारण्याची येत असलेली पाळी, त्यामुळे कामात निर्माण होत असलेला अडथळा, सदर पदे भरण्याबाबत लोक प्रतिनिधींनी या नात्याने वारंवार पत्रव्यवहार करुनही न झालेली कार्यवाही, सदर रिक्त पदे भरण्याची अत्यंत आवश्यकता, शासनाने यावर त्वरित करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. :औचित्याचा मुद्दा

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"चंद्रपूर जिल्ह्यातील मुल नगरपरिषद अंतर्गत शहराला पाणीपुरवठा करण्याकरिता जलशुध्दीकरण योजना सुरु करण्यात येणे, परंतु सदर योजने अंतर्गत जलशुध्दीकरणाचे पाणी पुरवठा होत नसल्याने सदर शहरातील नागरिकांना अशुध्द पाण्याचा पुरवठा होणे, सदर जलशुध्दी केंद्रात दुर्लक्ष होत असल्याने व सदर पाणी जलशुध्दी करणाकरिता रेती व तुरटीचा योग्य वापर होत नसल्यामुळे गाववासीयांना अशुध्द पाण्याचा होत असलेला पुरवठा, त्यामुळे शहरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली साथीची लागण, त्यामुळे मुल ग्रामीण रुग्णालयात डायरिया आजाराच्या रुग्णांची झालेली वाढ, रुग्णालयात रुग्णांची मोठ्या प्रमाणात धाव असल्याने रुग्णालयात जागा अपुरी पडणे, त्यामुळे नागरिकांमध्ये नगरपरिषद विरुध्द निर्माण झालेला असंतोष, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही."

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मी अत्यंत महत्वाचा औचित्याचा मुद्दा मांडत आहे. गोंदिया जिल्हयातील देवरी तालुक्याअंतर्गत ग्राम मकरधोकडा येथील कृष्णा सहयोगी तंत्र शिक्षण संस्थेद्वारा संचलित स्वामी रामकृष्ण अनुदानित आश्रमशाळेत सहा विद्यार्थ्यांना दिनांक 12.7.2012 रोजी सर्पदंश झाला असून त्यात दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला व चार विद्यार्थी गंभीर आहेत. या विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल केलेले आहे. तोमेश बरतू थाटमुर्रा - 6 वर्षे, भोजराज मरई 14 वर्षे, नुतन तुमरेकी 12 वर्षे, निक्की रमेश सोरी 14 वर्षे, महेश ऊईके 11 वर्षे व कपिल सोनार 14 वर्षे अशी विद्यार्थ्यांची नावे आहेत. सर्पदंशामुळे ज्या 2 विद्यार्थ्यांचा मृत्यू झालेला आहे त्यांना केवळ 15 हजार मदत दिलेली आहे. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची झोपण्याची सोय गादीवर करण्यात आलेली आहे. आश्रमशाळेत त्या दिवशी 140 विद्यार्थी खाली झोपलेले होते. सदर घटना अत्यंत गंभीर आहे. आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध नसल्यामुळे आश्रमशाळेच्या संचालकावर कायदेशीर कारवाई करण्याची गरज आहे. या घटनेमध्ये अधीक्षकांवर तसेच चराशावरच कारवाई झालेली आहे. या घटनेच्या संदर्भात देवरी येथे मोठया प्रमाणात आंदोलन होत आहे. या घटनेमध्ये जे विद्यार्थी सर्पदंशाने मृत्यू पावले आहेत व जखमी झालेले आहेत त्यांना जास्त प्रमाणात मदत करावी अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी सर्वात प्रथम आपले आभार मानतो. ठाण्याच्या त्रिभाजनाचे घोंगडे गेल्या पाव शतकापासून भिजत पडलेले आहे. आता ठाण्याच्या त्रिभाजनाचा निर्णय झालेला आहे. ठाणे जिल्हयाचे त्रिभाजन करतांना ठाणे मुख्यालयामध्ये नवी मुंबई- ठाणे ते मीरा भाईंदर हा भाग ठाणे जिल्हयामध्ये तर कल्याण मुख्यालय असलेल्या जिल्हयामध्ये कल्याण-भिवंडी-शहापूर-मुरबाड-उल्हासनगर-अंबरनाथ तसेच वसई जिल्हयामध्ये मुख्यालयामध्ये वसई-पालघर-डहाणू-तलासरी-जव्हार-विक्रमगढ-वाडा-मोखाडा या भागाचा समावेश आहे.

सभापती महोदय, आदिवासी भागातील लोकांची अशी मागणीच नाही तर त्यासाठी ते आंदोलनही करीत आहेत. डहाणू-तलासरी-मोखाडा-विक्रमगढ-वाडा यांचे मुख्यालय जव्हार येथे ठेवावे अशी मागणी करीत आहे. या ठिकाणी लोकप्रतिनिधींची भेट घेण्यासाठी शासकीय अधिकारी जाणार आहेत. या भागात साधारणपणे 22 लाख आदिवासी राहतात. आदिवासींची फरपट होऊ नये व त्यांना वसईपर्यंत जावे लागू नये म्हणून त्यांचे मुख्यालय जव्हार येथे असावे अशी मागणी आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालून त्यांचे मुख्यालय जव्हार येथेच ठेवावे व आदिवासी जनतेला न्याय द्यावा अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, संपूर्ण स्वच्छता अभियानाअंतर्गत सन 2011 पर्यंत 80,69,000 शौचालय बांधण्याचे आल्याचे स्पष्ट झालेले आहे. परंतु नुकत्याच झालेल्या पुनर्रतपासणीमध्ये प्रत्यक्षात 49,58,000 एवढीच शौचालये बांधण्याचे आल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे 31,10,000 शौचालयांची कागदोपत्री नोंद आहे काय याची तपासणी होण्याची आवश्यकता आहे. या नोंदीचा उपयोग निर्मल ग्राम पुरस्कार मिळवण्यासाठी होत असतो. विशेषत्वाने धुळे, गडचिरोली, परभणी व उस्मानाबाद जिल्हयात शौचालये ही केवळ कागदोपत्रीच असल्याची नोंद आढळून आली आहे. पुरस्कारासाठी तात्पुरती कच्ची शौचालये उभारण्याचा प्रकारही उघडकीस आलेला आहे. जास्तीत गावांना हा पुरस्कार मिळावा यासाठी ठिकठिकाणी प्रशासन व्यवस्थेवर दडपण आणल्याचे उघड झाले आहे. सर्व्हेक्षणानुसार ग्रामीण भागात जवळ जवळ 62 टक्के भागात अजूनही शौचालय नसल्याचे नमूद केले आहे. अजूनही 3.82 कोटी भागातील लोक शौचालयाचा वापर करीत नाही अशी धक्कादायक माहिती उपलब्ध झाली आहे. पुरस्कारासाठी नव्हे तर या सर्व योजनेत सुधारणा होण्याची आवश्यकता असून विशेषत्वाने महिलांसाठी शौचालय बांधण्यासाठी शासनाने प्राधान्यक्रम द्यावा अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : बालगुन्हेगारीच्या प्रमाणात होत असलेली वाढ
याबाबत श्री.मोहन जोशी वि. प. स.
यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सातत्याने वाढणारी लोकसंख्या आणि रोजगाराची मर्यादित साधने यामुळे झटपट श्रीमंत होण्याची स्वप्ने पाहणारी शाळा कॉलेजातील मुले आपले व कुटुंबियांचे पोट भरण्याकरिता गुन्हेगारीकडे वळत आहेत. बाल गुन्हेगारासंबंधी गेल्या वर्षी देशभरात एकूण 25 हजार 125 गुन्ह्यात पकडलेले आरोपी 16 ते 18 वर्षाखालील होते. हे बालगुन्हेगारीचे प्रमाण एकूण गुन्हेगारांच्या 63.5 इतके आहे. यावरून बालगुन्हेगारांची समस्या किती दाहक झाली आहे हे स्पष्ट होते. या वयोगटातील गुन्हेगारांकडून होणाऱ्या चोरीच्या गुन्ह्यात महाराष्ट्र राज्याचा पहिला क्रमांक लागतो. अपचारी बालकांची काळजी घेणे, त्यांचे संरक्षण करणे आणि वयस्करांसाठी असलेली न्यायिक यंत्रणा, एखाद्या बालकासाठी लागू करू नये याकरिता बाल न्याय कायदा अंमलात असला तरी आजच्या काळातील बदलत्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा विचार करता मुले कमी वयात सज्ञान होत असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी 26.5 टक्के लोकसंख्या मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद आणि ठाणे या शहरात राहते. येथील साक्षरतेचे प्रमाण 90 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. एका पाहणी अहवालानुसार रोजगाराच्या संधी अभावी मुले गुन्हेगारीकडे वळत असल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यातील संघटित गुन्हेगारी टोळ्याच नव्हे तर दहशतवादी व नक्षलवादी कृत्यांमध्ये मुलांचा सहभाग वाढतो आहे. कारण या तरुणांना गुन्हेगारी पार्श्वभूमी नसल्याने ते पोलिसांच्या हाती लवकर लागत नाहीत. अशा गुन्हेगारी कृत्यात सहभागी असणारे, बाल न्याय कायद्यातील तरतुदींचा गैरफायदा घेत आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी...

या गुन्ह्यात कायद्यातील तरतुदीमुळे पोलिसांच्या तपासावर मर्यादा पडतात. मुलांना पोलीस कस्टडी मिळत नाही. पोलीस पुरावे गोळा करू शकत नाही. परिणामी बाल गुन्हेगारांवरील आरोपांची सुनावणी दीर्घकाळ चालते. पोलिसांना तपास करण्याची संधी मिळत नाही. यामुळे बाल न्याय कायद्यात मुलांच्या वयाचा निकष आणि इतर तरतुदीत बदल करण्यासंदर्भात राज्य शासनाने यापूर्वीच केंद्राकडे पाठविलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करणे आवश्यक झाले आहे. विधान परिषद सभागृहात तारांकित प्रश्नाद्वारे व इतर माध्यमातून अनेकवेळा सदरहू प्रश्न उपस्थित करूनही शासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. तरी या संदर्भात शासनाने बाल न्याय कायद्यात मुलांच्या वयाचा निकष आणि इतर तरतुदीत बदल करण्या संदर्भात तातडीने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, पुणे शहर हे राज्यातील मुंबई शहरानंतरचे दुसरे मोठे महानगर असून त्याची वाढ झपाट्याने होत असणे, पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील लोकसंख्या 60 लाख असून ते शैक्षणिक, ऐतिहासिक, औद्योगिक व आय.टी.क्षेत्रात जागतिक पातळीवर प्रसिद्ध होत असणे, शहरामध्ये आज 31 लाखांपेक्षा अधिक संख्येने वाहने असून दररोज 500 नवीन वाहनांची त्यात भर पडत असणे, नवीन उपनगरे तयार होत असून शहर व शहरातील लोकसंख्येची घनता वाढत असून परंतु रस्त्यांच्या मर्यादित क्षेत्रावर वाहन संख्येच्या घटनतेमुळे शहरातील वाहतूक अस्ताव्यस्त होत असणे, पुणे शहर वाहतूक सुधारणांकरिता वाहतूक विभागाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावांना अद्याप मान्यता मिळालेली नसणे, त्यात पोलिसांकरिता अद्ययावत नियंत्रण कक्ष, शहरातील रस्ते व चौकातील वाहतुकीचे नियंत्रण व नियमन करण्याकरिता सर्व्हेलन्स कॅमेरे बसविण्याकरिता केवळ 6 कोटी 66 लक्ष रूपयांचा प्रस्ताव माहे एप्रिल 2009 पासून शासनाकडे तत्कालीन उप मुख्यमंत्र्यांकडे झालेल्या बैठकीत तत्त्वत: मान्यता मिळून देखील प्रलंबित असणे, ट्रॅफिकॉप ही प्रणाली पुणे शहरात प्रायोगिक तत्वावर अत्यंत यशस्वी झाल्यामुळे संपूर्ण पुणे शहराकरिता कायम स्वरूपी राबविण्याकरिता शासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठवूनही मागील दोन वर्षे उलटूनही शासनाचा ट्रॅफिकॉप प्रणालीवरील विचार अद्यापपूर्ण झालेला नसणे, तसेच पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये वाहतुकीच्या बाबतीत गोडबोले समितीच्या अहवालातील शिफारशींवर आधारलेल्या पुणे शहर वाहतूक सुधारणा प्रकल्पास राज्य शासनाची मंजुरी अद्याप प्रलंबित असणे, पुणे वाहतूक शाखेकडे असलेली वाहने अपुरी आहेत. अधिकची 40 जीप, 5 लाईट व्हॅन, 154 मोटार सायकल, 1 कॅरिअर, 2 ट्रक आणि 1 बस मिळण्याकरिता सन 2009 पासून वारंवार मागणी करूनही अद्याप शासनाने दिलेली नसणे, पुणे वाहतूक शाखेकरिता अभियंत्यांची अत्यंत आवश्यकता असून वाहतूक अभियांत्रिकीचे ज्ञान असलेल्या अभियंत्याच्या पद निर्मितीच्या प्रस्तावासही शासनाने अद्याप मान्यता दिलेली नसणे, वाहतूक विभागाकरिता आवश्यक असणाऱ्या जागांची तरतूद राज्य शासनाने अद्याप केलेली नाही. परिणामी पुणे शहरातील वाहतुकीचा पुरता बोजवारा उडालेला आहे.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी.....

बँगलोर, कलकत्ता, चेन्नई, दिल्ली व हैद्राबाद या महानगरामध्ये वाहतुकीशी संबंधित सिग्नल, रोड मार्कींग, सूचना फलक, सर्वेलन्स कॅमेरे, या व अशा अनेक साधन सामुग्रीकरिता निधी शासनाने उपलब्ध करुन दिला आहे. महाराष्ट्रात मात्र अशी कामे स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविण्यात आली आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांवर असलेल्या मर्यादा व त्यांच्याकडूरन योग्य प्राधान्यक्रम दिले जात नसल्यामुळे असे प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविले आहेत. परंतु असे अनेक प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित आहेत या बाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाकडे करीत आहे".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : सेवानिवृत्त होणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टर्सना दोन ते पाच वर्षाची मुदतवाढ देणे याबाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"माणसाच्या जीवनावश्यक गरजांमध्ये आरोग्य या घटकाचा समावेश करण्यात येणे, महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्वसामान्य रुग्णांसाठी रुग्णालयांचे जाळे उभे केले असणे, परंतु राज्यातील अनेक रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची उणीव व अडचण भासत असणे, अशावेळी रुग्णांना खाजगी डॉक्टरांचा महागडा पर्याय स्वीकारण्याशिवाय दुसरा पर्यायच नसणे, अशावेळी शासकीय स्तरावर जे वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत आणि निवृत्तीकडे झुकले आहेत अशा तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांना सेवा काळ दोन ते पाच वर्षासाठी वाढविण्याची आवश्यकता असणे, जनसामान्यांच्या आरोग्यासाठी मुदतवाढ दिल्यास त्याचा फायदा निश्चितच सर्वसामान्यांना होईल. आज अनेक चांगल्या हॉस्पिटलमध्ये तज्ज्ञ डॉक्टर्स मिळत नाहीत. अशा तज्ज्ञ डॉक्टर्सचे पोस्टिंग त्या ठिकाणी झाल्यानंतर सुध्दा ते हॉस्पिटलमध्ये रुजू होत नाहीत. या करिता चांगल्या डॉक्टर्सचे सेवानिवृत्तीचे वय वाढविण्यात यावे. त्यामुळे तज्ज्ञ डॉक्टर्स आपल्याला चांगल्या हॉस्पिटलमध्ये मिळतील. या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका"

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"पालकांमध्ये आणि इयत्ता बारावीला असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे की, जून 2013 ला मेडिकल आणि इंजिनिअरींगचे ॲडमिशन कशापध्दतीने होणार आहेत या बाबत अजूनही महाराष्ट्र शासनामध्ये संभ्रमावस्था आहे. काल मी माननीय शिक्षण मंत्र्यांना भेटलो असता त्यांनी मला मंत्री मंडळापुढे प्रस्ताव आणावयाचा आहे असे सांगितले. जानेवारी महिन्यानंतर इयत्ता 12 वीच्या प्रवेशाकरिता ॲडमिशन देण्याची तयारी सुरु होते. त्यामुळे शासनाने लवकरात लवकर म्हणजे जून 2013 ला सी.ई.टी. नुसार ॲडमिशन होणार आहेत की, केंद्र शासनाने सुचविल्याप्रमाणे इयत्ता 12 वी ला मिळालेल्या मार्क्सना व्हेटेज देऊन ॲडमिशन देणार आहेत या बाबत लवकरात लवकर स्पष्टता होणे आवश्यक आहे. अन्यथा खूप मोठ्या प्रमाणात मुलांचे नुकसान होईल" .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचा मुद्दा

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"गुरुवार दि. 21 जून 2012 रोजी मंत्रालय इमारतीला लागलेल्या आगीच्या घटनेस काही दिवस उलटले असतानाच रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथे गेल्या काही महिन्यापूर्वी नव्याने बांधण्यात आलेल्या जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील बिनतारी संदेश विभागाच्या कक्षातील संचाला दि. 7 जुलै 2012 रोजी आग लागली आहे.

या आगीमध्ये विद्युत यंत्रणा पूर्णत: जळून खाक होऊन त्या मध्ये एकूण 18 लाख 6 हजार 543 रुपये किंमतीची 11 सॉफ्टवेअर उपकरणे जळून नष्ट झाली आहेत.

नव्याने बांधण्यात आलेल्या जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात आग प्रतिबंधक करावयाच्या उपाय योजना अपुऱ्या असल्याचे सिध्द होत असल्यानेच या नव्या बांधकाम झालेल्या इमारतीची अशी अवस्था झाली आहे.

या गंभीर घटनेची योग्य दखल घेऊन शासनाने यावर करावयाची उपाय योजना व कार्यवाही यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : राज्यातील असंघटित कामगारांना किमान वेतन न मिळणे याबाबत श्री.जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्यातील असंघटित कामगारांना किमान वेतन मिळत नसल्यामुळे त्यांच्यापुढे उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. देशात 61 वर्षानंतर केंद्राने केलेल्या किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याने राज्यात 98 लाख असंघटित कामगारांचे दिवसें दिवस शोषण होत आहे.

या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देण्यास शासनाजवळ वेळ नसल्याचे कायद्याच्या अंमलबजावणीवरुन दिसून येत आहे. महागाईचा निर्देशांक सतत वाढत असल्याने सामान्य माणसाला जगणे व दैनंदिन गरजा भागविणे कठीण झाले आहे. कृषी क्षेत्रापासून तर उद्योगातील सर्वच क्षेत्रांमध्ये असंघटित कामगारांचे मोठया प्रमाणात शोषण होत आहे.

कृषी क्षेत्रामध्ये किमान मजुराला 158 रुपये मजुरी मिळावी असे अपेक्षित असून ग्रामीण भागातील मजुरांना फक्त 80 ते 90 रुपये देऊन त्यांचे शोषण केले जात आहे. मजुरांना फक्त 100 ते 150 रुपये मजुरी देऊन त्यांच्याकडून 12 तास काम करुन घेतले जात आहे.

देशात असंघटित उद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या कष्टकरी असंघटित कामगारांची संख्या 39 कोटी 49 लाख असल्याचे केंद्रीय कामगार मंत्रालयातील सर्वेक्षण करण्यात आले असून त्यापैकी एकूण 86 टक्के कामगार अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत.

असंघटित क्षेत्रातील कष्टकरी कामगार सतत कर्जाच्या ओझ्याखाली वावरत असल्याने त्यांच्यात आत्महत्त्यांचे प्रमाण वाढत आहे. सबब या महत्वाच्या व गंभीर बाबीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे".

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये होमिओपॅथी औषधे व सेवा यांची उपलब्धता करुन देणे याबाबत श्री.निरंजन डावखरे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, राज्यातील शासकीय रुग्णालयातून होमिओपॅथी औषधे व सेवा यांची उपलब्धता करुन देणे अत्यंत गरजेचे झाले आहे. हल्लीच्या स्पर्धेच्या युगामध्ये जनतेला आपल्या आरोग्याकडे लक्ष देणे दुरापास्त झाले आहे. शारीरीक व्याधींवर झटपट उपाययोजना करुन काम करण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीमुळे आरोग्याची होत असलेली हेळसांड, त्याचप्रमाणे ॲलोपॅथी औषधे कमी-जास्त प्रमाणात घेतल्यामुळे शरीरावर होणारे दुष्परिणाम, परिणामी वैद्यकीय अधिकाऱ्यांवरील हल्ल्यांचे प्रमाण वाढीस लागणे, तसेच ॲलोपॅथीची औषधे महाग असल्या कारणाने त्याचा खर्च सर्वसाधारण गरीब माणसाच्या आवाक्याबाहेर असणे, या सर्व बाबींचा सर्वतोपरी विचार करता होमिओपॅथीची औषधे व तत्सम बी.एस.एम.एस.डॉक्टरांची सेवा आरोग्य केंद्र व शासकीय रुग्णालयातून उपलब्ध करुन दिल्यास जनतेचे आरोग्य मुळापासून सुधारण्यास मदत होईल. तसेच आर्थिकदृष्ट्या उपचाराची ही पध्दती परवडण्यासारखी असल्यामुळे आणि दुष्परिणामांचा धोका नसल्याने त्याचा लाभ सर्व स्तरावरील जनतेला मिळू शकणार आहे.तसेच राज्यातील बी.एस.एम.एस.डॉक्टरांना सरकारी सेवेची संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होणार आहे.राज्यातील प्रामुख्याने ग्रामीण भागातील जनतेला आरोग्याच्या संबंधातील खात्रीची सेवा स्वस्त दरामध्ये उपलब्ध झाल्यामुळे भोंदूबाबांच्या नादाला लागून होणारी जीवित हानी टाळता येणे शक्य आहे. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र शासकीय रुग्णालयातून होमिओपॅथीची औषधे व सेवा याबाबत तातडीने उपलब्धता करुन देण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी एवढीच मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे.

सभापतीस्थानी तालिका सभापती (श्री केशवराव मानकर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: राज्यातील आरोपींवरील गुन्हे सिध्द होण्याचे प्रमाण कमी असणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाच्या सूचना मांडते. परंतु मला असे सांगावयाचे आहे की, माझ्या दोन सूचना आहेत.

तालिका सभापती (श्री.केशवराव मानकर) : सन्माननीय सदस्यांनी दोन्ही सूचना मांडाव्यात.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ठीक आहे. राज्यामध्ये पोलिसांनी केलेल्या तपासाच्या आधारे आरोपींवरील गुन्हे राज्यात सप्रमाण सिध्द होण्याच्या बाबतीत म्हणजे कन्व्हीक्शन रेटमध्ये महाराष्ट्र राज्य खालून पहिल्या क्रमांकावर असल्याची बाब नुकतीच उघडकीस आलेली आहे.यामध्ये तपास अधिकारी आणि अभियोग चालविणारे सर्व वकील यांच्या कार्यपध्दतीबद्दल देखील प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. खून, महिलांना पळवून नेणे, दरोडे, खूनाचा प्रयत्न इ.गुन्ह्यांच्या बाबतीत राज्याने काही प्रमाणात न्याय मिळविण्याच्यादृष्टीने प्रगती केली असली तरी लैंगिक छळाच्या संदर्भात मात्र राज्याचा क्रमांक वरचा आहे. राज्यामध्ये जबरी चोरी, घरफोडी अशा प्रकारच्या गुन्ह्यांची नोंदणी देखील वाढलेली आहे. तसेच अशा गुन्ह्यांच्या बाबतीत नोंदणी झाली तरी त्याचा तपास लागत नाही. जरी तपास लागला तरी न्यायालयातून आरोपी सुटतात आणि नंतर अपिलामध्ये न गेल्यामुळे त्यासंदर्भात काय योग्य आहे किंवा कोणत्या त्रुटी राहिल्या याची देखील चौकशी होत नाही. किंबहुना अयोग्य पध्दतीने गुन्ह्यांची नोंदणी झाल्यामुळे गुन्हेगार सुटतात हे देखील निदर्शनास आले आहे. शासनाने या गोष्टींची चौकशी करण्यासाठी तीन सदस्यांची एक समिती नेमली होती. सदरहू समितीचा जो अहवाल आला, त्यानुसार कन्व्हीक्शन रेटचे प्रमाण 9 टक्के आहे असे सांगितले आहे. परंतु जवळजवळ 91 टक्के गुन्हेगार सुटतात याबद्दल काय कारवाई केली या विषयाकडे मात्र शासनाने दुर्लक्ष केलेले आहे.म्हणून त्या अहवालातील ज्या शिफारशी आहेत, त्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याच्या संदर्भात शासनाने तत्काळ निवेदन करावे असा माझा विशेष उल्लेख आहे.

. . .. टी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

ज्यावेळेला आम्ही औचित्याचा मद्दा देतो, तेव्हा जे अतिशय गंभीर विषय असतात त्याकडे सभागृहाचे, समाजाचे लक्ष वेधणे हा त्या मागील हेतू असतो. मला कोणाच्याही कार्य पध्दतीवर टीका करावयाची नाही. परंतु याठिकाणी नऊ विशेष उल्लेखाच्या सूचना आणि बारा औचित्याचे मुद्दे एकत्र घेतल्यामुळे औचित्याला सुध्दा विशेष उल्लेखाचा दर्जा मिळालेला आहे. परंतु जनतेचे प्रत्येक वाक्य आणि प्रत्येक शब्द महत्वाचा असतो. माझे जे औचित्य आहे, ते आपण ज्या सभागृहामध्ये काम करीत आहोत . . . .

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी औचित्याचा मुद्दा मांडावा. कारण तशा प्रकारची सर्वांना परवानगी दिलेली आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा यातील मुद्दा असा होता की, विधीमंडळातील ज्या सभागृहामध्ये आपण चर्चा करीत आहोत, त्या सभागृहामध्ये आपण मंत्रालयातील आगीच्या बाबतीत चर्चा केली. परंतु आपण विधान सभा आणि विधान परिषद ही दोन्ही सभागृहे पाहिली तर असे दिसून येईल की, याठिकाणी संपूर्णपणे लाकडी फर्निचरचा उपयोग केलेला आहे.तसेच याठिकाणी जी सभागृहे आहेत तेथील एकही दरवाजा फायरप्रूफ नाही.तसेच येथे संपूर्णपणे गालिचे वापरण्यात आले आहेत.अशा वेळी गोल इमारतीतील पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या मजल्यावर जाण्यासाठी जे जिने आहेत, ते अतिशय छोटे आहेत. आपण विधान मंडळाचे फायर ऑडीट केले आहे असे सांगतो. परंतु आग प्रतिबंधक योजनांच्या दृष्टीकोनातून आम्ही काय काम केले आहे आणि याबाबतीत आम्ही किती जागरुक आहोत असा जर कोणी आपल्याला प्रश्न विचारला तर तोच प्रश्न समाजातील सर्वसामान्य नागरीक सुध्दा त्या-त्या शहरांमध्ये विचारीत आहेत.

(सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)

यानंतर श्री.बरवड . . ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाही नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

मग त्यात नागपूरमधील आपले अधिवेशनाचे सभागृह असेल, किंवा पुणे, औरंगाबाद, अहमदनगर, सोलापूर अशा अनेक महानगरपालिकांची सभागृहे असतील किंवा अन्य शासकीय इमारती असतील त्या इमारतींमधील आरोग्य विषयक आणि खासकरुन आग प्रतिबंधक यंत्रणा जर आपण पाहिली तर खूप प्रश्नचिन्ह तयार होतात.

एक नातेवाईक आजारी असल्यामुळे मी आज एका हॉस्पिटलमध्ये गेले होते. नुकतेच आगीचे प्रकरण झाल्यापासून त्या ठिकाणी आग प्रतिबंधक काय यंत्रणा आहे हे आपण जाऊन पाहू मला असे वाटले. मी त्या ठिकाणी विचारले की, जिना कोठे आहे ? त्यांनी सांगितले की, तिसऱ्या मजल्यावरुन वरच्या मजल्यापर्यंत जिन्याने जाताच येत नाही. आलेल्या लोकांनी लिफ्टनेच जावयाचे आहे कारण लोक घुसखोरी करुन रुग्णांना भेटावयास येतात. तरीही आम्ही जिन्यावरुन उतरत गेलो. त्यावेळी वॉचमनने मला सांगितले की, आपण आमदार असल्यामुळे आता जिन्यावरुन बाहेर जा पण साधारणपणे जिन्यावरुन येण्यास कोणालाही परवानगी नाही. सुरक्षा म्हणून ते ठीक आहे परंतु प्रशासकीय इमारती, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, नगरपालिका, रुग्णालये, पंचतारांकित हॉटेल्स, मॉल, मल्टिप्लेक्स, उंच इमारती या सर्वांची आपत्कालीन व्यवस्था बघत असताना... सभापती महोदय, मागे बसून काही सन्माननीय सदस्य बोलत आहेत. मी त्यांना सांगू इच्छिते की, विधान भवनामध्ये मध्ये सुध्दा कर्मचारी आहेत, या ठिकाणी जनता येते आणि आपल्या प्रतिष्ठेचाही प्रश्न आहे. समाजाच्या दृष्टीकोनातून आपल्यावर फार मोठी जबाबदारी आहे आणि म्हणून एका गंभीर विषयाची वाट लावण्याचे काम सन्माननीय सदस्यांनी करु नये असे मला असे वाटते.

सभापती महोदय, माझा मुद्दा असा आहे की, अधिवेशन संपण्याच्या आत विधिमंडळामध्ये अग्नी सुरक्षेच्या संदर्भात काय पावले उचललेली आहेत या संदर्भात शासनाच्या वतीने निवेदन झाले पाहिजे आणि वेळ पडली तर अधिवेशन चालू असताना एखाद्या वेळी मॉक ड्रील सुध्दा घ्यावी म्हणजे किती लोक खरोखरच दरवाज्यापर्यंत पोहचू शकतात हे आपल्याला कळेल. मला आठवते की, गेल्या अधिवेशनात पाच मिनिटे सभागृहातील लाईट गेली होती. त्यावेळी काय करावे हे कळत नव्हते. स्पीकर चालू नव्हते. मोबाईलच्या बॅटरीवर लाईट लावून आपण बघत होतो. अशा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

परिस्थितीत या ठिकाणी लोकांना रस्ता सापडण्याच्या बाबतीत सुध्दा प्रश्न निर्माण होईल. या ठिकाणी बाहेर लॉबीमध्ये गालीचे आहेत आणि त्याला लागूनच दरवाजे आहेत. याचा जर आपण विचार केला तर देवाच्या भरवशावर आपले चांगले चालले आहे असे मला वाटते. परंतु पुढच्या काळामध्ये आपण आणखी चांगल्या पध्दतीने सद्बुद्धीने यामध्ये सुधारणा केली पाहिजे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी महत्वाच्या व निकडीच्या बाबीसंबंधी माझा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती महोदय, ज्यावेळी 22/11 ला मुंबईवर पाकिस्तानी अतिरेक्यांचा हल्ला झाला त्यावेळी कामा हॉस्पिटलच्या लेनमध्ये आपले महत्वाचे तीन अधिकारी शहीद झाले. त्यामध्ये श्री. करकरे, श्री. साळसकर, श्री. कामटे होते आणि त्यांच्याबरोबर श्री. अरुण जाधव नावाचे हवालदार सुध्दा होते. श्री. अरुण जाधव यांना त्यावेळी पाच गोळ्या लागल्या होत्या. पाच गोळ्या लागल्यानंतरही ते त्या व्हॅनमध्ये निपचित पडून राहिले. ती गाडी अतिरेक्यांनी विधान भवनाच्या समोर आणून सोडून दिली. श्री. अरुण जाधव त्या गाडीत तसेच पडून राहिले. नंतर अतिरेकी स्कोडा गाडीतून पुढे गेले आणि मरीन लाईन्स येथे कसाब पकडला गेला. पण श्री. अरुण जाधव या हवालदाराने पहिल्यांदा आपल्या कंट्रोल रुमला कळविले की, मला गोळ्या लागलेल्या आहेत आणि अतिरेकी स्कोडा गाडीतून पळाले आहेत. त्यानंतर कसाबला मरीन लाईन्सला पकडण्यात आले. त्याच्या या विशेष कामगिरीबद्दल भारत सरकारकडून त्यांना राष्ट्रपती शौर्यपदकाने सुध्दा गौरविण्यात आले. मागच्या 26/11 ला शिवाजी पार्क येथे माननीय नामदार श्री. छगन भुजबळ यांच्या हस्ते श्री. अरुण जाधव यांच्या सत्काराचा कार्यक्रम माझ्या संस्थेने घेतला होता. त्यावेळी श्री. अरुण जाधव यांच्या बाबतीत असे सांगण्यात आले की, त्यांना क्राईम ब्रँचमध्येच ठेवा. कोणी म्हणाले की, त्यांना एटीएसमध्ये ठेवा कारण ते अगोदर एटीएसमध्ये होते.

काल मी विधान भवनात येत असताना एटीएसमध्ये आणि अगोदर क्राईम ब्रँचमध्ये नोकरी करणाऱ्या श्री. अरुण जाधव यांना युनिफॉर्म घालून विधान भवनाच्या बाहेर इतर कॉन्स्टेबल्स बरोबर बंदोबस्तासाठी बघितले. मी त्यांना बोलवून विचारले की आपली बदली तर एटीएस किंवा क्राईम ब्रँचमध्ये झाली आहे. त्यांनी सांगितले की, आता ज्या सर्वसाधारण बदल्या झाल्या त्यामध्ये माझी बदली नायगाव हेडक्वार्टरला सशस्त्र दलामध्ये करण्यात आली आहे. जिवंत असताना भारत सरकारकडून राष्ट्रपती शौर्यपदक मिळालेली महाराष्ट्रातील पोलीस कॉन्स्टेबलमधील ही पहिली व्यक्ती आहे. त्यांना 5 गोळ्या लागल्या. त्यांच्या मदतीमुळे आपण कसाबला जिवंत पकडू शकलो आणि पुढील तपास होऊ शकला. कसाबसाठी आपण एवढा बंदोबस्त देतो, एवढे पैसे खर्च करतो

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

आणि ज्यांच्यामुळे कसाब आपल्याला जिवंत सापडला आहे ती व्यक्ती मात्र नायगाव हेड क्वार्टर येथील सशस्त्र दलामध्ये आणि सध्या विधान भवन येथे इतर कॉन्स्टेबल यांच्याबरोबर काम करीत आहेत. एका पोलीस कर्मचाऱ्याच्या शौर्यौची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून दखल न घेण्यासारखी ही गोष्ट आहे. त्यामुळे पोलिसांचे मनोधैर्य खचून जाईल. अशा घटना वारंवार घडल्याचे आपल्या निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे ही एक विशेष बाब समजण्यात यावी. श्री.अरुण जाधव यांना त्याच मानसन्मानाने एटीएस किंवा क्राईम ब्रँचमध्ये ठेवले जावे. जोपर्यंत कसाब इकडे आहे तोपर्यंत तरी त्यांच्या जीविताला कदाचित धोका असेल हे लक्षात घ्यावे एवढीच मी सरकारला विनंती करतो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा मांडत आहे. मुंबई विभागामध्ये अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने शासनाने आयोजित केली होती. ऑनलाईन प्रक्रिया आता संपुष्टात आलेली आहे. परंतु या प्रक्रियेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा म्हणून कनिष्ठ महाविद्यालय किंवा महाविद्यालय असेल त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात प्रवेश गैरसोयीचा असतानाही घेतलेले आहेत. ऑनलाईनची प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर जवळजवळ 57 हजार जागा रिक्त राहिलेल्या आहेत. उद्यापासून या रिक्त जागा ऑफलाईन पध्दतीने भरण्याची प्रक्रिया सुरु होईल. अनेक विद्यार्थ्यांनी गैरसोयीच्या प्रवेश मिळाला आहे. या विद्यार्थ्यांनी संधी जाऊ नये म्हणून या प्रक्रियेच्या माध्यमातून प्रवेश घेतलेला आहे. या विद्यार्थ्यांना प्राधान्यक्रमानुसार किंवा त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांना कॉलेज मिळालेले नाही. आता त्यांना ऑफलाईन प्रवेश प्रक्रियेमुळे आपल्या सोयीच्या ठिकाणच्या कॉलेजमध्ये प्रवेश घेणे शक्य होणार होते. परंतु शासनाने एक परिपत्रक काढून ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईनद्वारे प्रवेश मिळालेला आहे मग ते कॉलेज गैरसोयीचे असले तरी त्यांना ऑफलाईन प्रवेश पध्दतीने नवीन कॉलेजमध्ये प्रवेश घेता येणार नाही. त्यांना कोणत्याही महाविद्यालयात प्रवेश दिला जाऊ नये असे महाविद्यालयांना कळविलेले आहे. ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर ऑफलाईन प्रवेश प्रक्रियेनुसार प्रवेश देण्याचा अधिकार महाविद्यालयांना द्यावा, त्यांच्यावर कोणतेही निर्बंध घालू नये, ऑफलाईन प्रवेशासाठी शासनाने ज्या जाचक अटी घातल्या आहेत त्या रद्द कराव्या, विद्यार्थ्यांना सोयीच्या ठिकाणी व इच्छेनुसार प्रवेश घेण्याची संधी द्यावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला करीत आहे. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडत आहे. मुंबई शहर व मुंबई उपनगर येथे सर्वत्र कचऱ्याचे ढीग साचले असून दिवसेंदिवस कचरा वाढत आहे. पावसाळा सुरु झाला असूनही हे कचऱ्याचे ढीग महानगरपालिकेने उचलले नसल्यामुळे मुंबई शहर व उपनगरामध्ये कावीळ, मलेरिया इत्यादी साथींची अनेकांना लागण होऊन ती सर्वत्र मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अशा प्रकारच्या घटना प्रत्येक पावसाळ्यात घडत असून महानगरपालिका मात्र अशा गंभीर घटनांकडे दुर्लक्ष करीत असल्याचे आढळून येत आहे. सध्या मुंबई शहर व उपनगर येथे सुरु असलेल्या साथीच्या रोगांना त्वरित आळा घालण्याबाबत तातडीची कार्यवाही होण्याची तसेच पुढे भविष्यात अशा विविध रोगाच्या साथीची लागण होऊ नये. यासाठी खास उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्यात प्रामुख्याने पुणे जिल्ह्यामध्ये स्वाईन फ्लूच्या रुग्णामध्ये वाढ झाली असल्याचे माहे जुलै, 2012 वा त्या सुमारास निदर्शनास येणे, इतर जिल्ह्यांच्या मानाने पुणे जिल्ह्यात स्वाईन फ्लू पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या जास्त असणे, वातावरणात उष्णता कमी झाल्याने विषाणूंच्या वाढीस पोषक वातावरण निर्माण झाल्याने तसेच अधूनमधून येणा-या पासामुळे राज्यात माहे, एप्रिल 2012 पासून 350 स्वाईन फ्लू पॉझिटिव्ह रुग्ण आढळणे, एकूण 17 रुग्णांचे बळी जाणे, अशा परिस्थितीत संबंधित महापालिकांनी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची आवश्यकता असूनही त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिडीची व भीतीची भावना पाहता या अतिशय महत्वाच्या व जिव्हाळ्याच्या विषयावर मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यातील उस्मानाबाद,कोल्हापूर, सातारा, सांगली अशा काही जिल्ह्यामध्ये मुलींमध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण खूप कमी असल्याचे आढळून आलेले आहे. अशा मुलींच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. उस्मानाबादमध्ये 5.1 टक्के, कोल्हापूरमध्ये 1.2 टक्के, सातारा जिल्ह्यामध्ये 1.3 टक्के अशी विविध जिल्ह्याची टक्केवारी आहे. ज्यांची तपासणी झालेली आहे अशा जवळ जवळ 17 लाख मुलींमध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आलेले आहे. ज्या मुलींची तपासणी झालेली नाही अशा मुलींमध्येही हिमोग्लोबीनचे प्रमाणे कमी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. एका बाजूला आपण स्त्रीभ्रूण हत्येच्या बाबतीत युद्ध पातळीवर सामाना करीत असताना, मुलींची संख्या वाढावी म्हणून प्रयत्न करीत असताना राज्यामध्ये अशा ज्या मुली आहेत त्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेऊन त्यांच्यामध्ये हिमोग्लोबीन किंवा अन्य काही कमतरता असतील तर त्या भरुन कशा निघतील या दृष्टीने शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने आपणास कौतुक वाटेल अशी एक गोष्ट मी आवर्जून सांगू इच्छितो की, आपण मुलीला शेळीचे दूध दिले तर तिच्यातील हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढते. मी पुण्यश्लोक अहिल्या देवी मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत एक योजना राबविलेली आहे. 14 वर्षापर्यन्तच्या मुलीला 90 टक्के अनुदानावर एक शेळी आणि एक कोकरु द्यायचे. जर त्या मुलीचे हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढले तर तिला दुसरी शेळी मोफत द्यायची अशी ही योजना आहे. ही योजना आम्ही राबवित आहोत म्हणून मी हे सांगत आहे. जर मुलींमधील हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढवायचे असेल तर त्या त्या घरामध्ये शेळयांचे वाटप केले पाहिजे. आज महिला व बाल विकास मंत्री महोदया सभागृहामध्ये उपस्थित आहेत. हा मुलींच्या आरोग्याचा प्रश्न असल्यामुळे त्यांच्यासाठी ही योजना अतिशय उपयुक्त ठरणारी आहे. माननीय पशुसंवर्धन मंत्री महोदय देखील सभागृहामध्ये हजर आहेत. माननीय मंत्री महोदय प्रा. लक्ष्मण ढोबळे हे देखील सभागृहामध्ये हजर आहेत. ते ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्याच्या बाबतीत कायम सतर्क असतात. तेव्हा मी सांगितलेली योजना शासनाने राबवावी अशी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

घाटगे-परमे (ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग) येथील धारेश्वर माध्यमिक विद्यालय हे अतिदुर्गम व डोंगराळ भागामध्ये कार्यरत असून उत्कृष्ट शैक्षणिक कार्य असणा-या या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन मागील 38 महिन्यापासून विनाकारण, नियमबाह्यरित्या व अन्यायकारकरित्या रोखून ठेवण्यात आल्याचे नुकतेच उघडकीस येणे, सदर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना थकीत वेतन त्वरित देण्याबाबत माननीय लोकप्रतिनिधीनी शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांना लेखी निवेदन दिलेले असूनही शिक्षण उपसंचालक यांच्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग व शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांनी चौकशी समिती नेमूनही उचित कार्यवाही करण्यात न येणे, अशा विविध प्रकारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावर अन्याय करण्यात येऊन त्यांना मागील 38 महिन्यापासून वेतन देण्यात न येणे. त्यामुळे त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची आलेली वेळ, परिणामी त्यांच्यात निर्माण झालेली तीव्र असंतोष व संतापाची भावना,. अशा या अतिशय महत्वाच्या आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या जिव्हाळयाच्या विषयावर मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

--

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : अकोला जिल्हा परिषदेतील शाखा अभियंता सर्वश्री चव्हाण, कुलकर्णी व मावंदे यांनी केलेल्या भ्रष्टाचारा प्रकरणी त्यांच्यावर करावयाची कारवाई याबाबत डॉ. रणजित पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ. रणजित पाटील (अमरावती विभाग पध्दवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"अकोला जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेले शाखा अभियंता श्री. चव्हाण, श्री. कुलकर्णी व श्री. मावंदे यांनी कोल्हापुरी बंधारा बांधण्यामध्ये मोठ्या प्रमाणावर केलेला गैरव्यवहार, त्याबाबतीत विभागीय कार्यालयाकडून त्यांची चौकशी करण्यात येऊन सदर शाखा अभियंत्यावर गैरव्यवहाराबाबत फौजदारी गुन्हा दाखल होणे, त्यांचे निलंबन होणे, परंतु पुन्हा विभागीय कार्यालयाकडून त्यांना दुस-या ठिकाणी पदस्थापनेचे आदेश देण्यात येणे, शासनाच्या करोडो रुपयाच्या निधीचा गैरव्यवहार करुनही संबंधित शाखा अभियंत्यावर न झालेली निलंबनाची कारवाई, त्यामुळे शासनाच्या निधीचा होत असलेला अपहार, शासनाने संबंधित गैरव्यवहार करणा-या शाखा अभियंत्यावर करावयाची कठोर कारवाई यासंबंधी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंत जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, नाशिक जिल्हयातील पेठ तालुक्यातील बाडगी येथील शासकीय मुलामुलींच्या आश्रमशाळेतील इयत्ता 10वी मधील अल्पवयीन विद्यार्थीनी गर्भवती असल्याची बाब नुकतीच उघडकीस आलेली आहे. सदरहू विद्यार्थीनीची त्या शाळेमार्फत नियमित तपासणी करण्यात येत असताना

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंत जाधव....

ती गर्भवती असल्याचे संशय तेथील कर्मचाऱ्यांना आल्यामुळे त्या मुलीला जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता ती मुलगी गर्भवती असल्याचे निदर्शनास आलेले आहे. अशा घटना विशेषत: आदिवासी परिसरामध्ये असलेल्या मुला-मुलींच्या आश्रमशाळेमध्ये वारंवार घडत असतात. त्यामुळे अशा गोष्टींकडे शासनाने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या घटना आश्रमशाळांमध्ये घडत आहेत, त्यावर लक्ष केंद्रीत करुन अशा घटना भविष्यात होऊ नयेत याची दक्षता घेण्यात यावी. या घटनेमध्ये जे आरोपी असतील त्यांच्या विरुध्द तातडीने कडक कारवाई करावी अशी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनास विनंती करीत आहे.

<u>अशासकीय कामकाज</u>

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांचा ठराव क्रमांक 80 हा आजच्या कार्यक्रम पत्रिकेत दाखविण्यात आलेला आहे. परंतु सदर ठराव नंतर घेण्यात यावा अशी विनंती सन्माननीय सदस्यांनी माननीय सभापती यांच्याकडे केली आहे आणि ती विनंती माननीय सभापतींनी मान्य केली आहे. त्यामुळे आजचा हा ठराव नंतर घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : ग्रामीण भागात पाणी पुरवठा योजना देखभालीत होत असलेली कुचराई

मु.शी. : ग्रामीण भागात पाणी पुरवठा योजना देखभालीत होत असलेली कुचराई या विषयावरील श्री.रमेश शेंडगे, वि.प.स. यांचा अशासकीय ठराव.

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

" राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणी पुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायम स्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, राज्यामध्ये भीषण दुष्काळ पडलेला आहे. या सभागृहात गेल्या दोन, तीन दिवसापासून दुष्काळावर सखोल चर्चा झालेली आहे. त्या सखोल चर्चेला राज्य शासनाकडून उत्तर देखील देण्यात आलेले आहे. मला या ठिकाणी प्रामुख्याने नमूद करावयाचे आहे की, राज्यातील जनतेला अन्न, वस्त्र, निवारा आणि पाणी या मूलभूत गरजा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. राज्य शासन आणि केंद्र शासन यांच्या मार्फत विविध योजना राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये मार्च, एप्रिल, मे आणि जून या कालावधीत विहीर वा अन्य पाण्याचे स्त्रोत आहेत, त्यातून पिण्यासाठी अथवा जनावरांसाठी पाणी उपलब्ध होत नाही, ही वस्तुस्थिती आपण पाहतो आहोत. त्या गावातील जनतेला तसेच जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी टॅकर व्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील काही जिल्हयातील अनेक गावांना टँकर व्दारे पाणी पुरवठा केला जात आहे. त्या ठिकाणच्या गावांची लोकसंख्या पाहिली तर जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याचे गांभीर्य आपल्या लक्षात येईल. नाशिक जिल्हयात 125 टँकर्स सुरु आहेत.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे...

तेथील 4 लाख 23 हजार 107 लोकांना टँकर्सच्या माध्यमातून पाणी उपलब्ध करुन दिले जात आहे. अहमदनगर जिल्हयात 273 टँकर्सव्दारे 6 लाख 86 हजार 486 लोकांना पाणी पुरवठा करीत आहोत. पुण्यासारख्या सधन जिल्हयामध्ये सुध्दा 2 लाख 20 हजार लोकांना टँकर्सव्दारे पाणी पुरवठा करीत आहोत. सातारा जिल्हयात 3 लाख 42 हजार, सांगली जिल्हयात 5 लाख 5 हजार 849 लोकांना टँकर्सव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. अशा एकूण जवळ जवळ 35 लाख 30 हजार 972 एवढया लोकसंख्येला आपण टँकरव्दारे पाणी उपलब्ध करुन देत आहोत.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

सभापती महोदय, टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची वेळ का येते याचा विचार केला तर अनेक कारणे दिसून येतात. पाण्याची उपलब्धता नसणे, पाण्याची पातळी खोल जाणे, शासनाने ज्या विविध नळपाणी पुरवठा योजना अनेक खेडयात घेतलेल्या आहेत त्या काही ना काही कारणांमुळे बंद असणे अशी अनेक कारणे आहेत. जलस्वराज्य योजना राज्यात राबविली. त्यापैकी काही योजना बंद पडल्या आहेत. गावाने जलस्वराज्य योजना बंद पडल्यामुळे अन्य योजनेतून पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली की, जलस्वराज्य योजना आपल्या गावात राबविली असल्यामुळे दुसऱ्या योजनेतून पाणी मिळणार नाही असे सांगितले जाते. त्यामुळे गावातील लोकांना पिण्याचे पाणी मिळत नाही.माझी शासनाला विनंती आहे की, अशा प्रकारे पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी वेगवेगळी कारणे सांगून एका योजनेतून पाणी दिले आता दुसरी योजना घेता येणार नाही असे सांगणे बरोबर नाही. योजना बंद पडलेली असते, तांत्रिक बिघाड असतो, पाण्याचा स्त्रोत निघून गेलेला असतो अशा वेळी स्त्रोत निघून गेलेला असला तरी आपले अंतिम ध्येय त्या गावाला पिण्याचे पाणी कायम स्वरुपी मिळाले पाहिजे. हा प्रयत्न कायम केला पाहिजे.

सभापती महोदय, एखाद्या योजनेवर हजारो-लाखो रुपये खर्च करुन पाणी पुरवठा योजना राबविली आणि ती बंद पडलेली असेल, काही योजना कोटयवधी रुपये खर्च करुन केलेल्या आहेत परंतु पाण्याची टाकी बांधून झाली असली तरी पाईप लाईनचे काम न झाल्यामुळे गावापर्यंत पाणीपुरवठा होत नाही. अशा योजनांची नोंद आहे. आम्ही स्वत: पाहणी केलेली आहे. अशा तऱ्हेने राज्यामध्ये भीषण अशा पाणी टंचाईचा प्रश्न निर्माण झालेला आहे. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जातो. टँकरद्वारे केल्या जाणाऱ्या वाडया-वस्त्यांचा विचार केला तर नाशिक,धुळे,जळगांव,अ.नगर या विभागामध्ये जवळजवळ 1481 वाडयांमध्ये टँकरने पाणी पुरवठा होत आहे. पुणे महसुली विभागाचा विचार केला तर 4538 गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. माझ्या सांगली जिल्हयामध्ये 1569 गावांना टँकरने पाणीपुरवठा होत आहे. औरंगाबाद विभागामध्ये 367 वाडयांना टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे. अमरावती विभागामध्ये 176 गावे आणि 9 वाडयांना टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे. नागपूर विभागामध्ये 41 गावांना टँकरने पाणीपुरवठा होत आहे. संपूर्ण राज्याचा विचार केला तर 1952 गावे आणि 6394 वाडयांना टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरविले जात आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

आपल्या राज्यामध्ये मोठे,मध्यम आणि लघुपाटबंधारे प्रकल्प मोठया प्रमाणात आहेत. मोठे प्रकल्प जवळजवळ 84 आहेत, मध्यम प्रकल्प 223 आहेत आणि लघुपाटबंधारे प्रकल्प 2131 आहेत. अशा प्रकारे राज्यामध्ये 2453 प्रकल्प आहेत. या प्रकल्पातील पाणीसाठा किती आहे यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी आजच सकाळी प्रश्नोत्तराच्या तासात माहिती दिलेली आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, दुष्काळ आल्यानंतर आणि टंचाई निर्माण झाल्यानंतर शासन पाणीपुरवठा करते. या राज्यामध्ये काही गावे आणि काही तालुके असे आहेत की जे कायम दुष्काळी आहेत. पिण्याच्या पाण्याची टंचाई फेब्रुवारीपासूनच सुरु होते आणि सरकारकडे टँकरसाठी मागणी करावी लागते. योजना आणि खर्च मंजूर झाल्यानंतर त्या गावामध्ये पाणीपुरवठा केला जातो.

सभापती महोदय, अशी परिस्थिती इतकी भीषण आहे की, टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो ते पाणी शुध्द केलेले नसते. ते पाणी पिऊन काही गावामध्ये आजाराला देखील सुरुवात इ ालेली आहे. एका मंत्रीमहोदयांबरोबर खेडयात गेलो होतो त्यावेळी गावकऱ्यांनी तक्रार केली की ते पाणी दोन दिवस आम्ही ठेवले तर त्यामध्ये अळया पडायला लागतात. जिथून पाण्याचा सोअर्स आहे, जिथून टँकरमालक पाणी घेऊन येतात तेथील पाण्याचा साठा संपत आलेला आहे तरीसुध्दा टँकरवाले लांब जाऊन त्यांचे डिझेल जास्त जळू नये म्हणून ते गढूळ पाणी सुध्दा घेऊन येतात आणि गावात पाण्याचे वाटप करतात. गावातील लोकांना तक्रार करायला तालुक्याला जाता येत नाही, तालुक्यात ऐकले नाही तर जिल्हयाला जाता येत नाही. म्हणून जे पाणी मिळाले आहे ते पाणीच घरात कापडाद्वारे किंवा इतर माध्यमातून शुध्द करुन घेताना गावातील लोक आपल्याला दिसतात.

अशुद्धलिखित प्रत / अशुद्धलिखित नाही

नंतर श्री. भोगले

श्री.रमेश शेंडगे.....

सांगली जिल्हयात जवळजवळ 475 पाणीपुरवठा योजना असून 2012-13 मध्ये आणखी 271 योजना राबविण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याची मला माहिती मिळाली आहे. ज्या योजना तयार केल्या जातात त्यांची वेळेत अंमलबजावणी झाली तर बऱ्याच प्रमाणात खर्च कमी होईल आणि जनतेला वेळेवर पाणी मिळू शकेल. सांगली जिल्हयामध्ये काही योजना जलस्वराज्यमधून घेतल्या आहेत. कवठे महाकाळ तालुक्यात 6 ते 8 गावांना पिण्याचे पाणी मिळत नाही. पाण्याचा सोर्स उपलब्ध असून पाणी देखील उपलब्ध आहे. केवळ जलस्वराज्यमध्ये या गावांचा समावेश असल्यामुळे इतर योजनांमधून तुमच्या गावाला पाणी देता येणार नाही असे सांगितले जाते. सोर्स असेल तर काही योजनांची अदलाबदल करुन पाणीपुरवठा करता आला तर अनेक गावांना पाणी मिळू शकेल आणि गावकऱ्यांची अडचण दूर होईल.

सभापती महोदय, राष्ट्रीय पेय जल कार्यक्रमांतर्गत वेगवेगळया योजनांसाठी केंद्र सरकारकडून मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होतो. जीवन प्राधिकरणाकडून काही योजना राबविल्या जातात. या योजना राबवित असताना कायम दुष्काळी तालुक्यांमध्ये प्रत्येक वर्षी टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो, त्याची विशेष नोंद घेतली जात नाही. प्रत्येक वर्षी टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो, त्यांच्यासाठी विशेष योजना राबविणे आवश्यक आहे. शासनाला धन्यवाद दिले पाहिजेत, यावर्षी पाण्याची टंचाई निर्माण झाल्याबरोबर सतर्क राहून वेगवेगळ्या योजना कार्यरत करुन राज्यातील जनतेला चारा आणि पाणी, अन्नधान्य उपलब्ध करुन दिले गेले. बीपीएल कार्डधारकांना घरपोच अन्नधान्य देण्याचे काम शासनाने केले आहे. त्यामुळे जनतेला तो आधार झाला आहे.

सभापती महोदय, माझी शासनाला विनंती आहे की, पाण्याचा प्रश्न अग्रक्रमाने सोडविण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. माननीय मंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांनी या विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर चांगल्या योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. परंतु कायम दुष्काळी तालुक्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो, त्या गावांचा प्रामुख्याने विचार करुन आवश्यक तेवढा पाणीपुरवठा होईल यासाठी प्रयत्न करावेत एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

ठराव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारने फार मोठया योजना जिल्हा परिषदेकडे राबविण्यास दिलेल्या आहेत. जलस्वराज्य, भारत निर्माण व राष्ट्रीय पेय जल योजना यांचा राज्य शासनाने कधी तरी सर्व्हे केला पाहिजे. या योजनांचे नेमके काय झाले आहे याचा आढावा घेतला जावा या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र सरकारला सूचना करावी. जलस्वराज्य, भारत निर्माण व राष्ट्रीय पेय जल योजना ग्रामपंचायतींकडे सोपविल्या जातात. त्यांच्याकडे कर्मचारीवर्ग उपलब्ध नाही. ग्रामपंचायतीमध्ये पाणी समिती नियुक्त केली जाते. त्या समितीकडून एक ते दीड कोटी रुपयांचे टेंडर काढले जाते. त्या टेंडरची पक्रिया सरपंच, ग्रामसेवक यांच्याकडून पार पाडण्यात येते. सरपंच नसतील तर ग्रामसभा नेमून देईल तो अध्यक्ष नियुक्त केला जातो.

सभापती महोदय, अनेक ग्रामपंचायतीमध्ये पाणी समितीच्या अध्यक्षांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल झाले आहेत. फौजदारी गुन्हा दाखल करता येत नाही. कारण कामासाठी ॲडव्हान्स रक्कम दिली जाते. ॲडव्हान्स देण्यासाठी 15 ते 20 लाख रुपये बँक खात्यातून काढले जातात. त्याचे नियोजन जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीकडे नाही. केंद्र सरकार दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी देते. प्रत्येक जिल्हयाला 70 ते 80 लाख रुपयांचा निधी दिला जातो. तो निधी वेळेत उपयोगात आणला जात नाही. जलस्वराज्य योजनेतून एखाद्या वाडीसाठी पाणी उपलब्ध करुन दिल्यानंतर पुन्हा 12 ते 15 वर्षापर्यंत योजनेची मागणी करता येत नाही. परंतु योजनेतून वाडीमध्ये पाणी पोहोचत नाही. शेवटी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ येते. म्हणून या योजना जिल्हा परिषद किंवा पंचायत समित्यांच्या अधिपत्याखाली आणल्या पाहिजेत. तशा प्रकारची सूचना राज्य सरकारने केंद्र सरकारला करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पाणी टंचाई हा विषय आल्यानंतर अ पत्रक, ब पत्रक तयार करावे लागते. ते तयार करण्यासाठी गटविकास अधिकारी आणि तहसीलदार हे एकत्र कधीच उपलब्ध होत नाहीत.

नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

पाणी टंचाई उद्भवल्यानंतर त्यासंबंधीची प्रोसिजर पूर्ण करताना "अ" फॉर्म भरुन द्यावा लागतो, "ब" फॉर्म भरुन द्यावा लागतो व त्यासाठी जिल्हाधिकारीच पाहिजे अशी किचकट प्रक्रिया असल्याने पाणी पुरवठ्याला विलंब लागतो. या निमित्ताने माझी सूचना आहे की, जिल्हाधिकाऱ्यांना जास्त जबाबदाऱ्या असल्याने ते प्रत्येक वेळेस हजर असतातच असे नाही म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना ही संपूर्ण कागदोपत्री प्रक्रिया करण्याचे अधिकार दिले तर जो 20-20 दिवसांचा विलंब लागतो तो लागणार नाही. वास्तविक पाणी पुरवठ्याच्या योजना जास्तीत जास्त जिल्हा परिषदेमार्फतच राबविल्या जातात व त्यांच्या मार्फतच याचे नियोजन केले जाते. मग त्यांना हे अधिकार दिले तर किमान प्रत्यक्ष पाणी पुरवठा करण्यासाठी लागणारा विलंब टळू शकेल.

महोदय, यानंतर दुसरा मुद्दा असा आहे की, जेव्हा प्रत्यक्ष पाणी टंचाई जाणवते तेव्हाच सर्व जिल्हा परिषदा आणि प्रशासन जागे होते. पण अगोदरपासून नियोजन केले तर ही वेळ येणार नाही. त्यासाठी आपल्या जिल्हा परिषदेकडे बोअर युनिट आवश्यक तेवढे मिळत नाहीत. राज्यात दरवर्षी 10 ते 15 तालुक्यांमध्ये पाणी टंचाई असतेच. त्याचा विचार करुन आणि दरवर्षीच पाण्याची टंचाई असते याचा विचार करुन बोअर युनिटची व्यवस्था पुरेशा प्रमाणात करावी अशी मी विनंती करतो. त्याचबरोबर पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ या भागाची भौगोलिक परिस्थिती आणि कोकणातील भौगोलिक परिस्थिती यात तफावत आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात असे युनिट कमी असले तरी रस्त्यांची परिस्थिती चांगली असल्याने तिकडे चालून जाते पण कोकणातील रस्त्यांची परिस्थिती पाहता एक-दोन युनिटमध्ये बोअरवेलची कामे होत नाहीत. एका बाजूला आपण टँकरने पाणी पुरवठा करण्यावर करोडो रुपये खर्च करतो. जीएसडीए तसेच ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे अशा प्रकारचे व्हिकल्स कायम स्वरुपी देता येतील काय याचाही विचार करण्याची गरज आहे. त्याचबरोबर पाणी टंचाई दरवर्षी ठराविक वाड्या आणि गावांमध्ये निर्माण होते याचा विचार करुन सुरुवातीलाच ही सर्व प्रक्रिया पूर्ण करुन तातडीने पाणी पुरवठा सुरु करता येतो.

जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या परिसरात ग्रामीण भागात पाणी चालू असताना बंधारे घालता आले तर ते अत्यंत चांगले राहील. यासाठी वेगवेगळ्या योजना आहेत. कृषीच्या जमिनीखालून जाणारे बंधारे, वनराईचे वेगळे बंधारे आहेत. अशा सर्व योजना एकत्र करता आल्या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

तर त्याचा फायदा होऊ शकतो. पण शासनाच्या ज्या योजना असतात त्यांची माहिती सरपंच, जिल्हा परिषद सदस्य अथवा आमदार यांना माहीत नसतात. त्यांची जास्तीत जास्त माहिती कृषी अधिकाऱ्यांना चांगल्या प्रकारे असते. त्यामुळे ते करतील ती योजना घेतली जाते. पण जर ग्राम पंचायतीचे सदस्य जागरुक असतील तर ते सर्व माहिती घेतात. अशा प्रकारे सामाजिक वनीकरण, लघु पाटबंधारे (जिल्हा परिषद), कृषी विभागामार्फत अनेक योजना आहेत त्या सर्व एकाच छत्राखाली आणता आल्या तर त्यांचे नियोजन राहील. तसेच भूमी अंतर्गत बंधाऱ्यांच्या बाबतीत मला आजपर्यंत देखील माहिती नाही. अशा योजनांच्या बाबतीत योग्य त्या सूचना केल्या आणि त्या एकत्र केल्या तर शासनाचा वाया जाणारा पैसा वाचू शकेल.

महोदय, जाता जाता मी अशीही सूचना करणार आहे की, कोकणात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत विहिरींसाठी स्वतंत्र हेड निर्माण केले होते. पण अचानक हे स्वतंत्र हेड शासनाने रद्द केले व त्यामुळे काही शेतकऱ्यांना त्यांच्या विहिरींचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत. माझी या निमित्ताने अशी सूचना आहे की, ज्यांचे पैसे शिल्लक आहेत त्यांना ती रक्कम अदा करण्यासाठी पुन्हा हे हेड निर्माण करावे अशी विनंती करतो आणि मला बोलण्याची परवानगी दिल्याबद्दल पुन्हा आपले आभार व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपल्याला स्वातंत्र्य मिळून एवढी वर्षे झालेली असतांनाही आपण पाणी टंचाईच्या बाबतीत चर्चा करतो हे काही योग्य नाही. पृथ्वीतलावर आज जे 100 टक्के पाणी आहे त्यातील 97 टक्के पाणी समुद्रात असून 3 टक्के पाणी पिण्यायोग्य आहे. विहिरीच्या माध्यमातून किंवा बोअरवेलच्या माध्यमातून ज्या पाण्याचा आपण उपसा करतो ते पाणी केवळ 0.36 टक्के आहे.

सभापती महोदय, जगामध्ये जर युध्द झाले तर ते पाण्यासाठी होईल असे म्हटले जाते. अशी परिस्थिती असतांना वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन 25-50 वर्षाचा विचार करुन पाण्याचे नियोजन करणे गरजेचे झाले आहे. 0.36 टक्के ग्राऊंड वॉटरचे पाणी वाढण्यासाठी आपल्याला काम करावे लागणार आहे. इस्त्रायलचा उल्लेख या सभागृहात अनेक वेळा झालेला आहे. त्या ठिकाणी कमी पाणी असतांना, पाण्याचा एक एक थेंब वाचवून शेती केली जाते,पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवला जातो व अशा स्वरुपाच्या योजना इस्त्रायलमध्ये करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे इस्त्रायलकडून आपण काही तरी बोध घेणे महत्वाचे आहे. जमिनीच्या पाण्याची पातळी वाढविण्यासाठी राज्य सरकारने ग्रामीण भागासाठी रेन वॉटर हार्वेस्टींगसाठी योजना सुरु केली तर पाणी टंचाईचा भार आपण काही प्रमाणात का होईना कमी करु शकू.

सभापती महोदय, मी मूळचा कोकणातील असल्यामुळे कोकणातील पावसाचे पाणी वहाळाच्या माध्यमातून समुद्राला मिळते. जर कोकणामध्ये छोटया स्वरुपाचे बंधारे बांधले तर त्याचा जमिनीतील पाण्याच्या पातळीत वाढ होण्यास निश्चितपणे मदत होईल. आपण ज्या ठिकाणी धरण बांधतो त्याच्या आजूबाजूच्या गावातील विहिरींची पाण्याची पातळी वाढल्याचे आपल्याला दिसून येते. त्यामुळे कोकणामध्ये छोटे छोटे बंधारे बांधण्याचे काम राज्य शासनाने हाती घेणे गरजेचे आहे. रेन वॉटर हार्वेस्टींग करुन पाण्याची पातळी वाढविण्यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची गरज आहे व त्या माध्यमातून शासन योजना आखेल असा मला विश्वास आहे.

सभापती महोदय, मे महिन्याच्या काळात विहिरीच्या पाण्याची पातळी अतिशय खोल जात असते. मी माझ्या मित्राच्या घरी गेलो होतो. तुमच्या विहिरीचे पाणी अतिशय खोल गेलेले असून ते मचूळ आहे. तुम्ही पाण्याचे टेस्टींग, बायो ॲनालिसीस केलेले आहे का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे .....

असे त्याला विचारले असता त्याने "नाही" असे सांगितले. परंतु त्याने पाण्याचे टेस्टींग केल्यानंतर पाण्यातील सॉल्व्हंटची टीडीएस लेव्हलची पर्मिसीबल लिमिट 500 असावयास पाहिजे होती ती 2000 असल्याचे आढळून आले.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्यासाठी नळ योजना राबविणार असाल आणि मे महिन्याच्या दरम्यान पाण्याची पातळी खाली जाणार असेल व टीडीएस लेव्हल जर 2000 वर जाणार असेल तर त्या पाण्यामुळे रोगराई पसरु शकते. पाण्यातील टीडीएस लेव्हल जास्त असल्यामुळे खऱ्या अर्थाने रोगराई होते.

सभापती महोदय, ग्रामीण भागात 10 हजार लिटरचा फिल्टरेशन सॉफ्टनींग प्लँट बसवावयाचा असेल तर त्यासाठी 5 लक्ष रुपये खर्च येत असतो. ज्या ठिकाणी नळ पाणी पुरवठा योजना असते त्या ठिकाणी आमदार निधीतून जर प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये फिल्टरेशन सॉफ्टनींग प्लँट लावून पाण्यातील टीडीएस कमी करण्यासाठी प्रयत्न केला तर त्याचा फायदा ग्रामीण भागातील जनतेला मोठया प्रमाणात होऊ शकतो. आपण जनतेला पाणी देतो परंतु ते पाणी जर शुध्द नसेल तर त्यातून जास्त समस्या निर्माण होतील त्यामुळे हा सर्व प्रकार थांबवण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये फिल्टरेशन सॉफ्टनिंग प्लँट बसविणे आवश्क आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे...

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यामध्ये आवास ग्रामपंचायत आहे. डोंगरामध्ये एक छोटासा झरा कायम असल्यामुळे व मे महिन्यामध्ये पाणी नसल्यामुळे या ग्रामपंचायंतीने स्वत:चे छोटेसे धरण बांधले आहे. हा झरा तसाच रहावा म्हणून त्यांनी धरण बांधलेले आहे. हे धरण बरेच मोठे आहे. यातील पाणी पाईपद्वारे विहिरीमध्ये सोडण्यात येणार आहे. त्यानंतर हे पाणी फिल्टरेशन सॉफ्टींग प्लॉंटच्या माध्यमातून गावाला देण्यात येणार आहे. अशा योजना आपण महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये का करीत नाही ? जनतेला आपण स्वच्छ पाणी का देत नाही ? पाणी टंचाईच्या नावाखाली आपण तात्पुरत्या योजना करतो. पुढील 20-25 वर्षाची गरज लक्षात घेऊन पाणी टंचाई निवारण्यासाठी उपयायोजना केली आहे. तसेच स्वच्छ पाण्यासाठी देण्यासाठी उपाययोजना आखल्या तर महाराष्ट्रातील जनता आपणास निश्चितपणे दुवा देईल. हेल्थवर आपण मोठ्या प्रमाणावर खर्च करीत आहोत. तो स्वच्छ पाणी दिल्यामुळे निश्चितच कमी होईल. स्वच्छ पाणी दिले तर जनतेला चांगले आरोग्य लाभेल त्या दृष्टीने आपण योजना राबवाव्यात एवढेच या निमित्ताने सांगतो. धन्यवाद.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे (कोकण पदवीधर) : माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी जो ठराव मांडला आहे त्यास अनुलक्षून मी आपले लक्ष शहरी भागाकडे वेधणार आहे.

कालच झी 24 तासवर एक बातमी दाखविण्यात आली होती. ठाण्यातील कळवा येथील टाकोली मोहल्ला येथील एका इमारतीमध्ये 17 कुटुंबे राहतात. या कुटुंबांना अतिशय गढूळ पाण्याचा पुरवठा होत आहे. या पाण्यामध्ये किडे सापडले आहेत. याची दखल शासनाने घ्यावी व ताबडतोब कारवाई करावी अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

....

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपण मला बोलण्यास संधी दिल्या बद्दल मी आपले आभार मानते.

मागच्या अधिवेशना पासून दुष्काळ, पाणी या विषयावर मला बोलायचे आहे. पण मला संधी मिळाली नाही. आता मात्र मी पाच मिनिटे बोलणार आहे. पाण्याच्या उपलब्धतेबाबत भारताचा जगात दुसरा क्रमांक आहे. पण महाराष्ट्रातील दुष्काळी भागातील स्त्रीला हे सांगितले तर ती त्यावर कधीच विश्वासच ठेवणार नाही. कारण आजही त्या स्त्रीला पाण्यासाठी 2 ते 3 कि.मी.अंतरावर जावे लागत आहे. तज्ज्ञ सांगतात की, गेल्या 100 वर्षात पाऊसमानाचा फारसा फरक झालेला नाही. सातत्याने पावसाच्या प्रमाणात वाढ होत असून अतिवृष्टीत दुपट्टीहून वाढ झाल्याचा निष्कर्ष नोंदविण्यात आलेला आहे. हंगामातील पावसाचे प्रमाण कमी अधिक होत असल्यामुळे एकूण सरासरीमध्ये फारसा फरक पडलेला नाही. पृथ्वीवर 65 टक्के पाणी आहे. आपल्याला वापरता येणारे पाणी फक्त 0.70 च्या आसपास आहे. पृथ्वीवरील उपलब्ध पाण्याचे वर्गीकरण आपण केले तर पिण्या लायक आणि वापरण्या लायक पाणी खूपच कमी आहे. गेल्या 60 वर्षात शासनाने फार मोठी धरणे बांधलेली आहेत. मोठे धरण, प्रकल्प जलसंधारणाला पर्याय ठरू शकत नाही किंवा सिंचन प्रकल्पामुळे मोठ्या लोकसंख्येला पिण्याचे पाणी मिळू शकत नाही. कारखान्यासाठी, वीज निर्मितीसाठी सिंचन प्रकल्प घेण्यात आले. सिंचन प्रकल्पामुळे केवळ हरित शेतीचे भाग तयार झाले. परंतु, ते सिंचन प्रकल्प दुष्काळी भागाला वाचवू शकत नाही. आज आपल्या पुढे पाण्याचा मोठा प्रश्न आहे. मला असे वाटते की, आपले नियोजन कुठे तरी फसते आहे. लहान बंधारे बांधून त्याद्वारे पाणी अडविले तर ते बरे होईल. शासनाने गेल्या 60 वर्षापासून मोठी धरणे बांधण्यावर लक्ष केंद्रीत केले असून त्या पाण्याद्वारे वीज निर्मिती करण्यावर भर दिलेला आहे. अशा प्रकल्पांमुळे सुपीक जमीन मोठ्या प्रमाणावर धरणाखाली जाते.

यानंतर श्री.सरफरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

परंतु आपल्या राज्यामध्ये आपण "पाणी अडविणे आणि पाणी जिरवणे" या करिता योजना राबवीत आहोत. या बाबत मी धुळे जिल्ह्याचे उदाहरण देऊ इच्छिते. धुळे जिल्हा दुष्काळी असून त्या जिल्ह्यामध्ये शिरपूर पॅटर्न राबविला जात आहे. मी स्वत: त्या जिल्ह्यामध्ये जाऊन हा पॅटर्न पाहून आले आहे. शिरपूरचे आमदार माननीय श्री. अमरीशभाई पटेल यांनी श्री. सुरेश खानापूरकर, भू गर्भ शास्त्रज्ञ यांच्या मदतीने सन 2004 पासून गेल्या आठ वर्षात शिरपूरमधील भू गर्भातील 400 फूट खोल गेलेली पाण्याची पातळी 25 फूटावर आणली. त्या करिता अतिशय सोपी पध्दत अवलंबिली आहे. नद्यांना मिळणारे नाले हे चार ते पाच फूटांचे असतात ते जर आपण 40 फूटापर्यंत खोल आणि रुंद केले आणि त्या नाल्यांवर 7 ते 8 बंधारे बांधले तर पावसाळयात नाल्यामधून नदीमध्ये येणारे पाणी बंधाऱ्यांमुळे अडविले जाऊ शकते. अशाप्रकारे एका बंधाऱ्यामधून दुसऱ्या बंधाऱ्यामध्ये पाणी साठविले जाईल. हे साठविलेले पाणी उचलण्यासाठी तीन शेतकऱ्यांना एक पंप दिला व त्यांनी पंपाव्दारे ते पाणी उचलून आपल्या शेतामध्ये आणून आपले शेत मळे फुलविले आहेत. अशा प्रकारे बारा महिने शेतकरी शेती करीत असून त्यांचे राहणीमान सुधारले आहे. त्यांची मुले पुणे, मुंबई येथे रिक्शा चालविण्यासाठी जात होती ती आता भाजी आणि शेतीचे उत्पन्न घेत आहेत. त्यामुळे त्या भागातील शेतकरी सधन झाला आहे.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे विहिरींचे पुर्नभरण करण्याचा प्रकल्प देखील श्री.सुरेश खानापूरकर यांनी चांगल्या प्रकारे राबविला आहे. त्याचे चांगले परिणाम शिरपूरच्या परिसरामध्ये दिसू लागले आहेत. त्या करिता वर्षाला त्यांना फक्त दोन कोटी रुपयांचा निधी दिला जातो त्यामधून ते हे चांगले उपक्रम राबवित आहेत. अशा प्रकारे आपण पाण्याच्या योजनांवर कोटयवधी रुपये खर्च करीत असतांनाही दुष्काळी परिस्थिती कायम आहे. त्या करिता भू गर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी जेवढे प्रयत्न व्हावयास पाहिजेत तेवढे होत नाहीत. आपण जर महाराष्ट्राच्या पातळीवर शिरपूर पॅटर्न राबविला तर राज्यातील दुष्काळी परिस्थिती संपविण्यामध्ये आपण यशस्वी होऊ एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजयसिंह मोहिते पाटील (नामनियुक्त) : सभापती महोदय, राज्यातील पाणी टंचाई व पाणी पुरवठयासाठी कराव्या लागणाऱ्या सुविधा या बाबत माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी मांडलेल्या प्रस्तावर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आपण अनेक वर्षे पहात आहोत की, ग्रामीण भागामध्ये शेतीकरिता लागणारे पाणी किंवा पिण्याकरिता लागणारे पाणी उपलब्ध करण्यासाठी शासन प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असते हे आपल्याला नाकारता येणार नाही. या ठिकाणी दोन दिवसापूर्वी सांगण्यात आले आहे की, 1972 साली पडलेल्या दुष्काळाच्या वेळी 50 फूटावर पाणी लागत होते, आज 250 फूट खोल गेलो तरी पाणी लागत नाही आणि लागले तरी ते टिकत नाही. अशाप्रकारच्या घटना राज्यामध्ये अनेक ठिकाणी घडत आहेत. आपण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना केल्या, त्यापैकी किती यशस्वी झाल्या आणि किती बंद आहेत याचे संशोधन करण्याची आवश्यकता आहे. सोलापूर जिल्ह्यातील माढा, सांगोला या एखाद-दुसऱ्या तालुक्यामधील प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना सोडल्या तर बाकीच्या ठिकाणी कुठेही योजना चालू नाहीत. आपण योजना करुन गावाला पाणी दिले एवढयावरच थांबून चालणार नाही तर ती प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना बरोबर चालत आहे की नाही याकडे राज्य शासनाने लक्ष दिले पाहिजे, त्यावर नियंत्रण करण्याची राज्य शासनाची जबाबदारी आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते.

सभापती महोदय, आज सोलापूर शहराला उजनी धरणामधून पाणी मिळते व ते लहान गावापर्यन्त पुरविले जाते. मघाशी प्रश्नोत्तराच्या तासाला सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उत्तर देतांना सांगितले की, पुणे महानगरपालिकेला 14 टीएमसी पाणी लागते. त्यामधील वेस्ट वॉटर किती ? हे अंदाजे 10 ते 11 टीएमसी वेस्ट वॉटर नदीमध्ये सोडले जाते. त्या पाण्यावर ट्रीटमेंट करुन ते नदीमध्ये सोडले जात नाही. हे पाणी नदीमध्ये सोडल्या नंतर ते उजनी प्रकल्पामध्ये जाते. हे उजनी धरणामधील पाणी सोलापूर शहर, बार्शी, करमाळा, माढा, मंगळवेढा, पंढरपूर शहराला पुरविले जाते. अशाप्रकारे उजनी धरणामधील घाण पाणी ट्रीटमेंट न करता पुरविले जात असल्यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये कॉलऱ्याची साथ पसरलेली दिसते. म्हणून मला आपल्याला विचारावयाचे आहे की, हे पाणी शुध्द करुन आपण त्या शहरांना पुरविणार आहोत की नाही?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजयसिंह मोहिते पाटील....

सभापती महोदय, ग्रामीण भागात पाणी पुरवठा योजना होतात परंतु त्या चांगल्या होतात की नाहीत, त्या ठिकाणी पाईप लाईन 3 फूट जमिनीखालून न टाकता जमिनीवरुन टाकली जाते त्यावर कोण नियंत्रण ठेवणार आहे? आपण हे काम ग्रामपंचायतीला देत असल्यामुळे ग्रामपंचायत ते काम करीत असते. परंतु त्यांनी केलेले काम बरोबर आहे की नाही हे कुणी पहाणार आहे की नाही?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जर संबंधित माणसे अधिकाऱ्यांच्याबरोबर संगनमत करुन सदरहू योजना पूर्ण झाली अशा प्रकारचे सर्टीफीकेट देतात. परंतु प्रत्यक्षात ग्रामीण भागातील जनतेला पाणी मिळत नाही. भविष्यकाळामध्ये कोट्यावधी रुपयांच्या योजनांच्या कामाबाबत चांगल्या प्रकारे अंमलबजावणी करावयाची असेल तर फ्लाईंग स्क्वॉड सारखे एक स्क्वॉड तयार करुन सदरहू योजना तपासण्याचे काम केले पाहिजे तरच पुढच्या काळामध्ये योग्य ठिकाणी, योग्य प्रकारे पाणीपुरवठ्यासाठी निधी मिळू शकेल.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की, सध्या गावे मोठी होत आहेत. आपण पूर्वीच्या काळामध्ये पाणी पुरवठा योजना केल्या आहेत म्हणून नवीन योजना मंजूर करावयाच्या नाहीत अशा प्रकारची भूमिका घेता येणार नाही. यासाठी तपासणी केली पाहिजे. सध्या गावा-गावा मधील लोकसंख्या वाढत असताना त्या प्रमाणात तेथे पाणी पुरवठा करणे आणि नवीन सुधारित पाणी पुरवठा योजना करणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे आपण शहरांना 70 लिटर पाणी देतो, त्याप्रमाणे ग्रामीण भागातील गावे मोठी झाल्यानंतर, तेथील लोकसंख्या वाढल्यानंतर त्यांना देखील 70 लिटर पाणी देण्याची योजना सरकारने करावयास पाहिजे अशी आशा व्यक्त करतो. तसेच आमचे पालक मंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळेसाहेब याबाबतीत विचार करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

2 ई-2 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे **(पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री)** : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रमेशरावजी शेंडगे यांनी अशासकीय ठराव मांडलेला आहे.

सभापती महोदय, सदरहू योजना कशा पध्दतीने चालविल्या पाहिजेत याबद्दल त्यांनी बारीक-सारीक माहिती अतिशय उत्तम पध्दतीने दिलेली आहे.राज्यामध्ये अडीच लाख विंधण विहिरी आहेत, 95 हजार साध्या विहिरी आहेत. तसेच राज्यातील 130 लाख कुटुंबे असून त्यांना पाण्याचे कनेक्शन देण्याच्या बाबतीत प्रयत्न करीत आहोत.मघाशी माननीय माजी मंत्री श्री.विजयसिंह मोहिते-पाटील साहेबांनी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत उल्लेख केला. या बाबत सांगावयाचे तर एकंदर 1112 प्रादेशिक पाणी पुरवठा योजना आहेत. त्यातील विशेषत : ज्या लहान प्रादेशिक पाणी पुरवठा योजना सुरु आहेत, त्यांची संख्या साधारणपणे 700 आहे आणि 147 प्रादेशिक पाणी पुरवठा योजना कधीच सुरु होणार नाहीत, कारण त्या कालबाह्य झालेल्या आहेत, बंद पडल्या आहेत आणि त्या सुधारण्याच्या पलीकडे आहे. अशा प्रकारची एक विदारक परिस्थिती माननीय सदस्यांनी आपल्या सर्वांसमोर ठेवलेली आहे. आपण प्रत्येक मनुष्यवस्तीमध्ये चार वेळा पाणी पुरवठा योजना करुन देखील पुन्हा पाचव्या वेळेला योजना करावी लागते. तसेच टँकरमुक्त महाराष्ट्राची घोषणा केल्या नंतर देखील पुन्हा राज्यामये 2450 टँकर सुरु करावे लागतात.

सभापती महोदय, आपण स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात गेल्या 60 वर्षामध्ये देखील पाणी देउु शकलो नाही अशा पध्दतीची राष्ट्राला उद्देशून केलेली भाषणे देखील आपण ऐकलेली आहेत. अशा परिस्थितीत या संबंधातील राज्यकर्त्यांचे नियोजन खरोखरच चुकले म्हणून टँकरने पाणी पुरवावे लागत आहे काय असा प्रश्न पडतो. आपण ज्या गावांसाठी पाणी पुरवठ्याची व्यवस्था केली, ते पाणी आज गायब का झाले, या पाण्यावर कोणी दरोडा घातला आहे, हे पाणी कोणी उचलले आहे? याबाबत जर आपण बारकाईने अभ्यास केला तर लक्षात येईल की, अगोदरच्या काळामध्ये वीज कनेक्शन नव्हते. त्यामुळे भल्या पहाटे नदीवर जाउुन आंघोळ केल्यानंतर वाहत्या धारेमध्ये एखादी घागर भरुन पाणी घरी आणणे आणि ते पिण्यासाठी डेऱ्यामध्ये भरुन ठेवणे अशा प्रकारचे पाणी वापराचे मर्यादित स्वरुप होते. परंतु नंतरच्या काळामध्ये बटन दाबून पाणी घेण्याची व्यवस्था इ ाल्यानंतर शॉवर वाढले.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मण ढोबळे ....

टब वाढले. अनेक ठिकाणी ग्रामीण भागातून देखील आलिशान पायाभूत सुविधांची मागणी व्हावयास लागली. पाण्याचा वापर वाढला. एखाद्या भुसार पिकासाठी लागणाऱ्या पाण्याच्या पाचपट पाणी पिणाऱ्या पिकांबद्दलची आस्था वाढली. ऊस, हापूस, कापूस या सारख्या पैसे देणाऱ्या पिकांबद्दल विचार झाला. पाण्याचा उपसा अधिक वाढला. त्यामुळे पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे उद्या आपण पिण्यासाठी कोठून पाणी आणणार अशी भयानक स्वरुपाची अवस्था आपल्यासमोर उभी ठाकलेली आहे. पाण्यासाठी तोंडचे पाणी पळेल अशी अवस्था निर्माण झालेली आहे. आणखी दोन तीन आठवडे जर महाराष्ट्रामध्ये वरुणराजाने नीटपणाने फिरुन पाहिले नाही तर मोठ्या ठिकाणी भरणाऱ्या यात्रांना देखील फर्मान काढावे लागेल की आता यात्रेला येताना आपल्याबरोबर देवासाठी पाणी घेऊन या. पाण्याच्या बाबतीत इतकी वाईट परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसते.

सभापती महोदय, हा ठराव मांडताना, बंद पाणीपुरवठा योजनांबद्दलच्या सूचना करताना केवळ ऑडिट करावे किंवा केवळ याबद्दलच्या चुका सांगाव्यात अशा पध्दतीने न बोलता ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी या अशासकीय ठरावावरील चर्चेमध्ये भाग घेतला त्या सर्वांनीच अतिशय उत्तम प्रकारच्या सूचना या ठिकाणी केलेल्या आहेत. एका योजनेतून पाणी दिले असताना दुसऱ्या योजनेतून पाणी दिले पाहिजे म्हटल्यानंतर तुमच्या गावात या आधी आम्ही जलस्वराज्यची योजना केली होती म्हणून पाणी देणार नाही अशा प्रकारची अडचण आम्ही केलेली नाही. अशी अडचण करण्याची गरज नाही. प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेमध्ये तुमचे गाव असताना त्या गावामध्ये आता आपण नव्याने योजना करु पाहात आहात, ती योजना तुम्हाला करता येणार नाही अशाही प्रकारची अट आम्ही घातलेली नाही. त्या ठिकाणी स्वतंत्र इंडिज्युअल पाणीपुरवठा योजना करता येईल.

सभापती महोदय, जे टंचाई कृती आराखडे तयार केले जातात ते तयार करताना ऑक्टोबर ते डिसेंबर, जानेवारी ते मार्च, एप्रिल ते जून, जुलै ते ऑक्टोबर, ऑक्टोबर ते डिसेंबर, या पध्दतीने तयार केले जातात. ते आराखडे तयार करण्याचे काम जिल्हा परिषदच करते. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या आराखड्यामध्ये आमचा सहभाग असत नाही. ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.लक्ष्मण ढोबळे.....

वस्तुस्थिती आहे. त्याच बरोबर पाणीपुरवठा योजनेचा वीज पुरवठा खंडित होऊ नये म्हणून जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्या समितीच्या माध्यमातून जर एखादे कनेक्शन तोडले असेल तर त्या गावातील टंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन प्राधान्याने त्या ठिकाणी वीज कनेक्शन दिले जावे अशा प्रकारची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, टँकरचे पाणी अशुद्ध असते, टँकर चांगल्या ठिकाणी भरला जात नाही अशा प्रकारची ओरड मधल्या काळात झाल्यानंतर टँकरवर देखरेख करण्यासाठी लायझनिंग ऑफीसर नेमण्याबद्दल देखील विचार करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर कायम दुष्काळी गावातील ज्या पाणीपुरवठा योजना आहेत त्या ठिकाणी पाणी उपलब्ध होत नाही किंवा ग्रामीण भागामध्ये ज्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था नाही किंवा पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे अशा गावाला प्राधान्य देऊन त्या ठिकाणी तातडीने पाणीपुरवठा योजना कराव्यात अशा प्रकारची भूमिका घेण्याबद्दल सुध्दा सूचना देण्यात आलेल्या आहेत. जर या ठिकाणी आरोग्यावरचा ताण कमी करावयाचा असेल तर योजना वेळेत पूर्ण करुन त्या गावाला पाणी देणे आवश्यक आहे. परंतु शासनाच्या मनात आले आणि अमुक ठिकाणच्या गावात पाणी देण्याबद्दलचा निर्णय घेतला असे करता येत नाही.

त्र्याहत्तराव्या आणि चौऱ्याहत्तराव्या घटनादुरुस्तीप्रमाणे त्या गावाने आपल्याला पाणी पाहिजे की नको या बाबतीत ठराव करावयाचा आहे. पाणी कोठून पाहिजे या बद्दलचाही विचार त्या गावानेच करावयाचा आहे. क वर्ग, ब वर्ग नगरपरिषदेने तो विचार करावयाचा आहे. त्या पध्दतीने ग्रामीण भागामध्ये जलस्वराज्यमधून पाणी द्यावयाचे असेल अगर आमदारांच्या निधीतून पाणी पुरवठ्याची योजना करावयाची असेल तरी सुध्दा त्या गावाने ठराव केल्याशिवाय आपल्याला त्या ठिकाणी पाणी देता येत नाही. त्या गावानेच प्राधान्याने तो विचार करावयाचा आहे आणि पाण्याची व्यवस्था करण्यासाठी त्या ठिकाणी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.लक्ष्मण ढोबळे....

त्याचबरोबर जलस्वराज योजना ग्रामपंचायतींना दिल्या जातात.

सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी या ठिकाणी भावना व्यक्त केल्या आहेत. ग्राम पाणी पुरवठा समितीकडे योजना देतात. परंतु एखादी योजना 5 कोटी रुपयांची, 4 कोटी रुपयांची किंवा 50 लाख रुपयांची असेल तर अशा प्रकारच्या योजनेसाठी कोणत्याही प्रकारचे तांत्रिक ज्ञान किंवा know how देण्यासाठी कोणतीही यंत्रणा त्या ग्रामपंचायतीकडे नसते. त्यामुळे त्या ठिकाणची योजना केली जात नाही. त्यामुळे पंचायत समितीचे बी.डी.ओ., कार्यकारी अभियंता यांचे नियंत्रण तांत्रिक बाबीपुरते असते. परंतु पैसे काढताना देखील त्याच्यावर अंकुश असावा अशा प्रकारची मागणी दोन्ही सभागृहाच्या अनेक सन्माननीय सभासदांनी केलेली आहे. एन.ओ.सी.घेतल्याशिवाय पाणी पुरवठा समितीच्या पदाधिकाऱ्यांना पैसे काढता येणार नाही अशा प्रकारची अट त्यामध्ये घालण्याची आवश्यकता आहे याबद्दल माझी खात्री झालेली आहे. बोअर पाडणारे युनिट भाड्याने घेतले जाते. ज्यावेळी पाण्याची टंचाई वाढते त्यावेळी ते युनिट जिल्ह्याच्या बाहेर जाते, जेथे अधिक पैसे मिळतात तेथे जाते. म्हणून प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी, जिल्हा परिषदेच्या प्रमुख केंद्रावर एक तरी बोअर युनिट जिल्हा परिषदेच्या मालकीचे असावे अशा प्रकारची करण्यात आलेली सूचना ग्राह्य आहे असे मला वाटते. मी या चांगल्या सूचनेचे स्वागत करतो.

सभापती महोदय, जिल्ह्याचे नियोजन करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेला आहेत. जिल्हा परिषदेच्या सदस्यांकडून नियोजन केले जाते. अशा प्रकारे नियोजन करीत असताना जे सदस्य आमदारांचे किंवा खासदारांचे मतदार आहेत त्यांच्याकडेच ग्रामीण भागातील नियोजन करण्याचे अधिकार असले पाहिजेत अशा प्रकारची जाणीवपूर्वक भूमिका घेतलेली आहे. नियोजनाच्या प्रक्रियेमध्ये आमदारांना सहभागी करुन घेण्याचा विचार या ठिकाणी मांडण्यात आला आहे, परंतु ते अधिकार जिल्हा परिषदेच्या सदस्यांनाच असावेत असे माझे स्पष्ट मत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी निसर्ग लहरी आहे, अवेळी पाऊस पडतो, कोकणातील फळांबद्दल व नाल्यांबद्दल त्यांनी अचूकपणे सर्वांना मार्गदर्शन केले आहे. कोकणामध्ये प्रचंड पाऊस पडतो, परंतु पावसाचे संपूर्ण पाणी वाहून जाते. पावसाळ्यानंतर त्या गावातील लोकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागते. अशा परिस्थितीमध्ये घराच्या छतावर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.लक्ष्मण ढोबळे....

पाणी साठविले पाहिजे, पाझर तलावामध्ये पाणी साठविले पाहिजे आणि पुढील काळात हा विषय गंभीरपणे हाताळला पाहिजे अशा प्रकारची सूचना केली आहे. महाराष्ट्रामध्ये अशा लहानमोठ्या 70 नद्या वाहतात. उन्हाळ्यामध्ये त्या नद्यांमध्ये पाणीही नसते. काही ठिकाणी नद्यांचे पाणी अडविलेले आहे. कर्नाटक आणि आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये नद्यांचे पाणी वाहून जाते. हे वाहून जाणारे पाणी अडविले पाहिजे अशा प्रकारची त्यांनी भूमिका घेतली आहे. गळाभर पाण्यात उभे राहून ओंजळ भर पाणी घेऊन आचमन करण्यासारखे नदीचे पाणी आज का राहिले नाही, याबाबत नदीकाठी राहणाऱ्यांनी आणि नदीचे पाणी घाण करणाऱ्यांनी चिंतन करण्याची गरज आहे. पाणी हातामध्ये घेऊ शकत नाही, पंचगंगा सारख्या नदीतील पाणी खराब झाले आहे. पर्यावरण विभागाने त्यांना 140 नोटिसा दिलेल्या आहेत. परंतु त्यांच्या कोडगेपणात किंवा वागण्यात बदल झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे या सगळयाचा विचार करता कडक असे शासन करणारा कायदा करण्याची गरज आहे असे शासनाचे मत झालेले आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी आपली भूमिका विस्ताराने मांडली आहे. शिरपूर येथील पाण्याची पातळी 400 फुटावरुन 25 फुटावर आलेली आहे. तेथे हा उपक्रम चांगल्या प्रकारे राबविल्याबाबत त्यांनी संबंधितांचे कौतुक केले आहे. काही आमदारांसह मी शिरपूरला जाणार आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्याच्या संदर्भातील विधेयक क्रमांक 42 या सभागृहात मी मांडले होते. ते विधेयक दोन्ही सभागृहाने एकमताने मंजूर केलेले आहे. त्या विधेयकामध्ये पिण्याच्या पाण्याचे रक्षण करण्यासंबंधीच्या तरतुदी केलेल्या आहेत. राजस्थान, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील भूगर्भातील पाण्याचा अभ्यास करुन तो कायदा तयार करण्यात आलेला आहे. पाण्याची व्यवस्था उत्तमरितीने करण्याच्या दृष्टीने हे विधेयक अतिशय योग्य आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

आदरणीय सन्माननीय सदस्य श्री. विजयदादा मोहिते-पाटील यांनी पाण्यावर प्रक्रिया न करता ते भीमेत सोडले जाते अशी तक्रार केलेली आहे आणि ती वस्तुस्थिती आहे. अशा प्रकारचे प्रक्रिया न केलेले पाणी नदीत सोडल्यामुळे 200 गावे, 14 नगरपालिका आणि सोलापूर महानगरपालिका यांना दूषित पाण्याचा पुरवठा होतो. परिणामी तेथील लोकांना साथीच्या रोगांना बळी पडावे लागते अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, लोकसंख्येच्या प्रमाणात वाढीव पाणीपुरवठा योजना केल्या पाहिजेत अशा प्रकारची जी सूचना आदरणीय दादासाहेबांनी केलेली आहे ती शिरसावंद्य मानून पेरीअर्बनचा भाग असो अगर वाढती लोकसंख्या असो, या गोष्टी विचारात घेऊन माणसी 70 लिटर याप्रमाणे आम्ही पाण्याची व्यवस्था करु असे मी निमित्ताने सांगू इच्छितो. महाराष्ट्रातील अनेक जिल्हयामध्ये फिरुन मी पाण्याची वस्तुस्थिती पहात असतो. सभापती महोदय, आधीच्या काळामध्ये 5 कोटीची योजना असेल तर ती फार मोठी रक्कम वाटायची. 5 कोटीची योजना गावात होत असेल तर ते फार मोठे काम वाटायचे. 10 टक्के वर्गणीनुसार 5 कोटीच्या योजनेसाठी त्या गावाला 50 लाख रुपये भरावे लागतात. एवढी मोठी रक्कम भरणे आता अवघड झालेले आहे. कारण गेल्या 15 वर्षातील किंमतीचा चढता आलेख आपण लक्षात घेतला तर जी योजना 10 वर्षापूर्वी 5 कोटी रुपयामध्ये होत होती त्या योजनेसाठी आता 15 कोटी रुपये लागत आहेत. 15 कोटी रुपयाची योजना करायची असेल तर त्या गावाला 10 टक्के लोकवर्गणी प्रमाणे दीड कोटी भरावे लागतात. हे दीड कोटी रुपये भरताना ठेकेदार बाईट पध्दतीने काम करतो, कामाच्या दर्जाला दगा देतो. अशा प्रकारे गावाची योजना होत असताना अनेक प्रकारच्या अडचणी येतात.

सभापती महोदय, आपण नदीच्या काठावर जो स्त्रोत घेतो ती जागा गावाच्या मालकीची असते. पाण्याची टाकी बांधण्यासाठी गावाच्या वेशीवर जी अर्धा एकर जागा आपण घेतो ती गावाच्या मालकीची असते. गावाच्या मालकीच्या असलेल्या या जागेची किंमत 10 टक्क्याच्या लोकवर्गणीमध्ये धरुन उर्वरित 2 किंवा 3 टक्के रक्कम गावाने भरावी अशा प्रकारचा प्रस्ताव माझ्या सचिवांकडून, सदस्य सचिवाकडून लवकरच कॅबिनेट पुढे आणणार आहोत. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अतिशय उत्तम प्रकारच्या सूचना केलेल्या आहेत. अतिशय तरुण वयात वडिलांच्या आशीर्वादाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मण ढोबळे...

सभागृहामध्ये येणे झाल्यानंतर पाहिल्यांदा 17 घरांच्या इमारती मधील पाणी गढूळ झालेले आहे अशा प्रकारचा विषय त्या तरुण आमदाराने मांडणे हा देखील एक जिव्हाळ्याचा आणि संवेदनशील मनाचा विषय आहे. एका सुशील बापाचा सुशील चिरंजीव या सभागृहामध्ये 17 घराबद्दल बोलतो त्यावेळी त्यांनी केलेल्या सूचनांचा आदर करणे हे देखील मी माझे कर्तव्य समजतो. या ठरावाच्या निमित्ताने ज्या काही सूचना करण्यात आलेल्या आहेत त्या सूचनांचा मी आदर करतो.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्या अंगणातील पाणी कसे असावे हे आपणच ठरवायचे आहे. निळया परकरातील एखादी पोर जेव्हा आपल्या अंगणामध्ये रांगोळी काढते त्यावेळी ती आपल्या आयुष्याच्या संसाराचा डीपी प्लॅन मंजूर करीत असते. ती रांगोळी कशी असावी हे कागदाने सांगण्यापेक्षा त्या मुलीनेच ती रांगोळी कशी असावी हे ठरविण्याचा हा विषय आहे. त्यामुळे गावाचे पाणी कसे असावे हे मंत्र्यांनी कॅबिनमध्ये बसून ठरविण्यापेक्षा, आयएएस अधिका-यांनी पंख्याखाली बसून ठरविण्यापेक्षा माझ्या गावाला काय हवे हे त्या गावानेच ठरवून त्या योजना करावयाच्या आहेत. दिवाळीला गावाकडे एखादा मोठा भाऊ आल्यानंतर धाकट्या भावाला त्याने सूचना कराव्यात तशा प्रकारच्या आरतीच्या भोवताली बसून केलेल्या सूचना मी शिरसावंद्य मानतो. एवढे सांगितल्या नंतर सन्माननीय सदस्यांनी त्यांचा ठराव मागे घ्यावा अशी मी विनंती करतो.

--

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. राजन तेली : सभापती महोदय, जलस्वराज आणि भारत निर्माण या योजनांच्या कामांची यांची परिस्थिती आपण बघा. बऱ्याच ठिकाणी लोकांनी या योजनेच्या कामांचे ॲडव्हान्स पैसे काढले आहेत, परंतु प्रत्यक्षात त्यांनी या योजनेची कामे केलेली नाहीत. त्या लोकांविरुध्द कोणती कारवाई करणार आहात ? नळ पाणी पुरवठा योजनेसाठी 10 टक्के लोकवर्गणी भरावी लागते. ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना 10 टक्के लोकवर्गणी भरणे परवडत नाही. तर ही लोकवर्गणी शासनास कमी करता येईल काय ? जिल्हा परिषदा आराखडा तयार करीत असते ही गोष्ट मला मान्य आहे. पाणी टंचाईची कामे फायनल करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे जातात आणि जिल्हाधिकारी कामांची ऑर्डर काढतात. पाणी टंचाईची "अ" "ब" पत्रके भरुन झाल्यानंतर ती जिल्हाधिकारी यांच्याकडे जातात. त्यानंतर जिल्हाधिकारी यासंबंधी ऑर्डर काढतात. जिल्हा परिषद आराखडा तयार करते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे सुध्दा आय.ए.एस.आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून जिल्हाधिकारी यांच्याकडे यासंबंधीचा संपूर्ण पत्रव्यवहार करावा लागतो, त्यात बराच कालावधी जातो. वेळेची बचत व्हावी व कामे सत्वर व्हावीत म्हणून पाणी टंचाईची कामे फायनल करण्यासंबंधीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येतील काय ?

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना नेहमीच्याच वेळेमध्ये हा वार्षिक आराखडा मंजूर करुन पाणी पुरवठा मंजूर करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे देण्यात आलेले आहे. परंतु दुष्काळापूरती जी पाणी टंचाई आहे, त्या ठिकाणची वस्तुस्थिती पाहून निर्णय घेण्याबद्दलचे अधिकार मात्र माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे दिलेले आहेत. बाकीच्या वेळी हे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडेच दिलेले आहेत.

श्री. हेमंत टकले : शासनाने नळ पाणी पुरवठा योजनेसाठी ग्रामपंचायतींनी 10 टक्के लोकवर्गणी भरली पाहिजे अशी अट टाकलेली आहे. पाणी पुरवठा योजनेच्या टाकीसाठी ग्रामपंचायतीकडून जी जमीन घेऊ त्याची किंमत वजा करुन जी रक्कम शिल्लक राहील तेवढी त्यांनी द्यावी. ही अट संपूर्ण राज्यासाठी म्हणून ठीक आहे. परंतु एकूण संपूर्ण राज्याचा विचार करताना एखादे गाव सगळया दृष्टीने मागे पडलेले असेल व त्या गावाचे उत्पन्न अतिशय कमी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

असेल. तर त्या गावाची ग्रामपंचायत लोकवर्गणीची रक्कम भरु शकत नाही. पर्यायाने त्या ग्रामपंचायतींची पाणी पुरवठा योजनेची कामे होऊ शकत नाही. लोकवर्गणीचे निकष प्रत्येक गावाची भौगोलिक, आर्थिक तसेच त्या गावात राहणाऱ्या लोकांचे जीवनमान, त्यांची आर्थिक क्रयशक्ती या मुद्यांना प्राधान्य देऊन अशा ग्रामपंचायतीसाठी सवलतीची योजना जाहीर करण्याचा शासन विचार करील काय ?

प्रा.लक्ष्मण ढोबळे : दर दिवशी प्रति माणशी खेडयातील माणसाकडून फक्त दोन रुपये मागतो. हे दोन रुपये थांबवून आपण दवाखान्यात 5 हजार रुपये भरतो ही गोष्ट थांबविली पाहिजे. तिकीट काळयाबाजारातील असेल तर ते आपण जास्त पैसे देऊन विकत घेतो. अनेक चैनीच्या वस्तू असतील, त्या घेताना आपल्याला अडचण येत नाही. 5 माणसाचे कटुंब असेल तर मोबाईल सहज आपल्या हातात येतो. या सगळया गोष्टी शक्य होत असताना आरोग्यावर आघात करणारी पाणी व्यवस्था स्वच्छ आणि दुरुस्त करताना त्यांनी दोन रुपयांचे योगदान केले तर त्यात काही गैर नाही. जावळ वाढलेल्या बाळासाठी देताना बापाने तेवढी खिशाला चाट लावावी.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझ्या अशासकीय ठरावाच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी अतिशय उपयुक्त अशा सूचना केल्या आहेत. त्या ठरावास सन्माननीय पाणी पुरवठा मंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांनी अतिशय समर्पक असे उत्तर दिले आहे.

सभापती महोदय, मी माझ्या खेडया गावात पिण्याच्या पाण्याची समस्या अतिशय जवळून पाहिलेल्या आहेत. तशाच प्रकारच्या समस्या आजही ग्रामीण भागात दिसून येतात. त्या समस्या पाहून खरोखरच मनात एक खंत निर्माण होते. माननीय प्रा.लक्ष्मणराव ढोबळे हे पाणी पुरवठा विभागाचे अतिशय कार्यक्षम मंत्री आहेत. त्यामुळे पाणी पुरवठा संदर्भात ज्या काही सूचना, मागण्या मान्य होतील अशा अपेक्षेने हा अशासकीय ठराव सभागृहात मांडला होता. या ठिकाणी माननीय मंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांनी आम्हा सदस्यांच्या शंकांचे निरसन केलेले आहे आणि ज्या योजनांची आम्ही मागणी केलेली आहे, त्या सोडविण्याच्या बाबतीत सकारात्मक असा प्रतिसाद त्यांच्याकडून मिळालेला असल्यामुळे माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

यानंतर श्री. कानडे...

अशासकीय ठराव / गैरसरकारी नाही

पृ.शी : बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम,2000 ची काटेकोरपणे व प्रभावी अंमलबजावणी होणे.

मु.शी : बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम,2000 ची काटेकोरपणे व प्रभावी अंमलबजावणी होणे याविषयावरील डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा ठराव.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडते.

" बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम,2000 अनुसार देशातील सर्व मुलांच्या संरक्षणाची जबाबदारी शासनावर आहे. परंतु सदर कायद्याची माहिती राज्यातील बहुतेक पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकाऱ्यांना नाही. प्रत्येक जिल्हयात पोलिसांची जिल्हा पातळीवर विशेष बाल पथके नियुक्त करण्यात आलेली नाही.त्यामुळे राज्यात बालकांवरील अत्याचारांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाणे व देशात महाराष्ट्र राज्य तिसऱ्या स्थानावर आहे. त्यामुळे सदर कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात प्रभावीपणे व काटेकोरपणे करण्यात यावी आणि बालहक्क आयोगास आर्थिक सहाय्य करुन तो सक्षम करण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, बालअपराधी म्हणून समाजात ही मुले ओळखली जातात. परंतु एका विशिष्ट परिस्थितीत आणि संकटग्रस्त मुले म्हणून ओळखणे योग्य राहील असे मला वाटते. याबद्दलचा कायदा लोकसभेने 22 ऑगस्ट 2006 रोजी मान्य केलेला आहे. अतिशय प्रभावी असा हा कायदा आहे. याबद्दलची परिस्थिती पाहिली म्हणजे पुण्यातील शुभम शिर्केची केस जरी आपण लक्षात घेतली तर त्यामध्ये छोटया मुलांनी त्याच्या मित्रांनी खंडणीसाठी अतिशय निर्धृण पध्दतीने त्याचा खून केला होता. हीसुध्दा मुले अल्पवयीन आहेत. म्हणजे जो पीडित मुलगा होता तो सुध्दा अल्पवयीन आणि ज्यांनी खून केला ती मुले सुध्दा अल्पवयीन आहेत. अनाथालये, मतिमंद असणारी मुले विशेषत: मुली, कर्णबधिर मुले, ज्यांच्या कुटुंबामध्ये समस्या आहेत म्हणून निराधार झालेली मुले आणि मुली यांचा समावेश आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

यासोबतच कायद्यानुसार त्याचा व्यापक दृष्टीकोन असल्यामुळे विशिष्ट परिस्थितीमधील संकटग्रस्त मुले आणि मुली या कायद्यामध्ये येतात. भिक्षा मागण्यासाठी भाग पाडले जाते अशी मुले आणि मुली, निराधार मुले आणि मुली, वेश्या आणि कुंटणखाना परिसरात राहणारी मुले आणि मुली यामध्ये येतात. जी दुर्लक्षित मुले आहेत तसेच भूकंप,वादळ, अपघात आणि बॉम्बस्फोट अशा परिस्थितीमध्ये जी मुले निराधार होतात या मुलांचे पालकत्व सरकारवर असते. काही वेळा असे दिसते की, या मुलांचा विविध कारणांसाठी उपयोग होत असताना अपराधासाठी अशी संकटात सापडलेली मुलेसुध्दा वापरणारे बरेच सूत्रधार आहेत. म्हणून एकूण सामाजिक परिस्थिती लक्षात न घेता या कायद्याबद्ल विचार करायला लागलो तर आपल्याला असे दिसते की, बालकांना क्रूरपणे वागविणारे जे लोक आहेत त्यामध्ये मद्य आणि गुंगी यांची सवय लहान मुलांना लावणाऱ्या टोळया काही ठिकाणी दिसून येतात. तसेच बाल कर्मचाऱ्यांचे शोषण करताना काही ठिकाणी दिसून येते. तसेच घातक रोगाने त्रस्त असणारी मुले यामध्ये येऊ शकतात. कुष्ठरोगाने त्रस्त असलेली मुले किंवा एच.आय.व्ही.ग्रस्त मुले असतात किंवा ज्या मुलांमध्ये अस्थिव्यंग आहे अशी मुले असू शकतात. या मुला-मुलींना कुटुंबाचे संरक्षण नसल्यामुळे बऱ्याच वेळेला अयोग्य मार्गाला लावल्याचे दिसून येते. यासोबत या कायद्यानुसार देशातील इतर राज्यातून भटकत जी मुले महाराष्ट्रात येतात त्या मुलांना त्यांच्या राज्यांमध्ये सुरक्षितपणाने पोहोचविणे ही जबाबदारी ज्युविनाईल जस्टीस ॲक्टनुसार राज्य शासनावर आहे.

नंतर श्री.भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

जशी ही जबाबदारी इतर राज्यांबद्दलची आहे तशीच जबाबदारी आसपासच्या देशामधून जर का काही कारणांमुळे विशेषत: छोट्या मुली वेश्या व्यवसायासाठी राज्यामध्ये आणल्या जातात, त्यावेळी त्यांची सुटका केल्यानंतर त्यांची काळजी घेऊन पुन्हा त्यांच्या देशामध्ये पोहोचविण्यापर्यंतच्या मधल्या काळात निवारा गृहामध्ये किंवा विविध प्रकारच्या शासकीय होममध्ये रहात असताना शासनावर त्यांची जबाबदारी असल्याचे दिसून येते. प्रत्येक वेळेला फक्त आकडेवारीतून काही साध्य होत नाही. बालकांच्या प्रश्नावर सर्वात मोठे उदात्तीकरण हिंदी आणि मराठी सिनेमांमधून केले जाते. गाडीवर फडका मारणारा एखादा बाल नायक गाडी पुसता पुसता डॉन बनून बाहेर पडतो. अशा प्रकारचे उदात्तीकरण चित्रपटात दाखविले जाते.

सभापती महोदय, आज कोणत्याही पोलीस निरीक्षकाला विचारले तर ते सांगतात की, कोणत्याही झोपडपट्टीमध्ये अशी शेकडो मुले आहेत. ती मुले शाळेत जात नाहीत. शाळा नसल्यामुळे आणि कोणतेही काम नसल्यामुळे त्या त्या भागामध्ये भटकत असतात. मग त्यांच्या जे जे काही हाती येईल त्याच्या आहारी जातात. काही मुले शाळेपर्यंत पोहोचत नाहीत. अशा आपद्ग्रस्त मुलांच्या माथ्यावर क्राईमचा शिक्का बसतो. छोट्या छोट्या घटना भरपूर आहेत. प्रत्येक घटनेबाबत लक्षवेधी सूचना, नियम 93 ची सूचना मांडून लक्ष वेधता येते. परंतु या आयुधांची मर्यादा अशी आहे की, एखाद्या अधिकाऱ्याचे निलंबन करावे किंवा शासकीय होम बंद करुन तेथील मुले इतरत्र हलविणे या पलीकडे कोणता तोडगा काढता येईल हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, आकडेवारी पाहिली तर विधी संघर्षामुळे 2000 साली 1641 गुन्हे दाखल झाले होते. 2010 मध्ये म्हणजे गेल्या 10 वर्षात ही संख्या 1641 वरुन 4315 वर गेली. 2011 मध्ये 4775 गुन्हयांची नोंद झाली. गेल्या 10 वर्षातील गुन्हयांची संख्या पाहता ही धोक्याची घंटा आहे. सर्वाधिक गुन्हे मुंबई आणि त्यानंतर पुणे, ठाणे व नाशिक जिल्हयात झालेले आहेत. औरंगाबादमध्ये गेल्या तीन वर्षात गुन्हयांची संख्या कमी झाली असली तरी स्वरुप गंभीर झालेले आहे. गेल्या आठवड्यात औरंगाबादमध्ये मुलींच्या आश्रमामध्ये राहणाऱ्या मुलींना वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडण्यामध्ये निवृत्त पोलीस उप अधीक्षकांचे घर वापरले जात होते अशा प्रकारची केस दाखल झाली आहे. ही केस चर्चेला येईल तेव्हा निश्चितपणे बोलता येईल. बाल संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये आपल्याला काय काय त्रुटी दिसतात, त्याबाबत काय दुरुस्ती केली

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

पाहिजे या मुद्याकडे वळण्यापूर्वी एकूण जी बालगृहे आहेत त्यासाठी बालकल्याण समितीच्या नवीन तरतुदीनुसार 0 ते 6 वयोगटातील मुलांना बालगृहामध्ये, 6 ते 12 वयोगटातील मुलांना कनिष्ठ बालगृहामध्ये आणि 13 ते 18 वयोगटातील मुलांना वरिष्ठ बालगृहामध्ये प्रवेश देण्यात येतो. या बद्दलची मांडणी करीत असताना स्पार्क संस्थेच्या अध्यक्षांनी मला जी एक टिप्पणी दिली आहे तिचा मी संदर्भ घेऊ इच्छिते. मी या विषयावर बरीच वर्षे काम करीत आहे. त्यांनी या टिप्पणीमध्ये 10 मुद्दे मांडले आहेत.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी गणपूर्तीची आवश्यकता असते. सभागृहात केवळ सात माननीय सदस्य उपस्थित आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : अशासकीय कामकाजासाठी गणपूर्तीची आवश्यकता नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभागृहाची बैठक सुरु असताना गणपूर्तीची आवश्यकता असतेच. आपण ही बाब तपासून घ्यावी.

नंतर श्री.खर्चे...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : दैनिक सकाळमधील बातमी असून त्यात "स्पार्क" या संस्थेने याबाबत टिप्पणी दिली आहे. आज राज्यातील शासकीय बालगृहांचा विचार केला तर प्रत्येक मुलाच्या दररोजच्या भोजन व इतर खर्चासाठी प्रतिदिनी फक्त 21 रुपये दिले जातात. त्यामुळे महिला व बालविकास विभागाला सुध्दा समाजात महिलांना ज्याप्रमाणे दुय्यम स्थान दिले जाते तसेच या विभागालाही दिले जाते की काय अशी शंका आहे. याचे कारण म्हणजे या विभागाला आवश्यक तेवढा निधी मिळत नाही. याच फिल्डमधील माझी मैत्रीण ज्या केंद्रात महिला व बालविकास सचिव पदावर कार्यरत होत्या त्यांनी त्यांच्या विभागाची टिप्पणी करताना सांगितले की, महिलांच्या बाबतीत देशात व राज्यात "वेस्ट पेपर बास्केट ॲप्रोच" अशी परिस्थिती दिसून येते. म्हणजेच या विभागाकडे आर्थिक सत्ता व मनुष्यबळ देण्याची गरज आहे पण त्याचा मात्र कोठेही विचार केला जात नाही असे त्यांनी इतक्या वर्षाच्या अनुभवानंतर म्हटले आहे.

त्याप्रमाणे आपल्या राज्यात शासकीय बालगृहांची संख्या 33 असून स्वयंसेवी संस्थांची बालगृहे 1073 आहेत. शासकीय बालगृहांमध्ये 3490 मुलांची क्षमता आहे मात्र प्रत्यक्षात 2490 एवढीच बालके आहेत, अशी आकडेवारी दैनिक सकाळने दिलेली आहे. तर स्वयंसेवी संस्थांच्या 1073 बालगृहांमध्ये 87844 बालकांची क्षमता असून 70 हजाराच्या वर बालके तेथे राहत आहेत. त्यानंतर राज्यात शासकीय निरीक्षण बालगृहांची संख्या 12 असून त्यात 700 बालके आहेत. तर स्वयंसेवी संस्थांची निरीक्षण गृहे 4275 एवढी आहेत. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या उपाययोजना बालकांसाठी सुचविलेल्या आहेत. त्यावरुन एक गोष्ट स्पष्ट दिसते की, या बालगृहांसाठी सोई-सवलती आवश्यक असताना मात्र शासनाने दुटप्पी भूमिका स्वीकारलेली आहे. त्यासंदर्भात श्री. राजेंद्र अंदुले या पुण्याच्या वकीलांनी 29004/11 या क्रमांकाची एक पीआयएल उच्च न्यायालयात दाखल केली आहे. त्यात त्यांनी राज्यात बाल न्याय अधिनियमाची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नसल्याची तक्रार केली आहे. याचा अर्थ यासंदर्भात कोर्टात प्रकरण सुरु आहे.

महोदय, यानंतर दुसरा मुद्दा म्हणजे या क्षेत्रात जे कर्मचारी काम करीत आहेत त्यांच्या वेतनाच्या संदर्भात स्पष्टपणे दुजाभाव केलेला दिसतो. या पार्श्वभूमीवर विविध गृहांचा विचार केला तर कर्मचारी वर्गावर अनुदान फार तोकडे मिळते ही आजची वस्तुस्थिती आहे. म्हणून याबद्दल जास्त प्रमाणात काम करीत असताना ज्युवेनाईल जस्टीसनुसार 10 कर्तव्ये शासनावर सोपविलेली

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे.....

आहेत. त्यात सल्लागार मंडळ असणे आवश्यक आहे. पण राज्यातील 21 जिल्ह्यांमध्ये अणि 16 महानगर पालिकांमध्ये अशा प्रकारची सल्लागार मंडळे अस्तित्वातच नाहीत असे या अहवालाचे म्हणणे आहे. निरीक्षण गट प्रत्येक बालगृहासाठी नेमला पाहिजे.

महोदय, पुण्यातील येरवडा येथे मी गेल्या दोन वर्षात तीन वेळा भेटी दिल्या. विशेषत: विधिसंघर्षग्रस्त जी मुले आहेत ती तेथून पळून जाण्याच्या घटना घडल्या. मी पहिल्यांदा भेट दिली तेव्हा मला कळले की, या मुलांना भीती वाटत होती म्हणून त्यांनी कलथ्याने भिंत तोडून छिद्र तयार केले व त्यातून 12-13 मुले पळून गेली, त्यातील काही मुले पुन्हा तेथेच परत आली होती. त्यातील काही मुलांना मी विचारले की आपण येथून का पळून गेलात, त्यावर ती मुले म्हणाली आम्हाला आमच्यातीलच काही दांडगी मुले त्रास देतात म्हणून पळून गेलो. तसेच या बालगृहात एवढ्या मुलांसाठी एकच स्वच्छता गृह व त्यातही पुरेसे पाणी नसल्याने दुर्गंधी येते त्यामुळे येथे राहणेही शक्य नाही. यासंदर्भात मला अशी सूचना करावयाची आहे की, जी शासकीय बालगृहे आहेत तेथून लहान मुलांचे लैंगिक शोषण होत असल्याच्या अनेक तक्रारी येत असतात तसेच काही प्रमाणात दांडगाई सुध्दा तेथे चालते म्हणून आपल्या बजेटमध्ये या मुलांच्या रुममध्ये सीसीटीव्ही का बसवित नाहीत? कारण त्यामुळे या मुलांवर बंधने येतील. त्याचबरोबर या मुलांची राहण्याची व्यवस्था पाहिली तर 32 मुलांसाठी 30 फुटाची एकच रुम असून त्या एकाच खोलीत या मुलांना रात्रभर बंद केले तर ती मुले काय करतील हे सांगण्याची गरज नाही. तसेच आम्हाला त्या मुलांनी सरळ सांगितले की, आमच्यातील दांडग्या मुलांचीच आम्हाला भीती वाटते.

यानंतर श्री. जुन्नरे ...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

तेव्हा तेथील स्टाफने मला सांगितले की, मॅडम आम्हाला या मुलांची भिती वाटते. यातील काही मुलांचे तर फार वर पर्यंत कनेक्शन्स असतात. आम्ही त्यांना बोललो तर ते आमच्यावर हल्ले करतात, त्रास देतात, धमक्या देतात. बालगृहाच्या हॉलमध्ये सीसीटीव्ही बसवण्यात आलेले आहेत हे मुलांना समजले तर ती मुले सीसीटीव्ही यंत्रणा सुध्दा बंद करुन टाकतात. सर्वच मुले अपराधी आहेत असे नाही. परंतु हॉलमध्ये काय चालले आहे हे सीसीटीव्ही मुळे समजून येईल. काही मुले रात्रीच्या वेळेस इतर मुलांवर अत्याचार करीत असावेत अशी मला शंका आहे. खरे म्हणजे याच कारणामुळे सुधार गृहातील मुले पळून जात असतात.

सभापती महोदय, मुंबई मध्ये 31 डिसेंबरला दारु प्यावयास मिळाली नाही म्हणून सुधार गृहातील काही मुले पळून गेली होती. काही सुधार गृहात मला तर 6-6,7-7 वर्षाची लहान मुले सुध्दा असतात. मी त्या मुलांना विचारले की, तुम्ही या ठिकाणी कसे काय आलात त्यावेळी मुलांनी सांगितले की, आम्ही वर्ध्यावरुन आलो असून लक्ष्मी रोडला गटारे साफ करीत होतो त्यावेळी आम्हाला पकडण्यात आले आहे. यासंदर्भात मला अधिकाऱ्यांनी सांगितले की, सराफाबाजारामध्ये काही लोक असे आहेत की, गटारामध्ये मोठया माणसांना शिरणे अवघड होते त्यामुळे लहान मुलांना गटारात उतरवून त्यातील गाळ वर आणतात व त्या गाळामध्ये सोन्याचे कण असतात त्यामुळे असे प्रकार होत असतात.

सभापती महोदय, काही घटनांमध्ये मोठया गुन्हेगारांना शिक्षा होण्याची भिती वाटत असते तेव्हा लहान मुलांचा वापर केला जात असतो.

सभापती महोदय, निरीक्षण गट आज अस्तित्वातच नाही. आपण ज्युवेनाईल जस्टीस कमिट्या केलेल्या आहेत परंतु ही मुले काय करतात, काय खातात, शिकतात की, नाही याकडे काहीही लक्ष दिले जात नाही. मी या मुलांना विचारले की, तुम्हाला पुस्तके दिली जातात काय ? त्यावेळेस त्या मुलांनी सांगितले की, आम्हाला पुस्तके दिली जात नाहीत. सरकारी बालगृहात लहान मुलांना साधारणत: 25-30 दिवसांसाठी ठेवले जात असते. परंतु त्यांना वाचण्यासठी पुस्तके ठेवण्यास आपल्याला काय अडचण आहे ? वाटले तर मंत्री महोदयांनी माझ्याबरोबर सुधार गृहाला भेटी दिल्या तर यासंदर्भातील सर्व परिस्थिती त्यांना समजून येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, अधिकारी सांगतात की, मुलांना पुस्तके नको तर टीव्ही पाहिजे असतो. आपल्या घरातील मुलांना आपण वळण लावतो तेव्हाच आपली मुले पुस्तक वाचण्यास सुरुवात करतात हे आपण कसे काय विसरता ? खरे म्हणजे सुधार गृहातील मुलांना परीक्षेला बसू दिले गेले पाहिजे. जी मुले सारखी तेथेच राहतात अशा मुलांना काही ठिकाणी परीक्षा देता येते. त्यामुळे मुलांच्या गरजा काय आहेत हे पहाण्यासाठी निरीक्षण गटाची फार आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाल सुधार गृहासाठी बाल संरक्षण युनीट असण्याची नितांत आवश्यकता आहे. ज्या मुलांना संरक्षणाची गरज आहे अशा मुलांना संरक्षण देण्याची गरज आहे. एखाद्या गुन्ह्यामध्ये छोटे मूल साक्षीदार असेल किंवा मोठया गुन्हेगाराबरोबर छोटे मूल असेल तर अशा वेळेला छोटया मुलांवर हल्ले होण्याची शक्यता असते.

सभापती महोदय, मी सांगू इच्छिते की, काही अल्पवयीन मुलींना वेश्याव्यवसायात ढकलण्यात आलेले आहे. पुणे, अकोला, वर्धा, सातारा, बीड या ठिकाणी बाल संरक्षण युनीट स्थापन करण्यात आले नसल्याचे सांगण्यात आलेले आहे. सांगली आणि रत्नागिरी या दोन जिल्हा परिषदेने माहिती निरंक असल्याचे कळवले आहे. किमान 21 जिल्हयांमध्ये बाल संरक्षण युनीट अस्तित्वातच नाही. काही ठिकाणी 17 पोलीस स्टेशनमध्ये 17 पोलीस अधिऱ्यांची बालकल्याण अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आल्याचे कळवण्यात आलेले आहे. परंतु हे पोलीस अधिकारी त्यांच्या कक्षेतील बालगृहाला भेट देत नसतील तर एक पात्री नाटकासारखी अवस्था होईल. असे जर होत असेल एकच पोलीस अधिकारी तो बाल संरक्षण अधिकारी,ॲट्रोसिटी अगेन्स्ट अधिकारी म्हणून काम करीत असेल तर तो कशा प्रकारे काम करत असेल याचा विचारच केलेला बरा.

सभापती महोदय, बाल न्याय मंडळाचा विचार केला तर 16 महानगरपालिकांमध्ये बाल न्याय मंडळ नाही. अमरावती, ठाणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, भिवंडी, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, नवी मुंबई यांनी स्थापनेसाठी अर्ज केलेले आहेत परंतु त्यांना मान्यता मिळाली आहे की, नाही यासंदर्भातील माहिती माननीय मंत्री महोदयांकडून मिळण्याची आवश्यकता आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, फक्त मुंबई शहरातच बालकल्याण समिती आहे परंतु यासंदर्भातील माहिती बाकीच्या जिल्हयातून आलेली नाही. काही ठिकाणी बालकल्याण समित्या आहेत परंतु सर्व जिल्हयांचा आढावा घेणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, बालगृहात 7-12, 13-16 आणि 17-18 वर्षाची मुले असतात. वाढत्या वयाच्या मुलांचे विचार वेगळे असतात, त्यांना मनोरजंनाची साधने,पुस्तके पुरवली जातात असे म्हटलेले आहे.

यानंतर श्री. भारवि....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

वेदवती आश्रमामध्ये मुला-मुलींना एकत्रितपणे ठेवल्याचे आम्ही पाहिलेले आहे. तेव्हा अशा आश्रमांची देखील तपासणी होणे आवश्यक आहे.

औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण हे देखील महत्त्वाचे आहे. पीडित मुलींना समुपदेशनाची गरज असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. काही मोलकरणींच्या मुलींवर अत्याचार झाल्याच्या घटना घडल्या आहेत. खून झालेले असतात किंवा आई वडिलांमध्ये काही घटना घडलेल्या असतात अशा स्थितींमध्ये ज्या मुली सापडलेल्या असतात त्यांचे समुपदेशन होताना दिसत नाही. त्यामुळे त्या मुलींना गेल्या गेल्या विचारले जाते की, तुला काय झाले ? मी स्वत: औरंगाबाद होमला भेट दिली होती. त्यावेळी बलात्कारी मुलीला एका वेगळ्या रूममध्ये ठेवले होते. मी विचारले, या एकट्याच मुलीला वेगळे का ठेवले ? तेव्हा मला सांगण्यात आले की, सगळ्या मुली तिला विचारतात की, तुझ्यावर अन्याय कसा झाला ते सांग. म्हणून तिला वेगळी ठेवली आहे. इथ पर्यंत सगळे ठीक आहे. पण त्या मुली बरोबर कोणी तरी बोलले पाहिजे. तिच्याशी चर्चा करून तिचे मन हलके केले पाहिजे. तिचे समुपदेशन केले पाहिजे. त्यामुळे प्रत्येक केसचे समुपदेशन होते किंवा नाही याचा ट्रॅक रेकॉर्ड आपण ठेवला पाहिजे, असे मला येथे सुचवायचे आहे.

काही बालगृहे एडस्ग्रस्त मुलांसाठी व मतिमंद मुलांसाठी आहेत. या मुलांसाठी देखील वेगवेगळ्या पद्धतीचे अधिकारी असणे आवश्यक आहेत. त्या मुलांना समजून घेणारे शिक्षक असले पाहिजेत. मतिमंद मुलांसंबंधी मी प्रश्न उपस्थित केला होता. ज्या मुलींवर अत्याचार झाले आहेत त्याचा काय स्टेटस आहे हे मला माहीत नाही. एखादी केस कोर्टामध्ये उभी राहिल्यानंतर त्या मुलीच्या जागेवर उद्या दुसरीच मतिमंद मुलगी केली जाणार नाही हे आपण पाहिले पाहिजे. कारण मतिमंद मुलीला स्वत:ची स्मृतीच नसते. अशा प्रकरणांमध्ये आपल्याला शिक्षकांचे प्रतिज्ञापत्र घ्यावे लागेल की, त्यावेळची हीच मुलगी आहे. कारण ती मुलगी स्वत: काहीच बोलू शकणार नाही.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवारा गृहांचा देखील प्रश्न आहे. अकोला, उस्मानाबाद, नागपूर,औरंगाबाद, रत्नागिरी, कोल्हापूर, अलिबाग, गडचिरोली, सिंधुदुर्ग, यवतमाळ, जालना, अमरावती, धुळे, सांगली,हिंगोली आणि सोलापूर या जिल्हा परिषदांनी निवारागृह कार्यान्वित नसल्याचे सांगितले आहे. पुणे जिल्ह्यात महिलांसाठी एकच शेल्टर रूम आहे. परंतु, 17 जिल्ह्यातील माहिती मिळालेली नाही.

अनुरक्षा गृहांचा मुद्दा देखील महत्त्वाचा आहे. मुले 18 वर्षाची झाल्यानंतर त्यांनी स्वत:च्या पायावर उभे रहावे म्हणून अनुरक्षा गृहांची उभारणी करण्यात आली आहे. अनुरक्षा गृहातील मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. आज अकोला, उस्मानाबाद, जालना, अमरावती, रत्नागिरी, अलिबाग, गडचिरोली, सिंधुदुर्ग, हिंगोली, यवतमाळ, धुळे, सोलापूर आणि सांगली येथे आफ्टर केअर होम उपलब्ध नाही. नागपूर जिल्ह्यात एका अनुरक्षा गृहाला मान्यता देण्यात आली आहे. अनुरक्षण गृह नसल्यामुळे मुले 18 वर्षाची झाल्यानंतर त्यांची हेळसांड होते. आपण प्रत्येकाला विचारतो की, तू शिक्षण कुठून घेतले, तू कुठून आलास. त्याने मी बालगृहातून आलो असे उत्तर दिले तर त्याला समाजामध्ये स्वीकारले जात नाही. म्हणून आफ्टर केअर होम ही हॉस्टेल सारखी भासली पाहिजेत. या मुलांच्या पुनर्वसनासाठी स्कील्ड स्टाफ असावा. आज आपल्याकडे स्कील्ड स्टाफ नाही.

आज अत्याचाराची संख्या वाढत आहे. त्यासाठी प्रतिबंधात्मक कोणता कार्यक्रम घेत आहात ? विशेषत: बाल हक्क आयोग आपण अजून पर्यंत नेमलेला नाही. यापूर्वीच्या बाल हक्क आयोगांच्या व्यक्तींबद्दल मला आदर आहे. तेथे कुणाचे तरी वशिल्याचे तट्टू आणून ठेवू नका. त्या क्षेत्रात त्यांनी 10 वर्षे क्रियाशील असले पाहिजे. निदान त्यांनी वर्षातून दहा कार्यक्रमाचे संयोजन केले पाहिजे. स्वत: काही केसेस हाताळल्या पाहिजेत. मंत्र्यांचे नातेवाईक नेमून त्यातून काहीही पुढे होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यांना एक मानाचे पद देऊन शासनाची परिस्थिती हास्यास्पद होत आहे, याकडे मला आपले लक्ष वेधायचे आहे.

दुसरे मी असे सुचविन की, गृह विभाग, माहिला बाल विकास विभाग यांची आपण एक बैठक घ्यावी. या बैठकीमध्ये स्पार्कने दिलेल्या दहाही मुद्यांची अमंलबजावणी झाली आहे किंवा नाही हे तपासणे गरजेचे आहे. ...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

बाल हक्क आयोग नेमत असताना ज्युवेनाईल जस्टीस ॲक्टस सह अन्य जे जे कायदे आहेत त्यानुसार दाखल झालेल्या केसेसचा आढावा घेणे आवश्यक आहे. आपण लोक अदालत घेतो तशा पद्धतीने 2-3 दिवस सातत्याने याचा आढावा घ्यावा.

यानंतर श्री.सरफरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

खास करुन त्या ठिकाणी पब्लिक प्रॉसिक्युटर नेमण्याची गरज आहे ते नेमण्यासाठी आवाज उठविण्याची गरज आहे. ज्या केसेसमध्ये आपल्याला यश मिळाले व जी मुले स्वत:च्या पायावर उभी राहिली त्यांची नावे बदलून तयार करण्यात आलेली त्यांची यशोगाथा लोकांपर्यन्त गेली पाहिजे. त्यामुळे जेणेकरुन काही मुला-मुलींची उमेद वाढू शकेल.

सभापती महोदय, बाल गुन्हेगारांविषयी बोलत असतांना लहान मुलांकडून अयोग्य पध्दतीने कामे करुन घेण्यात येणे, बाल मजुरी, मोलकरणीच्या मुलांवर होणारे अत्याचार, मालिकांमध्ये चुकीच्या पध्दतीने बालकांचे चित्रीकरण करुन घेणे असे प्रकार होत आहेत. 6 ते 7 वर्षाच्या मुलीकडून "तुझ्या ऊसाला लागेल कोल्हा" अशाप्रकारच्या गाण्यावर नृत्य करुन घेतले जाते व त्या बद्दल लोक टाळया वाजवितात याचे मला आश्चर्य वाटते. अशा गोष्टींमधून त्या मुलांवर कोणते संस्कार आपण करीत आहोत असा मला प्रश्न पडतो. एका बाजूला अशाप्रकारे समाजामध्ये अवडंबर माजविले जात असतांना त्याबद्दल आपला एक विभाग काही करु शकत नाही हे जरी खरे असले तरी या चर्चेच्या वेळी सभागृहामध्ये माननीय सांस्कृतिक मंत्री उपस्थित आहेत ही महत्वाची गोष्ट आहे. या साठी या संपूर्ण क्षेत्रामध्ये सुधारणा करण्यासाठी बाल हक्क आयोगाला आर्थिक सहाय्य करुन तो सक्षम करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आपण घोषित करावा याकडे लक्ष वेधून मी माझे भाषण संपविते. जय भीम, जय महाराष्ट्र.

ठराव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहामध्ये अशासकीय ठरावावर चर्चा सुरु होत असतांना गणपूर्तीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला त्यावेळी आपण त्याकडे थोडेसे दुर्लक्ष केले. अशाप्रकारे दुर्लक्षित विषय या सभागृहामध्ये चर्चेला येणे हाच त्या मागील आशय असू शकतो. त्या निमित्ताने सभागृहामध्ये विचार मंथन होणार असेल तर त्याचे स्वागत करावयास हवे. एकूण समाज रचनेमध्ये जी यंत्रणा असते ती कार्यक्षम असते की नाही हा वादाचा मुद्दा आपण थोडासा बाजूला ठेवला आणि ही संपूर्ण व्यवस्था विशिष्ट कायद्याच्या चौकटीमध्ये राहून करावी या अपेक्षेने लोकप्रतिनिधी कायदे करीत असले तरी प्रत्यक्षातील वास्तव हे पुस्तकामध्ये लिहिलेल्या गोष्टीपेक्षा खूप वेगळे असते. त्याचे विदारक चित्र नेहमी आपण पहात असतो.

सभापती महोदय, पूर्वी मुंबईत अशी पध्दत होती की, मुंबईमध्ये घरकामाला येणाऱ्या मुलाला "रामागडी" संबोधायचे. ज्या दिवशी दही हंडीचा सण असतो, त्या दिवशी त्यांना सुट्टी असल्यामुळे त्यांचा उदघोष होत असे. अशा प्रकारे या कामांसाठी लहान मुले कोकणातून आणली जायची. त्यावेळी अशा प्रकारची समस्या नव्हती कां? त्या समस्येने इतके विदारक किंवा भीषण रुप धारण केले नव्हते. त्या काळात मुंबईमध्ये काम करण्यासाठी लहान मुले आणली गेली तरी त्या मुलांना घरातील एका घटकाप्रमाणे वागणूक देण्याची संस्कृती पुष्कळ ठिकाणी अस्तित्वात होती. अशी अनेक उदाहरणे आपल्याला देता येतील. तो मुलगा घरामध्ये काम करण्यासाठी आहे, किंवा धुणी-भांडी करणाऱ्या बाईला सोबत म्हणून तिच्या बरोबर जाणाऱ्या तिच्या लहान मुलगी किंवा मुलाचे ते कुटुंब आस्थेवाईकपणे चौकशी करते, त्याच्या शाळेची विचारपूस करते, शाळेमध्ये कां जात नाही असे विचारते, त्याला शाळेमधून पुढे कसे जाता येईल यासाठी प्रयत्न आणि मदत करीत असते. त्यासाठी कोणताही कायदा नव्हता. त्यामधूनच डॉ. रघुनाथ माशेलकरांसारखे मोठे वैज्ञानिक समाजापुढे आलेले दिसतात. ही सकारात्मक बाजू असली तरी या परिस्थितीमधून सर्वत्र बिघडलेली आर्थिक स्तराची स्थिती याचा विचार केला तर आपल्याला ही मुले घरामध्ये ठेवून त्यांचे पालन पोषण करता येणे शक्य नसल्यामुळे त्यांना ट्रेनमधून बरोबर घेऊन जायचे आणि रात्र झाल्यानंतर बरोबर असलेल्या माणसाने मध्येच कुठेतरी उतरुन निघून जायचे असेही घडते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या सगळ्या बहुतेक गाड्या व्ही.टी.स्टेशनवर येत असतात. यापूर्वी आपण मुंबई येणाऱ्या लोढ्यांचे वर्णन करीत होतो. मात्र जी मुले निराधार आहेत, त्यांना स्टेशनवर सोडून देण्यात येते आणि यामध्ये सारखी भर पडत असते.समाजामध्ये जेवढी प्रगती होते, आर्थिक संपन्नता येते, त्याबरोबरच समाजामध्ये अंगीभूत असे अनेक दुर्गुणही आलेले असतात. अशा वेळी हे मूल स्टेशनवर असेच इकडे-तिकडे फिरत आहे. त्यामुळे भीक मागण्यासाठी आलेले मूल आपल्याला उपयुक्त होऊ शकेल अशा प्रकारचा विचार करुन या सगळ्याचा उपयोग काहीजण करुन घेत असतात.

सभापती महोदय, आपण सर्वांनी चार-पाच दिवसापूर्वी टी.व्ही.वर पाहिले असेल की, मुंबई स्टेशनवर रात्री आपल्या आई-वडिलांच्या सोबत झोपलेल्या दोन वर्षाच्या मुलीला अतिशय अलगद पणे एका माणसाने उचलून नेले आणि त्यानंतर तो माणूस दूर अंतरावरील एका प्रांतामध्ये सापडला. सुदैवाने पोलीस यंत्रणेला सीसी-टी.व्ही.च्या माध्यमातून या घटनेचे फुटेज मिळाले, त्याच बरोबर माध्यमांनी देखील याबाबत माहिती दिली. त्यामुळे त्या मुलीला तिच्या पालकांकडे सोपविता आले. ज्यावेळी मी परत आलेल्या मुलीचा फोटो पाहिला आणि ज्यावेळी एका महिला कॉन्स्टेबलच्या कडेवर बसलेली ती मुलगी पत्रकारांना सामोरी गेली तेव्हा मला पुन्हा एकदा या पोलीस विभागा बद्दल आपुलकी निर्माण झाली. याचाच अर्थ असा की, त्यांनी मनात आणले तर ही सगळी यंत्रणा मानवी दृष्टीकोनातून या सगळ्या प्रश्नांकडे पाहू शकते.

सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, कायद्याची एक चौकट असते आणि छोट्या-छोट्या अशा खूप गोष्टी असतात आणि मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की,त्यासाठी आपल्याला फार काही करावे लागत नाही. मघाशी आपण असे सांगितले की, मुलांना वाचनाची सवय असली पाहिजे, त्यांच्यामध्ये वाचनाची गोडी निर्माण करावयास पाहिजे. यासाठी आपण एखाद्या विभागामध्ये रहाणाऱ्या एका निवृत्त शिक्षकाकडे जाऊन त्यांनी या मुलांना एक तास गोष्टी सांगाव्यात असे सांगितले आहे काय? तसेच या मुलांचे गोष्टीच्या माध्यमातून प्रबोधन करावे जेणेकरुन त्याला अशी गोष्ट पुस्तकामध्ये वाचावयास मिळेल. मी यापुढे जाऊन सांगतो की, मी एका संस्थेमध्ये काम करतो.गावातील वेगवेगळया भागातल्या नागरिकांच्या वेगवेगळया मागण्या असतात. मग ते ज्येष्ठ नागरिक असतील तर त्यांना लायब्ररीपर्यंत जाणे शक्य नसते. अशा नागरिकांसाठी आम्ही एक ग्रंथ पेटी तयार करतो.त्यामध्ये जवळजवळ 100 पुस्तके ठेवलेली असतात आणि जर त्याठिकाणी कोणी ज्येष्ठ नागरिक याची व्यवस्था पहात असतील तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले . . . .

ती त्यांच्याकडे देतो. त्याठिकाणी संबंधितांना बसण्यासाठी कट्टा बांधलेला असतो. तसेच आम्ही या साठी कोणाकडूनही फी घेत नाही. ही पुस्तके त्यांच्याकडे साधारणपणे महिनाभर ठेवतो. मग तेथे येणारी लोक ती पुस्तक वाचतात.

सभापती महोदय, आम्ही पुढच्या महिन्यामध्ये त्यांना सदरहू 100 पुस्तकांची पेटी बदलून देतो. "ग्रंथ तुमच्या दारी" या योजनेच्या व्दारे आम्ही पुस्तकपेढी चालवितो आणि यासाठी कोणा कडूनही पैसे घेत नाही. कारण प्रत्येक पुस्तक पेटीसाठी आम्ही कोणीतरी देणगीदार शोधत असतो. याच्यातील आणखी एक भाग मला आज या चर्चेच्या निमित्ताने सांगावासा वाटतो की, आम्ही येरवड्याच्या जेलमध्ये सुध्दा कैद्यांसाठी पुस्तक पेटी दिली. आमची येरवडा जेलमध्ये जी पहिली पुस्तक पेटी दिली होती तेव्हा आम्हाला श्रीमती विनिता कामठे यांनी त्याची रक्कम दिली होती. या ठिकाणी सांगण्याचा मुद्दा असा की, समाजामध्ये ज्या-ज्या ठिकाणी अशा प्रकारची संवेदनशीलता शिल्लक आह, तसेच आपण देखील समाजाचे काहीतरी उतराई व्हावे असे ज्यांना वाटते, त्यांच्या साठी पोलीस यंत्रणा, तो विभाग यांना सहभागी करुन घेऊन त्यांचाही या सर्व योजनांमध्ये अंतर्भाव करता आला तर आपल्याला जे प्रश्न फार बिकट वाटतात ते सोडविण्याच्या दृष्टीने पावले टाकण्या साठी, याची सुरुवात करण्यासाठी याचा निश्चितपणे उपयोग होऊ शकेल.

सभापती महोदय, रिमांड होमला मराठीमध्ये निरीक्षणगृह असे म्हणतात. परंतु बऱ्याच ठिकाणी निरीक्षण गृहे चांगल्या प्रकारे चालविली जात नाहीत, तेथे गैरप्रकार होत असतात वगैरे गोष्टी आपण ऐकत असतो. मी नाशिकमधून मुंबईमध्ये आलो.तेथील रिमांड होम व्यवस्थित सुरु आहे की नाही पहाण्यासाठी एक कार्यकर्ता त्याठिकाणी गेली 40 वर्षे काम करीत आहे. तो कार्यकर्ता तेथील कोणताही पदाधिकारी नाही.त्याठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनी जी समिती नेमली आहे त्या समितीमधील तो एक सदस्य आहे. पण त्याने हे जिवित कार्य म्हणून स्विकारलेले आहे. त्यांचे नाव श्री.चंदूलाल शहा असे आहे. आपण अशा प्रकारची माणसे शोधून काढली पाहिजेत. कारण केवळ खाकी गणवेशातील पोलीस हे काम करु शकतील अशी मला शक्यता वाटत नाही.

अशुधित प्रत / शुद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बरवड . . ..

श्री. हेमंत टकले ....

त्यासाठी समाजातील प्रत्येक माणसाला जागरुक करणे, या मुलांच्या प्रश्नांकडे आणि त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांकडे लक्ष वेधणे आणि त्यावर प्रतिबंधक उपाय करताना त्यामध्ये समाजाला सहभागी करुन घेणे अशा पध्दतीने जर आपण त्याचा विचार केला तर या विषयाला आपण कोठे तरी न्याय देण्यासाठी प्रयत्न करु असे मला वाटते. मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जो ठराव मांडलेला आहे त्यावरील चर्चेमध्ये भाग घेत असताना मी सांगू इच्छिते की, बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम, 2000 प्रमाणे मुलांच्या संरक्षणाची जबाबदारी शासनावर आहे. परंतु शासन ही जबाबदारी खऱ्या अर्थाने पार पाडते का हा खरा प्रश्न आहे. मुंबई शहरामध्ये साडेचार लाख लहान मुले शहरातील रस्त्यांवर भटकत असतात. मुंबईमध्ये अनेक अनेक राज्यातून ज्या गाड्या येतात त्या रेल्वे स्थानकांवर आपल्याला अशी अनाथ मुले खूप मोठ्या प्रमाणावर बघावयास मिळतात. अनेक ठिकाणी आपण पाहतो की, लहान मुलांना भूक लागल्यानंतर त्यांना उपजीविकेचे कोणतेही साधन नसल्यामुळे ते भीक मागण्याचा मार्ग पत्करतात. अनेक ठिकाणी भिक्षेकरी अशा लहान मुलांना हाताशी धरुन क्रूरपणे त्यांना भीक मागावयास लावतात. काही ठिकाणी ॲसिड टाकून मुलांचे हात जखमी केले जातात तर कधी डोळे फोडले जातात. आपण सिग्नला बघितले तरी असे क्रूर प्रकार मुंबईमध्ये आपल्याला बघावयास मिळतात.

सभापती महोदय, आपल्या देशामध्ये साधारणपणे 2 कोटी मुलींना वेश्या व्यवसायामध्ये ढकलले जाते त्यातील 90 टक्के मुलींना, अगदी लहान मुलींना जबरदस्तीने या व्यवसायामध्ये ढकलले जाते. आपण बाल कामगार नको असे म्हणतो. आपण शिक्षण हक्क मान्य करतो. आपण सर्व शिक्षा अभियान राबवितो. आपण या मुलांना हे करु नका, ते करु नका असे सांगतो पण ती मुले कोठे राहणार, त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी कोण घेणार, त्यांना शाळेत कोण पाठविणार, या ज्या सर्व गोष्टी आहेत त्या करण्यासाठी चिल्डन एड सोसायटी, मुंबई या सामाजिक संस्थेची स्थापना 1927 साली झालेली आहे. सदर संस्थेव्दारे अनाथ, निराधार, निराश्रित, बालमजूर, विधिसंघर्षग्रस्त मुला-मुलींचे पालनपोषण व पुनर्वसन केले जाते. चिल्डन एड सोसायटीतर्फे डेव्हीड ससून औद्योगिक शाळा, माहीम, निरीक्षणगृह, उमरखाडी, चेंबूर चिल्ड्रेन होम, मंदबुध्दी बालगृह, नवीन बालगृह, अतिरिक्त बालगृह, बालकल्याण नगरी, औद्योगिक शिक्षण केंद्र व माध्यमिक विद्यालय, मानखूर्द अशा संस्था चालविल्या जातात. या संस्थांमध्ये पूर्वी 4-4 हजार मुले होती. आज त्या ठिकाणी फार दुर्दशा झालेली आहे. त्या ठिकाणी प्रचंड मोठी जागा आहे. सगळी व्यवस्था आहे. पण मला सांगावयास खूप वाईट वाटते की, तेथील ज्या गृहमाता आहेत त्यांचे पेमेंट सुध्दा 1993 पासून शासनाने दिलेले नाही. या संदर्भात त्यांनी हायकोर्टामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती विद्या चव्हाण .....

याचिका दाखल केली होती. 2005 मध्ये हायकोर्टाने आदेश दिले की, त्यांची 2 कोटी 22 लाख 28 हजार 395 रुपये इतकी रक्कम शासनाने ताबडतोब दिली पाहिजे. या महिला मुलांचे जेवण बनवित होत्या, मुलांना पोलनपोषणाची जबाबदारी त्यांनी घेतली होती.शासनाने हे पैसे दिले पाहिजेत असे आदेश कोर्टाने दिल्यानंतर सुध्दा हे पैसे देऊ शकत नाही यासाठी शासन पुन्हा कोर्टाकडे जाते या गोष्टीचा खूप खेद वाटतो. मग ते मुलांना कसे सांभाळणार आणि मुलांची जबाबदारी कशी घेणार ?

बालकल्याण नगरीची अतिशय सुंदर जागा आहे. तेथे मुलांची राहण्याची व्यवस्था होऊ शकते. त्या ठिकाणी 50 हजार ते 1 लाख मुलांची व्यवस्था शासन करु शकते. ती जबाबदारी कायद्याने शासनाकडे दिलेली आहे. परंतु शासन या बाबतीत काहीही करीत नाही. त्यामुळे मुले अनाथ होत आहेत. आपण त्यांना हे करु नका, ते करु नका असे सांगतो. बाल कामगार नको, मुलांनी भीक मागावयास नको असे सांगतो. मुलांना शिक्षण सक्तीचे आहे पण त्यांना शिक्षण कोण देणार ? ही शासनाची जबाबदारी आहे. आपण ते का देत नाही ? शासनाकडे निधी नसेल तर इतर योजनेतील निधी इकडे वळवून त्या मुलांना आधार देण्याचे काम, त्यांना शिक्षण देण्याचे काम केले पाहिजे. लहान बालकांचे लैंगिक शोषण होते आणि आपण ते उघड्या डोळ्यांनी पाहतो.

परवा एका मुलाच्या हातावर ज्याने ॲसिड टाकले त्या भिकाऱ्याला मी स्वत: पोलीस स्टेशनमध्ये जाऊन पकडून दिले. पोलीस त्या ठिकाणी गेले आणि त्या भिकाऱ्याला त्यांनी हकलून दिले. त्याला अटक केली नाही. त्या दीड दोन वर्षाच्या मुलाला पोलिसांनी कोणतेही संरक्षण दिले नाही. भीक मागणे हा गुन्हा आहे याबद्दल शासनाला आणि पोलिसांना काहीही वाटत नाही. हे सगळे फार भयंकर प्रकार आहेत. प्रा. वर्षाताई गायकवाड यांना सांगू इच्छिते की, आपण मंत्री आहात. आपण या गोष्टींचा अतिशय गांभीर्याने विचार केला पाहिजे आणि शासनाने या मुलांच्या पालनपोषणाची, शिक्षणाची सगळी जबाबदारी घेतली पाहिजे. शासनाने बाकी काही केले नाही तरी चालेल पण या मुलांना आधार देण्याची गरज आहे. तो आधार शासन देईल अशी अपेक्षा मी मंत्री महोदयांकडून व्यक्त करते आणि माझे भाषण संपविते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी या देशाचे व राज्याचे भविष्य आहे त्या मुलांसंबंधीचा अशासकीय ठराव मांडलेला आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या विषयासंबंधीचा ठराव मांडला होता त्यावर चर्चा न होता संपूर्ण चर्चा बालगृहासंबंधी झाली आहे. या मुलांसाठी प्रत्येक जिल्ह्यात बाल विशेष पथकांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या नाहीत असे या ठरावात नमूद केले होते. त्याबाबत मी प्रथम असे सांगू इच्छिते की, शासनाने बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम, 2000 या कायद्यातील कलम 63 अनुसार 35 जिल्ह्यांमध्ये विशेष बाल पथक स्थापन केलेली आहेत. पोलीस स्टेशनमध्ये बालकल्याण अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. या विभागाचा दोन विभागांशी संबंध आहे. बाल सुधार गृहांचा गृह विभागाचा संबंध आहे. बाल गुन्हेगारी गृह विभागाशी संबंधित आहे. बाल कामगार हा कामगार विभागाशी संबंधित विषय आहे. त्यांच्यामार्फत बाल सुधार गृहामध्ये मुले येतात त्यावेळी महिला व बालविकास विभागाची महत्वपूर्ण जबाबदारी सुरु होते. 35 विशेष बाल पथकांची यादी मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांच्याकडे पाठवून देते. गृह विभागाने दिनांक 6.10.2010 रोजी एक जी.आर.इश्यू केलेला आहे. त्या जी.आर.नुसार न्या.जे.एन.पटेल, प्रभारी मुख्य न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 28.4.2010 रोजी एक बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीमध्ये त्यांनी विशेष करुन विशेष बाल पथकाबद्दल आणि संकटग्रस्त मुले आहेत त्यांच्यासंबंधी निर्देश दिले होते. त्याचप्रमाणे बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम, 2000 या कायद्यासंबंधी सुध्दा विवेचन केलेले आहे. हा जी.आर.सुध्दा मी सन्माननीय सदस्यांकडे पाठवून देते. या कायद्याच्या कलम 18 मध्ये असे नमूद केले आहे की, "बालक व बालक नसलेली व्यक्ती यांची एकत्रितपणे न्याय चौकशी करण्यात येणार नाही."

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मंत्री महोदय ज्या जी.आर.चा उल्लेख करीत आहेत तो सभागृहाच्या पटलावर ठेवला जाईल असे जाहीर केले तर बरे होईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, हा जी.आर.सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. बालकाबरोबर असलेल्या मोठ्या व्यक्तीने गुन्हा केला असेल तर बालकावर दाखल केलेला गुन्हा आणि त्याच्याबरोबर असलेल्या व्यक्तीविरुध्द दाखल केलेल्या गुन्ह्यामध्ये फरक असतो. या अधिनियमाच्या कलम 63 मध्ये नमूद केल्या प्रमाणे विशेष बाल पथकाची स्थापना कशासाठी केली पाहिजे, त्या पथकाचे काम काय आहे ते या जी.आर.मध्ये नमूद केलेले आहे. तसेच कलम 29 अनुसार प्रत्येक जिल्ह्यामध्ये बाल कल्याण समिती स्थापन केली पाहिजे. महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून बाल कल्याण अधिकारी आणि स्पेशल ज्युवेनाईल पोलीस युनिट यासंबंधी ज्युवेनाईल जस्टीस ॲक्ट तसेच आयसीडीएस अंतर्गत एक वर्क शॉप आयोजित करावे असे अतिरिक्त मुख्य सचिव, गृह यांना दिनांक 31.3.2012 रोजी पत्राद्वारे कळविले आहे की, त्यांनी यासंबंधी माननीय गृह मंत्र्यांबरोबर चर्चा करावी.

सभापती महोदय, आम्ही असे ठरविले आहे की, नॅशनल पोर्टल ऑन मिसिंग चाईल्ड ट्रॅकिंग सिस्टिम यासंबंधी दिनांक 19 व 20 जुलै, 2012 रोजी एक शिबिर आयोजित केलेले आहे. त्यासंबंधी श्री.अभिजित राजन, अपर मुख्य सचिव, गृह यांना पत्र पाठवून असे सांगितले आहे की, नॅशनल पोर्टल ऑन मिसिंग चाईल्ड ट्रॅकिंग सिस्टिम संबंधी केंद्र सरकारच्या सूचनेनुसार यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे येथे महिला व बालविकास विभागातर्फे शिबिर आयोजित केलेले आहे. त्या ठिकाणी या कायद्याच्या अनुषंगाने पोलिसांनी माहिती दिली जाईल. या शिबिरामध्ये पोलिसांनी सहभागी व्हावे.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी बाल हक्क संरक्षण आयोगासाठी किती खर्च करण्यात आला आहे अशी विचारणा केली होती. या आयोगासाठी 2008-09 मध्ये 4 लाख 68 हजार रुपये इतकी तरतूद केली होती आणि तेवढी रक्कम खर्च झालेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड...

सन 2009-2010मध्ये 41.46 लाख रु. तरतूद होती त्यापैकी 36.11 लाख रु. खर्च झाले. सन 2010-2011मध्ये 50.22 लाख रु. तरतूद होती, त्यापैकी 30.42 लाख रु. खर्च झाले. सन 2011-2012 मध्ये 60.11 लाख रु. तरतूद होती, त्यापैकी 39.88 लाख रु. खर्च झाले. या वर्षी 65 लाख रु.ची तरतूद केलेली आहे.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी या विषयाची खूप चांगली माहिती दिली त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानते. त्यांनी दिलेली आकडेवारी बरोबर आहे. त्यामुळे पुन्हा ती आकडेवारी सादर करुन मी सभागृहाचा वेळा घेऊ इच्छित नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली परिस्थती खरी आहे. शासकीय बालगृहामध्ये आलेली मुले ही एका वेगळया परिस्थितीतून आणि वेगळया वातावरणातून आलेली असतात. काही संकटग्रस्त, काही व्याधीग्रस्त मुले असतात तर काही भीक मागताना पकडलेली मुले असतात. ज्या मुली आलेल्या असतात त्यांच्या बाबतीत अनैतिक प्रकार झालेला असतो. तेव्हा अशा मुलांची मानसिकता, त्यांच्या गरजा ह्या इतर मुलांपेक्षा वेगळया असतात. आपण बालगृहे, निरीक्षक गृहे निर्माण केली.

या ठिकाणी शासकीय बालगृहे यांना मिळणारे पैसे आणि स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविल्या जाणा-या बालगृहांना दिले जाणारे पैसे यामध्ये तफावत आहे असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. ही तफावत आहे हे मी मान्य करते. जी शासकीय बालगृहे असतात ती शासकीय इमारतीमध्ये असतात. तेथील कर्मचा-यांना शासनाच्या माध्यमातून वेतन दिले जाते. स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्या जाणा-या बालगृहासाठी 315 रु. दिले जातात. स्वयंसेवी संस्थाकडून आपल्या अपेक्षा वेगळया आहेत. त्या संस्थांनी स्वत: देखील निधी उभा करणे आवश्यक आहे. एका मुलाला खाण्यासाठी रोज 20 रु. या प्रमाणे निधी दिला जातो. मध्यंतरी एक फीस्ट स्टँडर्ड कमिटी नेमण्यात आली होती. त्या कमिटीमध्ये माजी मुख्य सचिव श्री. रत्नाकर गायकवाड होते. त्या कमिटीमध्ये महिला व बालविकास विभाग, आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय विभागाचे सचिव होते. त्या कमिटीने 635 रुपया ऐवजी 900 रुपये आणि मतिमंत मुलांसाठी 825 रुपया ऐवजी 990 रुपये देण्याचा निर्णय घेतलेला आहे. इमारत भाडे आणि वेतन यासाठी आवश्यक ती रक्कम मिळण्यासाठी महिला व बाल विकास विभागाकडून फाईल मुव्ह झालेली आहे. संपूर्ण देशात नाही तेवढी बालगृहांची संख्या आपल्या राज्यात आहे. या बालगृहांची आम्ही तपासणी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड...

करीत आहोत.

मराठवाड्यातील 61 बालगृहे बंद करण्याचा निर्णय आम्ही घेतला. बाल हक्क संरक्षण आयोगाच्या माध्यमातून तपासण्या झाल्या. त्यांच्या अहवालाचा आम्ही अभ्यास करीत आहोत. ही जी परिस्थिती निर्माण झालेली आहे ती कशी सुधारता येईल, मुलांना कसे संरक्षण देता येईल,मुलांना मूलभूत सवलती कशा देता येतील यादृष्टीने महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहोत. या बालगृहांना दिले जाणारे अनुदान खूप तोकडे आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. मी सांगू इच्छिते की, स्वयंसेवी संस्थांनी स्वत: पैसा जनरेट करावा अशी संकल्पना आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी चिल्ड्रेन एडस् सोसायटीचा उल्लेख केला. त्यांच्या कार्यक्रमाला मी एकदा गेले होते. त्यावेळी तेथील खासदार श्री.संजय दिना पाटील तसेच मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्री. राहुल शेवाळे हे देखील उपस्थित होते. त्यांच्या मतदारसंघामध्ये तो कार्यक्रम होता. त्या ठिकाणी एनजीओ मार्फत ज्या संस्था आलेल्या होत्या त्यांनी चांगल्या प्रकारची शाळा बांधून दिलेली आहे. त्यांनी असेही सांगितले की, एक शाळा बांधून दिलेली आहे आता दुसरी शाळा देखील बांधून देऊ. त्या कार्यक्रमामध्ये लोकांनी जवळ जवळ साडेचार लाख रुपये डोनेट केले. सांगायचे तात्पर्य एवढेच आहे की, अशा प्रकारचे डोनेशन घेत असताना या मुलांचा फायदा कसा होईल हे पहाणे आवश्यक आहे. मी वारंवार हेच आवाहन करीत असते की, तुम्ही संस्थांना पैसे देऊ नका, त्याऐवजी एखादी शाळा बांधून द्या, एक कौन्सिलिंग सेंटर बांधून द्या, मेडिटेशन सेंटर बांधून द्या, मुलांना पुस्तके द्या, कपडे द्या. मी या निमित्ताने लोकप्रतिनिधींना देखील आवाहन करते की, लोकप्रतिनिधींनी देखील त्यांच्या जन्मदिवशी, कुटुंबातील एखाद्या महत्वपूर्ण दिवशी त्या मुलांना भेटले पाहिजे, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजेत.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...नंतर श्री. गिते...

प्रा.वर्षा गायकवाड...

या मुलांना आपली सर्वात जास्त गरज आहे ही गोष्ट आपण पुष्कळ वेळा घाईगर्दीत असतो, त्यामुळे विसरुन जातो. या बाबतीत सभागृहातील सर्व सदस्यांनी या लहान मुलांसाठी काही मदत केली तरी मी खरोखरच सर्वांचे आभार मानेन. या गोष्टीकडे सर्वांनी लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी खूप चांगल्या सूचना या ठिकाणी केलेल्या आहेत व काही समस्यांचा देखील उल्लेख केला आहे. बालसुधारगृहात पुस्तके दिली जात नाहीत. कोणत्या बालसुधार गृहामध्ये पुस्तके दिली गेली नाहीत, त्याचे मला नाव सांगा. त्या बाबतीत मी निश्चितपणे कारवाई करीन. बालसुधार गृहातील मुलांना शिक्षण दिले गेले पाहिजे, त्यांचे आरोग्य चांगले राहिले पाहिजे. त्यांच्या आरोग्याची वेळोवेळी तपासणी झाली पाहिजे. या दृष्टीकोनातून आमच्या विभागाकडून मोठया प्रमाणात प्रयत्न केले जातात. या बाबतीत माझा विभाग कधीही टाळाटाळ करीत नाही हे मी या ठिकाणी आवर्जून सांगू इच्छिते.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून दरम्यानच्या काळात बरेच निर्णय घेतले आहेत. ऑप्टर केअर सेंटर्स मोठया प्रमाणात काढण्यात आले पाहिजेत अशा प्रकारची सूचना सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केली आहे. या बाबतीत मी सांगू इच्छिते की, मी सुरुवातीला या विभागाला मंत्री होते, त्यावेळी फक्त तीनच सेंटर्स होते. त्यात दोन शासकीय आणि एक एनजीओ यांचे सेंटर्स होते. आम्ही असा विचार केला आहे की, अजून शासकीय 5 आफ्टर केअर सेंटर्स सुरु केली पाहिजेत. कारण 2000 ते 2500 मुले ही 11 वर्षानंतर बाहेर पडतात. त्या मुलांना रहावयास जागा नसते. आमच्या विभागाकडे फक्त 300 मुले राहण्याची व्यवस्था होती. या मुलांच्या दृष्टीकोनातून आफ्टर केअर सेंटर्स काढण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे एवढी माहिती मी या निमित्ताने देऊ इच्छिते.

सभापती महोदय, या मुलांना व्होकशनल ट्रेनींग दिले पाहिजे अशाही प्रकारचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. त्या बाबतीत सांगू इच्छिते की, 17 ते 18 वर्षावरील मुलांसाठी "कमवा आणि शिका" अशा पध्दतीचा तो जी.आर.काढलेला आहे. या मुलांना त्याच संस्थेमध्ये व्होकेशनल ट्रेनिंग शिक्षण देणार आहोत. पुणे येथे स्वामी विवेकानंद संस्था आहे, एखादी व्होकेशन ट्रेनिंग देणारी संस्था असेल, त्या संस्था त्या मुलांना तेथेचे ट्रेनिंग देणार आणि पुढे त्यांना तेथेच नोकऱ्या उपलब्ध करुन देणार आहे, या मुलांना अशा पध्दतीचे प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम सुरु करीत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड...

सभापती महोदय, मी या ठिकाणी अभिमानाने सांगू इच्छिते की, अनाथ मुलांना आई-वडील नसतात, त्यांना कोणीही नातेवाईक नसतात. अशा अनाथ विद्यार्थ्यांना वेगवेगळी प्रमाणपत्रे देण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. मी वारंवार बालसुधार गृहांना भेटी देत असते. त्या भेटीमध्ये मी त्या अनाथ मुलांना विचारले की, तुम्हाला काय हवे आहे ? या बालसुधार गृहामध्ये जी अनाथ मुले शिकली, ज्यांची लग्ने झाली, ते आयुष्यामध्ये सेटल झाली आहेत, त्या अनाथ मुलांचा या मुलांसमोर एक आदर्श निर्माण व्हावा म्हणून आम्ही एक कार्यक्रम ठेवला आहे. दुसऱ्या मुलांना विचारले की, तुम्हाला काय पाहिजे ? त्या मुलांनी त्या प्रश्नाचे अतिशय छोटे उत्तर दिले. त्यांनी मला सांगितले की, आम्हाला रेशन कार्ड पाहिजे. आम्ही ज्यावेळी बाहेर जातो त्यावेळी आमच्या बरोबर घरातील कोणीही सोबत नसते. रेशन कार्डची मागणी करतो तर रेशन कार्ड मिळत नाही. आम्हाला कोणतेही सर्टिफिकेट मिळत नाही. आमच्या विभागातर्फे या मुलांसाठी अनाथ सर्टिफिकेट देण्याची व्यवस्था करण्याचा आमचा विचार आहे त्यासाठी महसूल विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे फाईल मूव्ह करीत आहोत. या अनाथ मुलांना रहिवाशी दाखला असेल, रेशन कार्ड असेल ते त्यांना तेथल्या तिथेच मिळाले पाहिजे. कारण त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्र नसल्यामुळे भविष्यात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. काही मुलांनी सांगितले की, आम्हाला लग्न करण्यासाठी मुली मिळत नाहीत. माटुंगा येथे श्रध्दाश्रम महिला गृह आहे. तेथील मुली आणि अनाथालयातील तरुण मुले यांची लग्ने जमवून देण्याबाबत भविष्यामध्ये प्रयत्न केले पाहिजेत मला वाटते.

सभापती महोदय, मागच्या कालावधीत बाल हक्क संरक्षण आयोगावर नेमणुका केल्या गेल्या. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई तुमचा रोष कोणाबाबतीत होता याची मला कल्पना आहे. या आयोगावर चांगल्या लोकांची नियुक्ती होण्या संदर्भात माझ्या परीने मी प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत. प्रथमतः दैनिक वृत्तपत्रात जाहिराती देऊन चांगल्या गोष्टी मागण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे यापुढे बाल हक्क संरक्षण आयोगाचे कामकाज चांगल्या प्रकारे होईल अशी मला अपेक्षा आहे.

प्रा.वर्षा गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, या ठिकाणी दोन्ही महिला सन्माननीय सदस्यांनी भिक्षा मागणाऱ्या मुलींबाबतचा विषय उपस्थित केला आहे. त्या बाबतीत सांगू इच्छिते की, श्रीमती शिला साईल या डी.सी.पी.होत्या. त्यावेळी झोपु योजना चालू होती. यासाठी खूप प्लॅन करावा लागतो. आम्ही नरीमन पॉईंट, गिरगाव चौपाटी, माहिमचा दर्गा या ठिकाणच्या भिक्षा मागणाऱ्या मुलांची भेट घेतली. त्यावेळी तेथील स्थानिक पोलीस, स्थानिक एन.जी.ओ.,स्थानिक वैद्यकीय अधिकारी या सर्वांना सोबत घेऊन त्या मुलांची तपासणी करावयाचो. त्या ठिकाणी काही मुले सापडली तर तेथल्या तेथे सी.पी.डब्ल्यू.सी.च्या मेंबरच्या ताब्यात द्यावयाचे आणि नंतर ते मेंबर्स त्या मुलांना बालसुधार गृहात शिफ्ट करावयाचे. अशा मुलांना बाल सुधारगृहात कमित कमी दोन महिने ठेवले पाहिजे. त्या ठिकाणी त्यांचे कौन्सिलींग करण्यात आले पाहिजे त्यामुळे भविष्यात ही मुले या क्षेत्रात कधी येणार नाहीत. असा प्रयोग पुन्हा करण्याचा आमचा प्रयत्न आहे हे मी या ठिकाणी नमूद करु इच्छिते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जी गोष्ट सांगितली ती खरी आहे. ट्रॅफिकिंग झालेली मुले आमच्याकडे येतात, भिक्षा मागताना पकडलेली मुले आमच्याकडे येतात, बाल कामगार आमच्याकडे येतात. ट्रॅफिकिंग झालेल्या महिलाना त्यांच्या घरी पोहोचविण्यासाठी आमचे अधिकारी आणि आमचे डेप्युटी कमिशनर पश्चिम बंगाल पर्यंत गेलेले आहेत.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड....

तेथील अधिकाऱ्यांशी चर्चा करुन त्या महिलांना तिकडे म्हणजे त्यांच्या देशामध्ये पोहोचविण्यासाठी सुध्दा प्रयत्न करीत आहोत. आंध्र प्रदेशाने याबाबतीत एक सिस्टीम डेव्हलप केलेली आहे. तिथल्या तिथे त्या राज्याच्या पोलिसांबरोबर टायअप करण्याचे काम आम्ही आता सुरु केलेले आहे. आंध्र प्रदेश व कर्नाटक या दोन्ही राज्यांनी आपल्या राज्याबरोबर तशी बांधणी केलेली आहे. अशाच प्रकारे आपल्या राज्याचाही प्रयत्न सुरु आहे. बालकामगारांच्या बाबतीत विचार केला तर पुष्कळ मुले परराज्यातून येतात असे आढळून येते. त्यात आपल्या राज्यातील मुले कमी असतात. परराज्यातून येणारी मुले प्रामुख्याने मुंबई पुणे यासारख्या मोठया शहरांमध्ये येत असतात. या मुलांनाही आपण त्यांच्या त्यांच्या राज्यात,त्यांच्या गावात पोहोचविण्याचे काम केलेले आहे. त्यातील काही मुले शिक्षण घेतल्यानंतर पुन्हा महाराष्ट्रात आली आणि आपले गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांना भेटून त्यांचे आभार मानून परत गेली. अशा मोहिमा देखील आपल्या सरकारने केलेल्या आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. गोऱ्हे यांनी बालकांच्या चित्रीकरणासंदर्भात एक मुद्दा उपस्थित केला. मी सुध्दा एक शो पहात होते. तो डान्स इंडिया डान्स हा लहान मुलांसाठीचा कार्यक्रम होता. त्यासंदर्भात सांस्कृतिक कार्यमंत्र्यांना मी अशी विनंती करते की, या लहान मुलांच्या डान्सच्या कार्यक्रमात डान्स करीत असताना एक ओम नावाचा मुलगा रॉडवरुन खाली येतो अशा प्रकारे नवीन साहसी प्रकार मुले करीत असतात. याबाबतीत त्यांचे म्हणणे असे असते की, आम्ही एक्सपर्टच्या मदतीने योग्य ती खबरदारी घेत असतो. यानिमित्ताने मंत्रीमहोदयांनी विशेष लक्ष द्यावे. शो च्या बाबतीत वारंवार सांगितले जाते तसे जाहिरातीतूनही सांगितले जाते की, मुलांनी दूध घेतले पाहिजे, पोष्टिक आहार घेतला पाहिजे, पण मुलांच्या कामाच्या बाबतीत सुध्दा आपल्याला कुठेतरी विचार केला पाहिजे. आपण बऱ्याचवेळेला सांगितले की, 4 तासानंतर मुलांना कामामध्ये ब्रेक मिळाला पाहिजे. परंतु या गोष्टी होत नाहीत. याकडे सांस्कृतिक कार्यमंत्र्यांनी लक्ष द्यावे. त्याचप्रमाणे माननीय सदस्यांचे जे इतर विषय होते त्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला की, यापुढे कोणत्याही मुलाला किंवा मुलीला एकत्र ठेवावयाचे नाही. मुले आणि मुली यांची बालगृहे ठराविक अंतरावरच असली पाहिजेत असा निर्णय घेतला.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ....

त्याचप्रमाणे शासकीय बालगृहांत लैंगिक शोषणाचे प्रकार होतात असेही माननीय सदस्यांनी याठिकाणी सांगितले. यामागे एक सामाजिक समस्या आहे. या मुलांची मानसिकता हाही एक महत्वाचा भाग आहे. यादृष्टीने सर्वात महत्वाचे काम आम्ही असे करीत आहोत की, या मुलांचे कौन्सिलींग करण्याचा निर्णय घेतला. मी स्वत: नागपूरला पाहिले असता मला लक्षात आले की, या मुलींना तेथे थांबायचे नसते. त्यांची तशी मानसिकताच नसते. या मुलींना आम्ही समजावतो की तुम्ही येथे राहून शिक्षण घ्या, तुम्हांला तुमच्या आई-वडिलांकडे आम्ही सोडून देऊ. पण त्या मुली ऐकण्याच्या मन:स्थितीत नसतात. त्या म्हणतात की आम्हांला आमच्या व्यवसायाच्या ठिकाणी जायचे आहे. अशा प्रकारची त्यांची मानसिकता असल्यामुळे त्यांचे समुपदेशन करुन पोषक वातावरणाची त्यांना गरज असते. असे प्रकार होऊ नयेत म्हणून आपण मुला-मुलींना स्वतंत्र ठेवतो.

माननीय सदस्यांनी अपुऱ्या स्वच्छतागृहांचा देखील उल्लेख केला. याबाबतीत शासनाने असा निर्णय घेतला आहे की, बालगृहांना मान्यता देताना निकषांचे पालन केलेच पाहिजे. त्या अनुषंगाने आपण आपला केअर प्लॅन काढला. पहिल्यांदा आपले निकष बदलले. बालगृहांच्या बाबतीत मी स्वत: अतिशय संवेदनशील आहे. मला स्वत:ला वाटते की, भविष्याची आमची जी पिढी आहे, त्यांना चांगले वातावरण कसे निर्माण करता येईल याचाही विचार करीत असून सभागृहाला यानिमित्ताने सांगू इच्छिते की, आपण उल्लेख केला की, पुस्तकांची गरज आहे, इतर गोष्टींची गरज आहे पण मी तर असे म्हणेन की, या मुलांना सर्वात जास्त गरज कोणत्या गोष्टीची असेल तर ती प्रेमाची आहे. कारण ही मुले सुध्दा समाजाचा एक भाग आहेत. म्हणून त्यांना प्रेमाची गरज आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्यांनी याबाबतीत एक बैठक घ्यावी अशी विनंती केलेली आहे. अशी बैठक घेण्याचे मी मान्य करते. या बैठकीसाठी सर्व महिला आमदार बसून एकत्रितपणे याविषयावर चर्चा करुन कोणते चांगले निर्णय घेता येतील याबाबत प्रयत्न करु. शेवटी आपणही एक महिला आहात, मी सुध्दा एक महिला आहे. महिला आईचे दुसरे रुप असते. म्हणून आपण सर्व मिळून प्रयत्न करु या. तसेच आपण ज्या ज्या गोष्टी सांगितल्या त्याचाही विचार करु. त्याचबरोबर ज्या ज्या गोष्टी झालेल्या आहेत त्याची चर्चा करण्यापेक्षा ज्या गोष्टींची गरज आहे त्या कशा सुधारता येतील यासाठी प्रयत्न करु हे सांगण्याचा मी याठिकाणी प्रयत्न करीत आहे.

नंतर श्री.भोगले

अशुद्धलिखित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड.....

एका चांगल्या विषयावरील चर्चा याठिकाणी माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते आणि भविष्यात या विभागाच्या माध्यमातून देशाचे भविष्य कसे चांगले होईल यासाठी त्यांचे मार्गदर्शन आम्हाला लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करुन माननीय सदस्यांनी त्यांचा ठराव मागे घ्यावा अशी नम्र विनंती करते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अतिशय सविस्तर उत्तर दिलेले आहे. ठराव मागे घेण्यापूर्वी मी अंमलबजावणीच्या दृष्टीने तीन-चार सूचना करु इच्छिते. मंत्री महोदयांनी बैठकीची सूचना स्वागतार्ह मानली त्याबद्दल त्यांचे आभार मानते. त्यांनी अतिशय सकारात्मक उत्तर दिले आहे. पोलिसांबरोबर बैठक घेत असताना त्यामध्ये रेल्वे पोलिसांना देखील बोलावणे गरजेचे आहे. रेल्वे हद्दीत भटकणाऱ्या मुलांचा रेल्वे पोलिसांशी संपर्क येत असतो. पुण्याला श्री.पाटणकर आले होते त्यावेळी मी त्यांना सांगितले होते की, याबाबत आढावा घ्यावा. त्यांनी सांगितले की, मागील दोन-तीन वर्षात रेल्वे पोलिसांच्या संदर्भात विशेष कामकाज झालेले नाही. त्यामुळे रेल्वे पोलिसांना यामध्ये सामावून घ्यावे.

सभापती महोदय, पोलिसांची संवेदनशीलता वाढविण्याबद्दल सांगितले गेले. जी शासकीय बालगृहे आहेत तेथील आया, पुरुष कर्मचारी यांची संवेदनशीलता वाढविण्यात यावी. त्यांच्याशी बोलायला गेलो तर असे दिसून येते की, तेच तेच काम करुन ते कंटाळलेले असतात, भ्रष्टाचाराच्या साखळीचा भाग बनलेले असतात, त्यांना स्वतःला वाटते की, या मुलांमध्ये काही बदल होणार नाही, त्यामुळे ते नाईलाजाने काम करीत असतात. त्यांना कसे मोटिव्हेट करायचे हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, येरवडा येथील बालगृहामध्ये आम्हाला असे दिसून आले की, छोट्या मुदतीसाठी मुले येतात त्यांना वाचायला काही देत नाही असे सांगण्यात आले. थोड्या काळासाठी जरी मुले आली असली तरी पर्याय म्हणून त्यांना पुस्तके उपलब्ध करुन दिली पाहिजेत. अभ्यासाची किंवा आवड असतील अशी पुस्तके उपलब्ध झाली तर ती मुले वाचू शकतात. अशा मुलांच्या कौन्सिलिंगचा तो भाग असेल. बालगृहामध्ये सीसीटीव्ही बसविण्यासाठी पुढील वर्षी आर्थिक तरतूद केली तर सुरक्षेच्या दृष्टीने ते योग्य होईल.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आंध्रप्रदेशचा उल्लेख केला. तेथील बालगृहामध्ये अतिशय चांगले काम करणारे खूप कार्यकर्ते आहेत. आपल्या राज्यातील बालगृहामध्ये त्याची पुनरावृत्ती करण्यासाठी को-मॅनेजमेंट किंवा सहयोगी व्यवस्थापन राबविण्यासाठी चार-पाच जिल्हयांमध्ये पथदर्शी प्रकल्प राबवू शकलो तर त्या राज्यातील चांगल्या गोष्टींची आपल्या राज्यातल्या बालगृहामध्ये करण्यासाठी उपयोग होऊ शकेल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, ज्या मुलींची मानसिकता वेगळ्या स्वरुपाची आहे, त्या 16 वर्षावरील मुली आहेत. 12 ते 14 वर्षे वयाच्या मुली बालगृहातून बाहेर जायचे म्हणाल्या तरी 10 पैकी एखादी मुलगी मला या दुष्टचक्रामधून बाहेर पडायचे आहे असे म्हणू शकते. केवळ निष्कर्ष घेऊन काम करण्यापेक्षा त्यांच्या भाषेमधून बोलणे महत्वाचे आहे. पश्चिम बंगाल किंवा आंध्रप्रदेशमधील मुली असतील तर त्यांची भाषा बोलणारे दुभाषी नसल्यामुळे त्या मुलींशी संवाद साधणे अडचणीचे होते. आपण काय बोलतो हे त्यांना कळत नाही आणि त्यांचे म्हणणे आपल्याला कळत नाही. या धंद्यातील दलाल काय बोलतो हे त्यांना चांगले कळते. कारण दलाल त्यांना कोर्टात गाठतो. पुण्याच्या होममध्ये आपण प्रयोग केला तो चांगला प्रयोग आहे. बंगाल, नेपाळमधून आलेल्या मुली त्यांच्या भाषेत बोलतात. त्या आम्हाला आमच्या गावाला जायचे आहे असे सांगतात. तेथे गेल्यानंतर दलाल त्यांना पुन्हा या व्यवसायात आणतो. म्हणून आपले कौशल्य वाढवून त्यांचे रिहॅबिलिटेशन करणे आणि त्यांना रिपॅट्रिएट करणे या मुद्याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. मंत्री महोदयांच्या उत्तरानंतर मी माझा ठराव मागे घेते.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, आम्ही रेल्वेच्या अधिकाऱ्यांना अगोदरच विनंती केली होती. आता पुन्हा विनंती करु. सी.डब्ल्यू.सी.समिती निर्माण होईल तेव्हा त्यांचे प्रशिक्षण घेण्यात येईल त्याचवेळी तेथे काम करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा स्पेसिफिक कार्यक्रम घेण्यात येईल. बालगृहामध्ये साधारणपणे 2 ते 8 दिवसांसाठी मुली येतात त्या अशाच थांबतात, त्या संदर्भात माननीय सदस्यांनी सूचना केली आहे. ती सूचना ॲक्शन फॉर सजेशन अशी आहे. जरुर ॲक्शन घेतली जाईल.

सभापती महोदय, मायनर मुलींबाबत मी सांगितले आहे. मानखूर्द येथील स्वाधारगृहामध्ये 200 पेक्षा जास्त मुली आहेत. आंध्रप्रदेशचा जो मुद्दा मांडला त्याबाबत मी सांगते.

नंतर श्री.खर्चे...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड .....

बांगला देश आणि महाराष्ट्रातील उद्योगात खूप फरक आहे तसेच पिकांमध्ये सुध्दा बराच फरक आहे. या गोष्टींचा विचार करुन तेथील प्रशिक्षण कसे देता येईल यादृष्टीनेही आपण आपल्या राज्यात कार्यक्रम राबविणार आहोत. तसेच प्रत्येक राज्यातील उद्योगाप्रमाणे महिलांना शिक्षण दिले पाहिजे त्यानुसार आपण काम करण्याचा विचार करीत आहोत. या मुली पॉवर लॉन्ड्रीत काम करताना दिसतात म्हणून पॉवर लॉन्ड्रीचा व्यवसाय उपलब्ध करुन देण्याचा विचार आपण करीत आहोत. माझी तर अशीही इच्छा आहे की, या मुलींना गार्डनिंग, नर्सरी वगैरे प्रशिक्षण दिले तर त्यांना त्यातून एक नवीन व चांगला व्यवसाय मिळेल. जेणेकरुन त्या स्वत:च्या पायावर उभ्या राहू शकतील. शेवटी कोणत्याही स्त्रिला अनैतिक व्यवसायात काम करण्याची आवड नसते, मजबुरीने त्यांना ते काम करावे लागते. या मुलींना चांगल्या व्यवसायात पुनर्वसित करण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. एवढे बोलून सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी त्यांचा ठराव मागे घ्यावा अशी पुन्हा विनंती करते.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, मी सभागृहाला माझा ठराव मागे घेण्याची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 16 जुलै, 2012 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 56 मिनिटांनी सोमवार, दिनांक 16 जुलै, 2012 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही